पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक अकरावा । मराठी पाक्षिक । मूल्य :२५ ₹ । दिनांक १ ते १५ फेब्रुवारी २०१९



## अभिव्यक्ती स्वातंत्र्याची साहित्य संमेलनातच गळचेपी!

## दस का दम; चिनी कम


गाव...
Kabhi Kabhi
गाव का स्वाद...
Chaho Jabhi
Chulha Village
RURAL INDIAN | INDIAN | MUGHLAI | CHINESE | THAI
A Village Themed Restaurant
Now Open near Hiranandani Estate
AC DINING
OPEN DINING
COOL WITH THE MIST
TREE TWIG ISLANDS
LIVE CHULHA
EXOTIC RURAL TOUCH
WOOD SHACKS
Chulha Village, Next to Vijay Annex, Bldg. 31/32
Waghbil-Hiranandani Estate Junction,
Waghbil, Thane (W)
FOR RESERVATIONS
CALL 91362 15403 / 15404 / 15405 / 15406

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक ११ । मूल्य : रु. २५ । दिनांक ०१ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०१९

संपादकीय ५

कव्हर स्टोरी : दलितांचे सक्षमीकरण कसले? हा तर भाजपचा राजकीय फंडा
– प्रो.सुखदेव थोरात ७

देशासमोरील प्रश्न : सत्तेचा उन्माद अन् मनुस्मृतीच्या पुनर्स्थापनेचा डाव
– मा.न्या.पी.बी. सावंत १३

मुलाखत : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले – चेतन शिंदे १६

सामाजिक समानतेपासून आपण अद्यापही कोसो दूर
– डॉ. विनोद मिश्रा २२

भय, भूक, बेरोजगारीचा आगडोंब –प्रकाश खंडेलोटे २६

व्यक्त न होऊ देणं किती अस्वस्थ करतं!
– नयनतारा सहगल ३०

कविता : सावित्रीमाई ! – प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर ३५

व्यक्तिविशेष : नयनतारा सहगल – ज.वि. पवार ३६

काँग्रेसला गांधी–नेहरु घराण्याचेच बळ !
– प्रकाश एस. तळेगावकर ३८

ग्रंथ परिचय : नाच्यौ बहुत गोपाल
डॉ. सूर्यनारायण रणसुभे ४०

आजकालचे प्रश्न : पंक्चरवाला ४२

ग्रेट थॉट्स ४५

कोण काय बोलतं... ४६

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
शिवा पाटील
सचिन ओव्हाळ

**मुखपृष्ठ**
भूषण बिरारी

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

– जाहिरात विभाग संपर्क
९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

– वर्गणीदारांसाठी संपर्क
**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : ९०७६०६५२१५
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२
**पुणे** : उमेश : ९७६६८१९३५०

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

## अंक संग्राह्य


'द पीपल्स पोस्ट' हे पाक्षिक वाचकांची बौद्धिक भूक भागवण्याचं काम उत्तम रितीने करीत आहे. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०१८ च्या अंकातील सर्वच लेख वाचनीय होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नवराष्ट्राचे निर्माते असल्याच्या वास्तवावर प्रकाश टाकणारा 'डॉ. बाबासाहेबांच्या संकल्पनेतील राष्ट्र' हा प्रो. विवेक कुमार यांचा लेख मला खूप आवडला. मनुवादीमुक्त भारताची गरज, मनुवाद गाडा मगच भांडा, म्हणू नको बये, भीम गेले गेले, व्यक्तिविशेष, मातंगांच्या हाती भीमज्योत आणि महाराष्ट्रातील बुद्धलेणींचे संवर्धन आणि जबाबदारी या अभ्यासपूर्ण लेखांनी हा अंक संग्राह्य बनवला. अंक उत्कृष्ट देण्याचा संपादक चेतन शिंदे यांचा प्रयत्न स्तुत्य आहे. त्यांचे अभिनंदन. – **सुमित साळवे**, पुणे

## भाजपला चिमटा काढणारे संपादकीय

५६ इंच छातीचा धोशा लावणारे पंतप्रधान नरेंद मोदी हे अलीकडेच झालेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीतील पराभवाने जमिनीवर आले आहेत. या अनुषंगाने १६ डिसेंबर ते ३१ डिसेंबरच्या अंकातील 'किती इंच घटली छाती' हे संपादकीय विशेष होते. मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये भाजपला धोबीपछाड देण्यात कॉंग्रेस यशस्वी झाली. त्यामुळे २०१९ ची लढाई कशी जिंकणार या विवंचनेत असलेल्या भाजपला चिमटा काढणारे हे संपादकीय होते. देशवासियांना आता भाजपचा कोणताही डाव धोका देऊ शकत नाही, हे या पक्षाच्या नेत्यांनी लक्षात घेतले पाहिजे. लोक मोदींना कंटाळले आहेत. या संदर्भाने माहिती देणारे लेखही 'द पीपल्स पोस्ट' मधून द्यावेत. – **विजय शेळके**, नांदेड

## पंक्चरवाला अत्युत्कृष्ट

पंक्चरवाला नावाने लिहिल्या जाणाऱ्या 'आजकालचे प्रश्न' सदरातून महत्त्वपूर्ण घडामोडींचा आढावा घेतला जातो. यामधून राजकीय क्षेत्राबरोबरच अन्य क्षेत्रांतील घडामोडींवरही अभ्यासपूर्ण भाष्य केलेले असते. ते अतिशय वाचनीय असते. ३० सप्टेंबर ते १४ ऑक्टोबरच्या अंकातील 'राफेल, राफेल पुन्हा राफेल, गद्दारी जिंके, इमानदारी फेल' या शीर्षकाअंतर्गत लिहिलेला छोटेखानी लेख अभ्यासपूर्ण होता. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर तयार होणाऱ्या चित्रपटाविषयीची माहितीही ज्ञानात भर घालणारी होती. - **संजय माने**, मुंबई




## 'मुस्लिम ब्रदरहूड' वरील लेख माहितीपूर्ण

१६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०१८ च्या अंकातील 'मुस्लिम ब्रदरहुड' हा लेख माहितीपूर्ण होता. या संघटनेला ९० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विजय नाईक यांच्या लेखणीतून उतरलेला हा अभ्यासपूर्ण लेख होता. 'समस्यांच्या चक्रव्यूहात भारत' हा न्या. पी.बी. सावंत यांचा लेख देशाच्या समस्यांची उकल करणारा त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संविधानविरोधी मानसिकतेवर प्रकाश टाकणारा होता. 'विकासाच्या नावाखाली आणखी किती भकास समाज' हे कॉ. धनाजी गुरव यांचं चिंतन विचार करायला लावणारं आहे. - **संतोष वाघमारे**, पुणे

### वाचकांना आवाहन

'द पीपल्स पोस्ट'ला महाराष्ट्रभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. वाचकांच्या पसंतीस उतरेल असा अंक देण्याचा आमचा प्रयत्न असतो. वाचकांच्या प्रतिक्रियाही आम्हाला अंक अधिकाधिक वाचनीय देण्याच्या दृष्टीने प्रेरणादायी ठरतात. वाचकांनी प्रतिक्रिया thepeoplespost2014@gmail.com या मेलवर पाठवाव्यात. - **संपादक**

## महात्मा गांधींवरील लेख वाचनीय

३० सप्टेंबर ते १४ ऑक्टोबरचा 'द पीपल्स पोस्ट' चा अंक महात्मा गांधी यांच्या व्यंगचित्राने आकर्षक बनला होता. या अंकातील महात्मा गांधी यांच्यावरील लेख दर्जेदार होते. 'महात्मा गांधी मरत नाहीत किंवा मारलेही जात नाहीत' असं सांगणारी तुषार गांधी यांची मुलाखत मनाला भिडणारी होती. विद्यमान केंद्र सरकार वैज्ञानिक दृष्टिकोनाऐवजी अंधश्रद्धांना खतपाणी घालत असल्याचे तुषार गांधी यांचे मनोगत खरेच आहे. डॉ. भालचंद्र कांगो यांचा 'जयभीम कॉम्रेड' हा लेखही चांगला वाटला. अंक एकूणच माहितीपूर्ण होता. - **पी.के. पवार**, औरंगाबाद

## चळवळीच्या बांधणीसाठी वैचारिक खाद्य हवे

'द पीपल्स पोस्ट' हे पाक्षिक परिवर्तनवादी चळवळीचे वाहक व्हावे यासाठी वाचकांना वैचारिक खाद्य पुरवणारे लेख यामध्ये देणे मला आवश्यक वाटते. राजकीय क्षेत्राला मरगळ आलेली पाहता, आंबेडकरी चळवळीला पुढे नेणारे विचार लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. हे काम 'द पीपल्स पोस्ट' ने करावे. चळवळीतून घडलेल्या कार्यकर्त्यांचे त्याचबरोबर अनुभवसंपन्न व्यक्तींचे लेख यामधून दिल्यास योग्य पद्धतीने चळवळीची बांधणी होऊ शकेल. - **सी.आर. पानवटे**, मुंबई

संपादकीय

# दस का दम; चिनी कम

काळ कधी कधी राजकारण्यांवर सूड घेत असतो. सूड म्हणजे हे राजकारणी ज्यांना चिकटलेले असतात किंवा ज्या गोष्टी तत्व म्हणून स्वतःच्या ढुंगणाला चिकटवून घेऊन शायनिंग मारतात, त्याच गोष्टी काळ नावाचा वस्ताद आपल्या नखांनी काढून घेतो आणि या राजकारण्यांचं खरं रूप जगजाहीर करतो. भाजपचं आणि त्याचा बाप असलेल्या संघाचं राजकारणच राखीव जागांच्या विरोधातून सुरू झालं. भाजपला वाटायचं की राखीव जागाच नकोत, कारण त्यातून विषमता तयार होते. राखीव जागांचे लाभार्थी सरकारचे जावई होतात आणि झालंच तर कमी गुणवत्ता असलेले राखीव जागांवर पोहोचू शकत नसल्यानं तळातच अडकतात. विषमता तयार होते. अर्थात, असा उलटा सिद्धांत मांडण्यात शिवसेनाही होती. बाळासाहेब म्हणायचे की, आम्ही नवबौद्धांऐवजी दलितांना जवळ करू. डावे म्हणायचे की एकदा का वर्णसिद्धांत यशस्वी झाला की क्रांती होईल. जातीवर आधारित कोणतीच गोष्ट देता कामा नये. आपल्या वर्गाचा सिद्धांत जात व्यवस्थेत कुठं तरी मार खातोय असं डाव्यांना वाटायला लागलं. म्हणजे त्यांना उशिरा का होईना अक्कलदाढा आल्या. हिंदुत्वाचं तीर्थ पिऊन विटा गोळा करून आणि राम राम म्हणून भाजपला काही अक्कलदाढा येत नव्हत्या. खरं तर त्यांना येऊ द्यायच्या नव्हत्या. अक्कलदाढा आल्या की हिंदुत्वाला काही तरी धक्का बसतो असं त्यांना वाटत असावं. शेवटी राजकारण महावस्ताद असतं. ते कपडे घालायला आणि काढायलाही शिकवतं. ते पाया पडायला आणि पाय ओढायलाही शिकवतं. राजकारण्यांना मतं हवी असतात. एखादी शेणात पडलेली गोष्ट उचला मतं मिळतील असं सांगितलं तरी ते करायला राजकारणी एका पायावर तयार असतात. असं अनेकांनी केलं आहे. काळ सूड घेत असतो ते असा. राखीव जागा विरोधाला चिकटून बसलेल्या भाजपला काळानं अशी एक थप्पड देऊन सांगितलं की, मतं पाहिजे असतील तर आहे त्या राखीव जागांचं संवर्धन करा आणि सवर्णांनाही राखीव जागा द्या. भाजपनं आपल्या काळाचं, स्वार्थाचं, ढुंगणाखालच्या सत्तेचं ऐकलं आणि लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर दहा टक्के जागा सवर्णांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. एकाधिकारशहा बनू पाहणाऱ्या नरेंद्र मोदींनी मंत्रिमंडळाला थेटपणे विश्वासात न घेताच ही घोषणा केली. संडास बांधायची घोषणा तेच करतात आणि रस्ता बांधण्याची घोषणाही तेच करतात. अन्य मंत्र्यांनी यांच्या घोषणेचं कायद्यात रुपांतर करायचं. कागदं जमवायची आणि फायली भरायच्या. केंद्रीय मंत्रिमंडळातील दहा नावं कुणालाही आठवणार नाहीत. ती आठवावीत अशी जागाच मोदींनी ठेवलेली नाही.




प्रारंभ, मध्य आणि अंत मोदीच आहेत. सबकुछ मोदीच असल्यानं इथं बाकी कुणाला कुणी गिनायचं कारण नाही. मोदींच्या नावानं मतं मिळतात. त्यांच्या नावानं सत्ता मिळते म्हणून संघही कधी तोंड उघडत नाहीय. फुकटात सत्ता मिळतेय तर मोदींना वेसण कशाला घाला, असं म्हणत संघ आपली आपली हिंदुत्वाची कामं करत राहतो आणि मोदी 'भाईयों और बहनों' असं घसा कोरडा होईपर्यंत ओरडतात. मन की बात सांगतात.

चार राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भाजपला दणका बसला आणि येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत असा दगाफटका होऊ नये म्हणून काही जुने आणि काही नवे पत्ते काढण्यास सुरवात झाली. रामाचं देऊळ हा जुना पत्ता काढण्यात आला. त्याच्या जोडीला केरळातलं शबरीमला प्रकरण ताजं करून ठेवण्यात आलं. पण रामाचा पत्ता चाललं का आणि किती चालंल याविषयी भाजप आणि संघ परिवारात साशंकता आहे. दुसरा देव अचानक बाहेर आणता येत नाही. अयोध्येचा तिढाच सुटला नाही तर काशीला कसं जाणार हा प्रश्नच आहे. शबरीमलामध्ये महिलांना प्रवेश द्या असा निवाडा खुद्द बाप न्यायालयानं म्हणजे सर्वोच्च न्यायालयानं देऊनही तिथं महिलांना कोणी जाऊ देत नाही. शबरीमलामध्ये महिलांनी जाणं म्हणजे इथं मूठभर लोकांनी उभी केलेली देव-धर्माची व्यवस्था कोसळणार की काय अशा भावनेतून तिथं महिलांना रोखण्यात आलं आहे. महिला कायमस्वरूपी पापी, विटाळवासीनीच असते हे त्यामागचं तत्व. निवडणुका जवळ येतील तसा राम गाजवायचा आणि शबरीमला तापत ठेवायचं अशी एक व्यूहरचना आहे. पण याबाबत साशंकता येत आहे. मध्येच

शिवसेनाही खडबडून जागी झाली आणि अयोध्या विषय आपल्याच मालकीचा आहे असं सांगत थेट आंदोलन चालूच केलं. आता काय करायचं? लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, नोकऱ्या, महागाई, सुरक्षितता, शिक्षण यांसारख्या गंभीर बनलेल्या गोष्टी तसाच गुंता करून राहिल्या. अशा परिस्थितीत मतदारांवर डल्ला मारून त्यांची मतं कशी मिळवायची हा एक गंभीर प्रश्न आहे. निवडणुकांना तोंड देण्यासाठी शायनिंग मारणं अशी कोणतीही गोष्ट भाजपकडं नाही. सांगण्यासारखं आहे तो फक्त काँग्रेसविरोध आणि सत्तर वर्षांत काय झालं? हा प्रश्न. पण हा प्रश्न ऐकून ऐकून लोकच आता उलट्या करायला लागले. एखाद्यानं पोट साफ करून घ्यायचं असेल तर इनिमा म्हणून हाच प्रश्न ऐकायचं, इतकं हसं या प्रश्नाचं झालं. एखाद्यानं विचारावं बस पंक्चर का झाली तर यांनी उत्तर द्यावं काँग्रेस सत्तर वर्षे सत्तेवर होती. एखाद्यानं विचारावं यंदा थंडी इतकी का पडली तर यांनी प्रतिप्रश्न करावा काँग्रेसने सत्तर वर्षांत काय केलं? हा प्रश्न भाजपच्या अंगवळणी इतका पडला की त्यांच्या संवेदना बधीर झाल्या. शरमेनंच मान खाली घातली असं हे आहे पण सगळेच लोक हा प्रश्न ऐकण्यात धन्यता मानत नव्हते तर काही जण क्षीण आवाजात का होईना विचारू लागले की त्यांचं जाऊ द्या तुम्ही पाच वर्षांत काय केलं ते सांगा. क्षीण आवाज एवढ्याचसाठी की, मोठ्यानं प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही ठरवतात. विरोधी पक्षांनी नवी घोषणा काढली. चौकीदार चोर है... आता मात्र भाजपची खूपच पंचाईत झाली. या प्रश्नाचं उत्तर देण्याऐवजी म. गांधी, मोतीलाल नेहरू, इंदिरा गांधी यांनी काय केलं यावर हे निबंधलेखन करू लागले. पोपटाची भाषा शिकलेल्या फडणवीस, सीतारामन आणि पूर्वाश्रमीची नटी आदी सगळे एकत्र येऊन जोरजोरात निबंध वाचू लागले. लोकशाहीचं एक असतं आणि ते म्हणजे लोक कधी ना कधी स्वतःची मन की बात बोलून बसतातच. आताही तसंच होऊ लागलंय आणि मते पळवण्यासाठी अजून काय काय करायचं या प्रश्नानं भाजपला घेरलंय.

दहा टक्क्यांचं आरक्षण अचानक जाहीर करण्यामागं मोदींचे काही डाव होते. डाव एक : आपल्या प्रस्तावाला विरोधक विरोध करतील. राजकीयदृष्ट्या ते अडचणीत येतील आणि जनहिताचे रक्षक म्हणून आपण लाभार्थी होऊ. डाव दोन : दहा टक्के वर्ग पूर्णपणे मते घेऊन भाजपमागं उभा राहील. डाव तीन : आपण जातीवर धोरणं ठरवत नाही तर आर्थिक मागासलेपण प्रमाण मानतो यावर विश्वास ठेवतील वगैरे वगैरे. पण यातील बहुतेक डाव अयशस्वी झाले. विरोधकांनी लोकसभेत किंवा राज्यसभेत किंवा बाहेर मोदींच्या नव्या कायद्याला विरोध केला नाही. विरोध केला असता तर मोदी हिरो झाले असते. मीच आरक्षण मंजूर करून घेतलं असं म्हणाले असते. पण आता तसं होऊ शकणार नाहीय. देशाच्या इतिहासात घटनादुरुस्ती आठ-दहा दिवसांच्या आत होण्याची एक दुर्मिळ गोष्ट मोदींनी घडवून आणली. दहा दिवसांत दहा टक्के आरक्षण. ब्राम्हणांसह अन्य उच्च जातीयांना आरक्षण म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या सवर्णांना आरक्षण. म्हणजेच दस का दम...

आता या दहा टक्क्यांत दहा टक्के जादा मते असं गृहित धरलं तरी ते वास्तवात खरं आहे का, याचा विचार करू या. एक : यापूर्वीच काही राज्यांत क्षत्रिय, ठाकूर वगैरे उच्च जातींना आरक्षण मिळालं आहे. महाराष्ट्रातही ते मिळालं आहे. दोन : या दहा टक्क्यांत ब्राह्मण चार टक्के आहेत. त्यांना आरक्षण दिल्यानं वेगळी चार टक्के मतं मिळतील, असं समजण्याचं कारण नाही. कारण या चार टक्के ब्राह्मणांतले साडेतीन टक्के ब्राह्मण तरी भाजप आणि संघाबरोबरच आहेत. त्यांना आरक्षण दिलं काय किंवा नाही काय ते भाजपबरोबर असणार आहेत. आता राहिले तिसरे मुस्लिम आणि ख्रिस्ती. ते भाजपबरोबर जातील आणि आरक्षणामुळे जातील अशी कल्पनाच करणं चुकीचं आहे. हिंदुत्ववाद्यांना ख्रिस्ती आणि मुस्लिम नेहमी खलनायकाच्या रूपात लागतात. त्यामुळेच हे नायक बनतात. यांना आपलं नायकत्व टिकवायचं असंल तर त्यांना खलनायकाची गरज असणार आहे. विशेष म्हणजे, नायक बनू पाहणाऱ्यांनीच अगोदर खलनायक तयार केला. मग संघर्ष चालू केला. सबब, मुस्लिम आणि ख्रिस्ती लोकांची मतं भाजपच्या पारड्यात कशी पडणार? दहा टक्क्यांत दम असून चालणार नाही तर गोडवा असण्याची आवश्यकता आहे. म्हणजे दस का दम आणि चिनी कम म्हणजे साखर कमी असं काही तरी घडणार आहे यात शंका नाही. देवाचं कार्ड चालंल की नाही याची धास्ती असल्यानंच आता राखीव जागांचं कार्ड वापरण्यात आलं आहे. शिक्षणाचा हक्क घटनेत बसायला पन्नास वर्षे लागली. माहितीचा अधिकार व्हायला साठेक वर्षे लागली. महिलांसाठी संसदीय व्यवस्थेत आरक्षण द्यायचा कायदा २५-३० वर्षे झाला तरी लटकलेलाच आहे आणि दहा टक्के आरक्षणाचा घटनादुरुस्तीचा कायदा मात्र फक्त दहा दिवसांत मंजूर करून छाती बडवण्याचा खेळ सुरू झाला. नर्सरीतल्या पोरांच्या बडबडगीतांच्या पुस्तकाचं एखादं पान बदलावं तशी बघता बघता घटनादुरुस्ती झाली. सगळ्याच राजकीय पक्षांच्या ओठांना वरच्या लोकांच्या मताचं पाणी सुटलं आणि कायदा मंजूर झाला. आता ओपनमध्ये कोण राहणार? शंभर टक्के जागांचं असं जातवार वाटप झाल्यावर राखीव जागांच्या मूळ तत्वाला अर्थ तरी काय राहणार? राखीव जागा म्हणजे सामाजिक न्याय आहे. व्यवस्थेत ज्यांची वर्षानुवर्षे सर्वांगिण पिळवणूक होत राहिली त्यांच्यासाठी हा सामाजिक न्याय आहे. वाढत्या विषमतेनं ही व्याख्या खाऊन टाकली. गेल्या चार-पाच वर्षांत दोन-तीन कोटी नोकऱ्या खासगीकरणात आणि यांत्रिकीकरणात खलास झाल्या असतील, तर दस का दमचा कुणाला लाभ होणार? हेच नवे सरकारी जावई उद्या विचारतील बोलाचा भात आणि बोलाची कढी खाऊन कोणी तृप्त झाला आहे का? राखीव जागांतलं अन्नपाणी नव्यानं तयार होण्याची शक्यता यांनीच संपवली. पण नसलेल्या अन्नासाठी खोटी निमंत्रण देण्यात मोदी पटाईत आहेत. उद्या ते आणखी काही तरी काढतील. उदा. सुलभ इंटरनॅशनल शौचालयात मुक्त प्रवेश...

●●●



२०१४ पासून दलित उद्योजकांच्या अडचणीत भर, विद्यार्थ्यांच्या शिक्षणातही अनंत अडथळे...

# दलितांचे सक्षमीकरण कसले ? हा तर भाजपचा राजकीय फंडा

**भाजपने २०१४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात दलितांच्या सक्षमीकरणाचं आश्वासन दिलं होतं. परंतु शिष्यवृत्तीस विलंबामुळे ५.१ दशलक्ष विद्यार्थ्यांना अडचणींना तोंड द्यावं लागणं दलित उद्योजकांप्रती शासकीय आणि सामाजिक स्तरावरील भेदभाव कायम असणं आणि सरकारची खासगीकरणास पूरक भूमिका या बाबी म्हणजे राजकारणासाठी दलितांचा वापर केला जात असल्याचे द्योतक आहे.**



प्रो. सुखदेव थोरात

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक मुद्यांवरचे विचार भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीहून खूपच वेगळे असल्याचे चांगलेच माहीत असलेल्या 'भाजप'ने डॉ. आंबेडकरांचा पुरेपूर वापर करण्याचे प्रयत्न केले, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. विशेषतः दलित आणि दडपल्या गेलेल्या जातींना प्रोत्साहन देऊन पुढे आणण्यासाठी त्यांना डॉ. आंबेडकरांपासून प्रेरणा मिळाली, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले त्यावरून हे स्पष्टपणे दिसते. दलितांच्या उद्धारासाठी आपण बांधील असल्याची जाहीर वचने देऊन डॉ. आंबेडकरांचा वापर करून घेण्याची प्रत्यक्ष कृती करण्यात आली. भाजपच्या २०१४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात दलितांसाठी अनेक गोष्टी करण्याची आश्वासने देण्यात आली होती. 'एससीज, एसटीज अँड अदर सेक्शन्स : सोशल जस्टीस अँड एम्पॉवरमेंट' (अनुसूचित जमाती,अनुसूचित जाती आणि इतर विभाग : सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण) या शीर्षकाच्या विभागात अनुसूचित जातींच्या ('एससीं'च्या) विकासासाठीचा नवीन दृष्टिकोन मांडण्यात आला होता. भाजपने सामाजिक न्याय आणि सामाजिक समरसता या तत्त्वांचे अनुसरण करून सवर्ण आणि दलित यांच्यातील दरी दूर करण्याचे आश्वासन दिले होते. सामाजिक न्यायाला आर्थिक न्यायाची आणि राजकीय सक्षमीकरणाची जोडही देण्यात येणार होती. 'आम्ही समाजातील शोषित, वंचित विभागांच्या सक्षमीकरणावर भर देऊ' असेही त्यांनी म्हटले होते. यात असेही म्हटले गेले होते की, शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेचे साधन किंवा उदरनिर्वाह यांमध्ये समान संधी देणारी सक्षम परिसंस्था निर्माण करण्यासाठी पावले उचलली जातील. एससी आणि एसटीच्या लोकांच्या सुरक्षिततेची हमी देण्यास आणि विशेषतः

दलितांवरील अत्याचाराला प्रतिबंध करण्यास आम्ही सर्वोच्च प्राधान्य देऊ.

### या जाहीरनाम्याच्या अनुषंगाने कृती करण्यासाठी पुढील विशिष्ट क्षेत्रांची निवड करण्यात आली होती

- **एससींसाठी शिक्षण आणि उद्योजकता यांच्या परिसंस्थेची निर्मिती करण्यास उच्च प्राधान्य दिले जाईल.**
- **सर्व पातळ्यांवरच्या अस्पृश्यता निर्मूलनास भाजप कटिबद्ध आहे.**
- **हाताने मैला उचलून स्वच्छतागृहे साफ करण्याच्या प्रथेच्या निर्मूलनास भाजप कटिबद्ध आहे.**
- **या लोकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर आणण्यासाठी भाजप अधिक प्रभावी मार्गांचा वापर करेल.**
- **एससींच्या योजनांसाठी व कार्यक्रमांसाठी दिलेल्या निधींचा योग्य वापर केला जाण्याची भाजप हमी देईल.**
- **घरे (निवारा), शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकास यांसाठी मिशन म्हणून प्रकल्प हाती घेतले जातील.**
- **आरोग्य, शिक्षण आणि कौशल्य विकास या बाबतीत मुलांवर व त्यातही मुलींवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल.**

आर्थिक सक्षमीकरणात गरिबी कमी करण्यासाठी शिक्षणाला, उपजीविकेच्या साधनांना, उद्योजकतेला, कौशल्य विकासाला आणि गृहनिर्माणाला प्राधान्य देऊन उपजीविकेच्या साधनांवर भर देण्यात आला होता. सामाजिक सक्षमीकरणात एससींवर केल्या जाणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यास प्राधान्य देऊन आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन करून एससींना संरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

भाजपने आपल्या जाहीरनाम्यात प्रस्तावित केलेल्या आश्वासनांच्या फलितांचे मूल्यमापन करण्यासाठी आपल्याला २०१४ ते २०१८ या कालावधीतील आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या निकषांसंदर्भातील माहितीची गरज आहे. दुर्दैवाने, या कालावधीतील आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या अनेक निकषांसंदर्भात माहिती उपलब्ध नाही. म्हणून आपण एससींसंदर्भात सरकारने कोणत्या धोरणात्मक कृती केल्या त्याची चर्चा करूया आणि ज्या ठिकाणी माहिती उपलब्ध असेल तिथे तिचाही वापर करूया.

### धोरणे काय आहेत?

**विशेष घटक योजनेअंतर्गत आर्थिक तरतूद : २०१४ /१५ ते २०१८/१९ :** अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजनेअंतर्गत (एससीपी) करण्यात आलेली तरतूद हे अनुसूचित जातींच्या उद्धाराचे मुख्य साधन आहे. म्हणून सर्वसामान्यपणे केंद्र सरकारच्या वार्षिक अर्थसंकल्पात एससींसाठी विशेष विभाग योजनेअंतर्गत (एससीपी) करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीतून सरकारच्या प्राधान्यांचे प्रतिबिंब पडते. गेल्या पाच वर्षांत विशेष विभाग योजनेअंतर्गत (एससीपी) करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतून एससींच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी




महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्तीत वाढ करावी या मागणीसाठी देशभरा

भाजपने २०१४ च्या जाहीरनाम्यात दिलेल्या प्राधान्यांचे प्रतिबिंब पाहण्याचा कसून प्रयत्न केला तरीही ते दिसत नाही. केंद्र सरकारने केंद्रीय (संघराज्यात्मक) मंत्रालयांमध्ये एससींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजे १६.६ टक्के एवढ्या निधीची एससींच्या विकासाकरिता एससीपीवर तरतूद करण्याची गरज होती. एससीपीअंतर्गत सुमारे १६ टक्के तरतुदीची अपेक्षा होती. मात्र कमी तरतुदीची पूर्वीची समस्या या सरकारच्या पाच वर्षांच्या कालावधीतही तशीच पुढे सुरू राहिली. अनुसूचित जातीसाठीच्या योजनांवरच्या तरतुदीचे एकूण योजनांवरील तरतुदीशी असलेले गुणोत्तर (केंद्रीय योजनांवरच्या आणि केंद्राकडून प्रायोजित करण्यात आलेल्या) हे २०१४-१५ मध्ये ८.७९ टक्के, २०१५-१६ मध्ये ६.६३ टक्के, २०१६-१७ मध्ये ७.०६ टक्के, २०१७-१८ मध्ये ८.९१ टक्के आणि २०१८-१९ मध्ये ६.५५ टक्के होते. त्यामुळे २०१४ ते २०१८ या कालावधीतील एससीपीवरच्या सरासरी निधीची तरतूद ही जेमतेम ७ टक्के केल्याचे दिसते. याचा अर्थ देशातील एससींच्या १६.६ टक्के लोकसंख्येचा विचार करता ही तरतूद सुमारे १० टक्क्यांनी कमी आहे. अशा प्रकारे एससीपींसाठीच्या तरतुदीत घट किंवा कमतरता झाल्याचे स्पष्ट दिसते. दलित मानवाधिकाराविषयीच्या राष्ट्रीय मोहिमेच्या (नॅशनल कॅम्पेन ऑन दलित ह्युमन राईट्स, एनसीडीएचआर) दलित आर्थिक अधिकार आंदोलनाने (दलित इकनॉमिक राईट्स मूव्हमेंट) केलेल्या हिशेबानुसार, दलितांसाठी करण्यात आलेली तरतूद योजनांवरील तरतुदींच्या १० टक्क्यांनी कमी आहे. प्रत्यक्षात या तरतुदीत अपेक्षेहून २७५२.७२ अब्ज रुपयांची कमतरता आहे. वास्तविक, ही टक्केवारी २०१७-१८ च्या ८.९१ टक्क्यांवरून २०१७-१८ मध्ये ६.५५ टक्क्यांवर आणि २०१८-१९ मध्ये याहूनही खाली घसरून ती ६.६३ टक्क्यांवर पोहचली आहे. (आलेख १ पहा). एवढ्या कमी प्रमाणात करण्यात आलेल्या तरतुदीचा अनेक योजनांच्या प्रगतीवर नक्कीच परिणाम होईल. (दलित मानवी हक्क राष्ट्रीय मोहीम, दलित आर्थिक आंदोलन २०१८.)

भाजप सरकारने एससीपीशी संबंधित असलेले आणखी काही अडथळा निर्माण करणारे निर्णय घेतले आहेत. २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील एससीपीवरील माहितीवरून आधीच्या अर्थसंकल्पांच्या तुलनेत या वर्षी काही लक्षणीय बदल




त अशी आंदोलनं होत आहेत. (संग्रहित छायाचित्र)




**टीप : सीएस : केंद्रीय योजना, सीएसएस : केंद्र प्रायोजित योजना**

(स्रोत : दलित आदिवासी बजेट ॲनालिसीस २०१८-१९, एनसीडीएचआर)

झाल्याचे दिसते. अनुसूचित जाती विशेष घटक (एससीपी) चे नाव यंदाच्या आर्थिक वर्षात बदलले गेले असून आता त्याला 'अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी केलेली तरतूद' असे म्हटले गेले आहे. या नवीन संज्ञेमुळे 'अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजने'अंतर्गत करावयाच्या 'खास तरतुदींवरून' लक्ष विचलित करण्यात आले आहे. याआधी १९९८ मध्ये समाजकल्याण विभागाचे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभाग असे नामकरण करण्यात आले, हे आपल्याला आठवत असेलच. यामागे समाजकल्याणाच्या साध्या कल्पनेऐवजी उपकाराच्या भावनेवर भर दिल्याप्रमाणे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणावर पूर्ण लक्ष एकवटण्यावर स्पष्ट भर देणे हा हेतू होता. अशा प्रकारे नावात बदल करण्यामागे कोणताही हेतू असला तरी त्यामुळे एससीपीने दलितांच्या सक्षमीकरणावर आणि त्यांना सामाजिक न्याय देण्यावर जो भर दिला होता, त्यापासून लक्ष विचलित होते हे निश्चित! याखेरीज 'एससीपीअंतर्गत विशेष तरतूद' असा खास उल्लेख नसल्यामुळे आणि तरतुदीच्या नेमक्या अटी नसल्यामुळे आता विविध मंत्रालयांकडून किंवा विभागांकडून 'अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी' अशा शीर्षकांतर्गत ज्या तरतुदी केल्या जातील त्यांचे मूल्यमापन करण्याबाबत स्पष्टताही नाही. (सीबीजीए, २०१७, ५०-५१) यात नियोजित आणि अनियोजित खर्च एकत्रितपणे केल्या जाण्याच्या अप्रत्यक्ष परिणामाचीही भीती आहे आणि अर्थातच, ही काळजीची बाब आहे. २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात सरकारने अर्थसंकल्पाचे नियोजित आणि अनियोजित खर्चाचे घटक एकत्रित केले होते. एससींच्या विकासासाठी एससीपीअंतर्गत केली जाणारी तरतूद ही नियोजित खर्चांतर्गत येते, हे आपल्याला माहिती आहे. वेतन (पगार), प्रशासकीय खर्च यांसारखे काही अनियोजित खर्च एकूण खर्चाचा भाग म्हणून दाखवले जाणे हा विकासात्मक (नियोजित) आणि अ-विकासात्मक (अनियोजित) खर्च एकमेकांत मिसळले जाण्याचा एक संभाव्य परिणाम असू शकतो. त्यामुळे एससींच्या आर्थिक विकासाशी संबंधित योजनांवरच्या प्रत्यक्ष खर्चात घट होण्याची शक्यता आहे आणि खरे तर २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात हे घडले आहे.

## शैक्षणिक आर्थिक योजनांवरचा परिणाम

एससीपीवर करण्यात आलेल्या कमी तरतुदीमुळे केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागाकडून अर्थसाहाय्य दिल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या योजनांवर विपरीत परिणाम झाला आहे. यात शिष्यवृत्तींच्या योजनांचा समावेश होतो. एससींना मॅट्रिकनंतर दिली जाणारी शिष्यवृत्तीची योजना म्हणजेच 'पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४५ मध्ये सुरू केली. एससीपीअंतर्गत कमी तरतुदी झाल्यामुळे शिष्यवृत्तीच्या तरतुदींवर वाईट परिणाम झालेल्या योजनांमध्ये या योजनेचाही समावेश होतो. पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेच्या सगळ्या मर्यादा लक्षात घेतल्या तरीही मॅट्रिकनंतर दलितांच्या उच्च शिक्षणाचा विकास करणारा तो एक प्रमुख स्रोत होता, हे मान्य करावेच लागेल. गरीब एससी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन खर्चाबरोबरच या योजनेतून त्यांची फीही दिली जाते. गेल्या लागोपाठ तीन वर्षांत केंद्राकडून राज्यांना या शिष्यवृत्तीपोटी दिला जाणारा सुमारे ८० अब्ज रुपयांहून अधिक निधी मिळण्यास विलंब झाल्यामुळे किंवा तो प्रलंबित असल्यामुळे देशभरातील सुमारे ५.१ दशलक्ष एससी विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. शिवाय २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात एससींच्या शिष्यवृत्तीसाठी फक्त ३० अब्ज रुपयांचीच तरतूद करण्यात आली आहे. शिष्यवृत्ती दिली न गेल्यामुळे महाविद्यालयांमधून आणि विद्यापीठांतून एससीच्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचे माजी सचिव पी.एस. कृष्णन यांनी ९ नोव्हेंबर २०१६ रोजी अर्थमंत्र्यांना एक पत्र लिहून पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिपच्या ११० अब्ज रुपयांच्या थकबाकीची रक्कम मागितली होती. या रकमेमुळे फारशी वित्तीय तूट येणार नाही असेही त्यांनी म्हटले होते. (कृष्णन, पी.के. २०१८). परंतु सरकारला ५.१ दशलक्ष अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याहून आर्थिक तुटीची जास्त काळजी आहे असे दिसते. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाला (युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनच्या म्हणजेच यूजीसीच्या) पीएच. डी. चा अभ्यास करणाऱ्या एस.सी.च्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या नॅशनल फेलोशिप फॉर शेड्यूल्ड कास्ट अँड शेड्यूल्ड ट्राइब्ज (आधीची राजीव गांधी फेलोशिप) चा निधी देण्यात दिरंगाई झाली आहे.

त्यामुळे संशोधन करणाऱ्या देशभरातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना अत्यंत हालअपेष्टांना तोंड द्यावे लागत आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण हे इतर जातींच्या आणि उच्च जातीच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत अतिशय कमी आहे. उदाहरणार्थ, २०१४ मध्ये उच्च शिक्षणाला प्रवेश घेतलेल्या एससीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २२ टक्के होते. त्यावेळी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या ओबीसी (इतर मागास प्रवर्गातील) विद्यार्थ्यांचे प्रमाण २९ टक्के आणि इतर सवर्णांचे प्रमाण ४१ टक्के होते. (थोरात आणि खालिद २०१८). भाजपच्या २०१४ च्या राजीनाम्यात एससी आणि इतरांमधील शैक्षणिक तफावत कमी करण्याचे उद्दिष्ट होते. त्याचा विचार करता सरकारने फेलोशिप योजनांवरची तरतूद कमी करण्याऐवजी ती वाढवावयास हवी होती.

अगदी अलीकडेच केंद्रीय विद्यापीठांत विद्यापीठीय पातळीवर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या सध्याच्या पद्धतीच्या विरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयाने निकाल देऊन त्याऐवजी विभागांच्या (डिपार्टमेंटच्या) पातळीवर आरक्षण देण्याचा निर्णय दिला. विद्यापीठाच्या स्तरावर आरक्षण ठेवण्याची संकल्पना उपयुक्त असल्याचे दिसून आले होते, कारण विभागीय पातळीवरच्या आरक्षणामुळे कमी प्रतिनिधित्व मिळते. केंद्र सरकारने या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याऐवजी अलाहाबाद उच्च न्यायालयाला यूजीसीच्या आदेशाच्या माध्यमातून पाठिंबा दिला. आधीच विद्यापीठीय पातळीवरील एससी/ एसटीच्या प्राध्यापकांचे प्रमाण कमी आहे. त्यातच विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या आरक्षणांच्या जागांमध्ये घट होण्याची शक्यता असलेल्या निर्णयाबाबत सरकारने असंवेदनशीलता दाखवली.

## दोन आत्महत्यांची गोष्ट



**रोहित वेमुला**



**मुथुकृष्णन जीवनांथामिन**

उच्च शिक्षण देणाऱ्या राज्य विद्यापीठांसारख्या संस्थांमध्ये दलितांच्या बाबतीत भेदभाव केला जाण्याची समस्या जुनीच आहे. भाजपच्या राजवटीत या समस्येत मोठी वाढ झाली आहे. आधीच्या सरकारने ही समस्या ओळखली होती. मंत्री कपिल सिब्बल यांच्या नेतृत्त्वाखालील मानव संसाधन विकास मंत्रालयाने या बाबतीत पुढाकार घेतला होता आणि यूजीसीला उच्चतर शिक्षण संस्थांमध्ये दलित आणि इतर वंचित विद्यार्थ्यांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या जातीय भेदभावासंदर्भात नियम संमत करण्यास यूजीसीला सांगितले होते. कदाचित




या मंत्र्यांच्या कायदेविषयक पार्श्वभूमीमुळे त्यांना या समस्येचे गांभीर्य समजून घेण्यास साहाय्य झाले असावे. हे नियम अत्यंत घाईघाईने संमत करण्यात आले असले तरीही त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली नाही. कालांतराने हेही स्पष्ट झाले की अशा प्रकारचे जातीय भेदभाव करण्यास प्रतिबंध करणारे नियम आहेत हे अनेक संस्थांना माहितीच नव्हते. हैदराबाद विद्यापीठात २०१६ च्या जानेवारीत रोहित वेमुला या दलित विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येमुळे आणि त्यापाठोपाठ २०१७ च्या मार्चमध्ये दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीतील मुथुकृष्णन जीवनांथामिन या दुसऱ्या हुशार संशोधक दलित विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येमुळे जातिभेदाच्या सातत्यपूर्ण समस्येने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. रोहित वेमुलाच्या वादग्रस्त आत्महत्येमुळे देशभरातील दलितांमध्ये आणि समाजाच्या इतर भागांतही संतापाची लाट उसळली. विद्यापीठाच्या उपकुलगुरूंच्या आणि केंद्रीय कायदामंत्र्यांच्या विरोधात दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटला दाखल करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या उपकुलगुरूंना कामावरून काढून टाकण्याची मागणी केली असली तरी त्यांना रजेवर पाठवण्यात आले. मानव संसाधन विकास मंत्रालयाने ('एमएचआरडी'ने) 'उपकुलगुरूंना परत आणले जाणार नाही आणि गुन्हेगारांना दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली शिक्षा केली जाईल, तसेच दलितांना आणि इतर दुर्बल विभागांतील विद्यार्थ्यांना दिले जाणारे उपचारात्मक साहाय्य वाढवले जाईल' असे आश्वासन दिल्यानंतर अखेरीस विद्यापीठाचे कामकाज पुन्हा सुरू झाले.

आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना सरकारने आणखीही काही आश्वासने दिली होती. निर्णयप्रक्रियेत दलित विद्यार्थ्यांचा आणि दलित प्राध्यापकांचा वाढता सहभाग असेल, अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या राष्ट्रीय शिष्यवृत्त्या नियमितपणे दिल्या जातील. विद्यापीठांमध्ये नागरिकशास्त्राच्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जात आणि लिंग




भेदभावाविषयी संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी खास शैक्षणिक कार्यक्रम राबवले जातील, अशा इतर हमीही सरकारने विद्यार्थ्यांना दिल्या होत्या. मात्र सरकारने या हमीकडे साफ दुर्लक्ष केले आणि काही हमींच्या बाबतीत चक्क विरुद्ध गोष्टी केल्या; तर इतर हमींच्या बाबतीत मौन पाळले. मंत्र्यांना आणि उपकुलगुरूंना दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या खटल्यातून वाचवण्याच्या प्रयत्नांत या कायद्यांतर्गत खटला दाखलच होऊ नये म्हणून रोहित वेमुला हा ओबीसी होता; दलित नव्हता हे सिद्ध करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले. शिवाय उपकुलगुरूंनाही सन्मानाने परत आणण्यात आले. उर्वरित मागण्या पूर्ण करण्याच्या संदर्भात कोणताही पुढाकार घेण्यात आला नाही. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील संशोधक आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी मुथुकृष्णन याच्या आत्महत्येनंतर एमएचआरडीसाठी आणखी एक संधी पुढे आली होती. मात्र त्यावेळीही अशीच आश्वासने देण्यात आली; परंतु ती पाळण्यात आली नाहीत.

त्याऐवजी एससी/एसटी/ओबीसी यांच्या हिताला मारक ठरणारे काही निर्णय घेण्यात आले. केंद्रीय विद्यापीठांच्या प्रत्येक प्राध्यापकाकडे एम.फिल. किंवा पीएच.डी. च्या फक्त सहाच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जावा असा नियम करण्यात आला. हा निर्णय एससी/एसटी/ओबीसी विद्यार्थ्यांच्या हिताच्या पूर्णपणे विरोधात होता. या नियमामुळे केंद्रीय विद्यापीठांतील प्रवेशांमध्ये मोठी घट झाली. उदाहरणार्थ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठात २०१६-१७ च्या ५०२ वरून एकूण प्रवेशांची संख्या २०१७-१८ मध्ये १३० वर घसरली. त्याचप्रमाणे एससीच्या विद्यार्थ्यांना घेण्याचे प्रमाणही घसरले. २०१६-१७ मध्ये १४१ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता, हा आकडा २०१७-१८ मध्ये ३७ पर्यंत खाली आला. एस.टी.च्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणातही अशीच घट झाली आणि या कालावधीत ही संख्या ७५ वरून १६ वर घसरली; तर ओबीसी विद्यार्थ्यांच्या संख्येत याच कालावधीत २६५ वरून ७६ पर्यंत घट झाली. हे टाळण्यासाठी यूजीसी कोणत्याही वेळी नियमात बदल करू शकत होती. परंतु यात आणखी एक अनुत्तरीत प्रश्न तसाच उरतो, तो म्हणजे काही जणांकडे सहाऐवजी १५-१५ विद्यार्थी कसे काय होते? याचे कारण आधीच्या सरकारच्या निर्णयात सापडू शकते. आधीच्या सरकारने ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले होते आणि सर्वसामान्य वर्गवारीतील (एससी/एसटी/ओबीसी या गटांत न येणाऱ्या) विद्यार्थ्यांच्या प्रवेशात घट होऊ नये म्हणून त्या सरकारने धाडसी निर्णय घेऊन आणखी २७ टक्के जागाही दिल्या होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशात ५४ टक्के एवढी प्रचंड मोठी वाढ झाली होती. असे क्वचितच घडते. त्यामुळे एकेका प्राध्यापकाकडे एम.फील. किंवा पीएच.डी.चे सहाहून अधिक विद्यार्थी होते. यासाठी परिस्थिती नियमित होईपर्यंत सरकारने प्रतिप्राध्यापक सहा विद्यार्थी या निर्णयाचे पुनरावलोकन करावयास हवे होते. ते केले गेले नाही. त्याऐवजी त्यांनी ७० टक्के प्रवेशांत कपात केली. दोन शासनांच्या दृष्टिकोनात किती हा विरोधाभास होता! आधीच्या सरकारने ओबीसी आरक्षणाचे एससी/एसटी/ओबीसी नसलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशावरील नकारात्मक परिणाम टाळण्यासाठी आणि त्यांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी नियम बदलला होता. नवीन राजवटीत एससी/एसटी/ओबीसी विद्यार्थ्यांचे नुकसान करून नियमाची अंमलबजावणी करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन या नियमात बदल करण्याच्या पर्यायाचा वापर करावयास हवा होता, कारण नियम हे लोकांचे भले करण्यासाठी असतात; वाईट करण्यासाठी नव्हे.

आपल्याला हे माहिती असलेच पाहिजे की, एससी /एसटी/ओबीसी विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे प्रमाण इतरांच्या तुलनेत कमी आहे (थोरात आणि खालिद २०१८). म्हणून त्यांचे प्रवेश वाढवण्याची गरज होती. परंतु प्रत्यक्षात याच्या विरुद्ध घडले.

एससी/एसटीच्या विद्यार्थ्यांना आणखी यातना देणारा एक निर्णय घेतला गेला. एम.फिल किंवा पीएच. डीच्या प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भातील हा नियम होता. हा नियम २०१६ मध्ये तयार करण्यात आला. त्यानुसार प्रवेशासाठी प्रथम प्रवेश परीक्षा घेण्यात येणार होती. तिच्यात किमान ५० टक्के गुण मिळाले तरच विद्यार्थी मुलाखतींसाठी पात्र ठरणार होता आणि पूर्णपणे मुलाखतींच्या आधारावरच विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड केली जाणार होती. प्रवेश परीक्षेच्या आधारेच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार होता. या सगळ्यात एससी/एसटीच्या विद्यार्थ्यांना गुणांत सवलत देण्याची तरतूद मागे घेण्यात आली होती. वास्तविक, एससी/एसटी/ओबीसी विद्यार्थ्यांना मुलाखतीत कमी गुण मिळत होते आणि फक्त लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारावरच त्यांना प्रवेश मिळत होता, कारण ते मुलाखतींच्या दरम्यान भेदभावाचे पुरावे देत होते. दुसरीकडे, सरकार याच्या बरोबर विरुद्ध गोष्ट करत होते. सरकारने फक्त मुलाखतींच्या आधारावरच प्रवेश देण्याचा नियम केला होता. एससी /एसटी/ओबीसी विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा आणणाऱ्या उच्च शिक्षणाविषयीच्या २०१४ नंतरच्या अशा प्रकारच्या धोरणात्मक निर्णयातून एससी/एसटी

विद्यार्थ्यांपर्यंत कोणत्या प्रकारचा संदेश पोहचला होता? सरकारने याचा विचार करून निर्णय घेतला पाहिजे. या पुराव्यामुळे सरकार एससी/एसटी/ओबीसी यांच्या हिताला बाधा आणणारा आपला हा निर्णय बदलेल आणि २०१४ च्या जाहीरनाम्यात देण्यात आलेले आश्वासन पाळेल, अशी आशा आहे.

## अनुसूचित जातींमधील उद्योगांची निराशा

भाजपच्या २०१४ च्या जाहीरनाम्यात अनुसूचित जातींमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हे प्राधान्य देण्यात आलेले दुसरे क्षेत्र होते. याचा पाठपुरावा म्हणून केंद्र सरकारने खास योजना विकसित केली. 'एससी/एसटी हब' या नावाची ही खास योजना एससींच्या उद्योगांवरील मालकीत वाढ करण्यासाठी तयार करण्यात आली होती आणि तिच्यासाठी ४.९९ अब्ज रुपयांची तरतूदही करण्यात आली होती. या योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाकडे ('एमएसएमई'कडे) सोपवण्यात आली होती. एमएमएमईच्या धोरण तयार करणाऱ्यांनी घाईघाईत काम केलं आणि कृष्णवर्णीयांसाठी (ॲफ्रो-अमेरिकनांसाठी), लॅटिनांसाठी आणि महिलांसाठी अमेरिकेत तयार करण्यात आलेल्या धोरणांवरून धडे शिकण्यासाठी त्यांनी अमेरिकेकडे धाव घेतली. त्यानंतर या मंत्रालयाने आंतरराष्ट्रीय सल्लागार कंपनीची मदत घेतली. त्यासाठी त्यांना मासिक ४.६ दशलक्ष रुपये एवढी भरमसाट फी दिली. त्यापोटी तीन वर्षांत त्यांना १५० ते १८० दशलक्ष रुपये द्यावे लागले. सल्ला घेण्यासाठी एकही भारतीय संघटना योग्य आहे असे मंत्रालयाला वाटले नाही. अशा प्रकारे एमएमएमईकडून एससी/एसटीना शिक्षण देण्यासाठी गुप्त बैठका व चर्चासत्रं घेऊन आणि खासगी कंपन्यांकडे काम सोपवून (कामाचे आऊटसोअर्सिंग करून घेण्यावर) हा निधी वाया घालवण्यात आला. खरेदीच्या धोरणांतर्गत एमएसएमईनने एससी/एसटीच्या उद्योगांकडून चार टक्के खरेदी करण्याची गरज होती. परंतु हे गुणोत्तर ०.३९ टक्क्यांवर घसरलं. एससी /एसटी हबच्या आघाडीवर असा दुःखद प्रकार घडला आहे.

एससी/एसटी हबअंतर्गतचं सध्याचं धोरण हे एससीच्या उद्योगांची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन तयार करण्याची गरज होती. २०१३ च्या एंटरप्राईज सेन्ससनुसार, देशात सुमारे ५.५२ अब्ज खासगी उद्योग आहेत आणि त्यांच्यापैकी ५.९७ दशलक्ष उद्योग हे एससींच्या मालकीचे आहेत. याचा अर्थ, एकूण खासगी उद्योगांच्या ११.४ टक्के उद्योग एससींच्या मालकीचे आहेत (इकॉनॉमिक सेन्सस, २०१३). एससींकडून चालवल्या जाणाऱ्या उद्योगांमध्ये कुटुंबांच्या श्रमशक्तीवर चालणाऱ्या लहान घरगुती उद्योगांचं प्रमाण प्रचंड म्हणजे ८३ टक्के आहे. त्यांच्यापैकी फक्त १६ टक्के उद्योगांमध्ये सहा किंवा त्याहून कमी संख्येने कामगार काम करतात. १ टक्क्याहून कमी (०.९ टक्के) उद्योगांमध्येच सहाहून अधिक कामगार काम करतात. द इकॉनॉमिक सेन्सस, २०१३ असेही दर्शवतो की, एससींच्या उद्योगांपैकी बहुसंख्य उद्योगांकडे स्वतःची औपचारिक कायमस्वरूपी जागा नाही किंवा घराच्या आणि घरगुती परिसराच्या बाहेर त्यांची उद्योगासाठी स्वतंत्र यंत्रणाही नाही. तसंच त्यांच्याकडे बँक खातंही नाही. कमी उत्पन्नामुळे ते गरिबीत खितपत राहतात. २०११-१२ मध्ये सुमारे २४ टक्के एससी अकृषक स्वयंरोजगारीत लोक गरीब होते. हे प्रमाण स्वयंरोजगारीत उच्चवर्णीयांच्या तुलनेत उच्चतर आहे. सरकारने या ५.९७ दशलक्ष एससीच्या उद्योगांसाठी नियोजन करावयास हवे होते. या एससीच्या उद्योगांना विविध बाजारपेठीय आणि अबाजारपेठीय संस्थांमध्ये भेदभावालाही तोंड द्यावे लागते. २०१३ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक सर्वेक्षणातून एससीच्या उत्पादकांना आणि सेवा पुरवठादारांना ग्रामीण भागात तोंड द्याव्या लागणाऱ्या भेदभावाचे स्वरूपही उघड करण्यात आले होते. (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज, २०१३.) या सर्वेक्षणात एससींच्या ३३६ घरगुती व्यवसायांचा अभ्यास करण्यात आला. यात किराणा मालाची दुकाने, रेस्टॉरंटसह खानावळी, वाहतूक व्यवसाय (कार, जीप, रिक्षा आणि सायकल रिक्षा) यांचा समावेश होता. किराणा मालाच्या दुकानदारांनी दिलेल्या प्रतिसादांचा विचार करता, त्यांच्यापैकी ३७ टक्के प्रतिसादकर्त्यांनी उच्चवर्णीय लोकांना आपल्या दुकानातून केवळ काही पाकिटबंद मालाखेरीज अन्य माल खरेदी करण्याची इच्छा नसते, असे सांगितले. किराणा मालाचे दुकानदार असलेल्या अनुसूचित जातीच्या दुकानदारांपैकी २८ टक्के मालकांनी त्यांच्या जातीच्या पार्श्वभूमीमुळे त्यांच्या दुकानातून सवर्ण लोक माल विकत घेण्यास नकार देत असल्याचे सांगितले. अनुसूचित जातीच्या सुमारे १२ टक्के प्रतिसादकर्त्यांनी सवर्णांच्या मालकीच्या दुकानांतून माल विकत घेण्यास त्यांना प्रतिबंध करण्यात येत असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे रेस्टॉरंट किंवा खानावळ चालवणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकांनी त्यांच्या ग्राहकांपैकी बहुसंख्य ग्राहक त्यांच्या स्वतःच्याच जातीचे असल्याचे सांगितले. त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांमध्ये सवर्ण जातीच्या ग्राहकांचे प्रमाण खूपच कमी होते. अनुसूचित जातीच्या लोकांनी चालवलेल्या सुमारे ४४ टक्के रेस्टॉरंटच्या किंवा खानावळींच्या मालकांनी त्यांच्या रेस्टॉरंटमध्ये किंवा खानावळींमध्ये सवर्ण लोक खात अगर जेवत नाहीत; त्यामागे त्यांची जात हेच कारण असल्याचे सांगितले. अनुसूचित जातीच्या सुमारे ६५ टक्के वाहतूकदारांनी दिलेल्या माहितीनुसार, उच्चवर्णीय किंवा सवर्ण लोक त्यांच्या वाहनांतून प्रवास करणे टाळतात. प्रतिसादकर्त्यांच्या मते, व्यवसाय बंद करणे भाग पडणे किंवा अत्यल्प नफ्यावर काम करावे लागणे आणि त्यामुळे कर्जबाजारीपणाच्या विळख्यात अडकणे यांसारखे याचे नकारात्मक परिणाम होतात. सरकारने संख्यात्मक पुराव्याच्या आधारावर आपली योजना तयार करावयास हवी होती. खरे तर, अमेरिकेच्या उद्योजकता विकास धोरणाऐवजी मलेशियातील आणि दक्षिण आफ्रिकेतील (व्यापक आधारावरच्या कृष्णवर्णीय आर्थिक सक्षमीकरणाविषयीचा) लोकांच्या अनुभवांचा अभ्यास करण्यासाठी सरकारने या संधीचा उपयोग करून घ्यावयास हवा होता. ●●●

देशासमोरील प्रश्न


# सत्तेचा उन्माद अन् मनुस्मृतीच्या पुनर्स्थापनेचा डाव

भाग - ३







**मनुस्मृतीनिर्मित चातुर्वर्ण्य, स्त्रीदास्य व सतीप्रथेतून स्त्री हत्याकांड, अस्पृश्यता, ज्ञानाची मक्तेदारी आणि सर्व प्रकारच्या विषमतेमुळे देशाचा आजवर झालेला विनाश हा कमी म्हणून की काय, आज पुन्हा मनुस्मृतीची नव्या अवतारात पुनर्स्थापना करण्याची मागणी मनुवादी शक्ती करीत आहेत. हा केवळ सत्तेचा उन्माद नाही तर, बेबंद बेजबाबदारपणा, घटनाद्रोह आणि देशद्रोहही आहे.**



पी.बी.सावंत

उच्चवर्गीयांकडून बहुजनांना फोडण्याचं काम चालूच असते व त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन विरोधी शक्तींचा निरनिराळ्या मार्गाने, प्रसंगी हत्या करूनही बंदोबस्त करण्यात येतो. गरीब अज्ञ जनतेला त्यांचे मायावी स्वरूप भूल पाडते. त्यांचे खायचे व दाखवायचे दात निरनिराळे असतात. हे समजण्याला बहुजनातील तथाकथित शिक्षित लोकांनाही फार काळ लागतो. तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

बहुजनांना नेहमीच शारीरिक, मानसिक व बौद्धिकदृष्ट्या दुर्बल ठेवणे, हा तर मनुवाद्यांचा आरंभापासूनच मनसुबा. चातुर्वर्ण्याची निर्मितीच त्याकरता झाली. त्यामुळे आज हजारो वर्षे बहुजन सर्व दृष्टीने विकलांग राहिले आहेत. परिणामी देशाला आपल्या विकासात, त्यांच्या योगदानाला मुकावे लागले आहे. आजचा देशाचा तथाकथित विकास हा मूठभर अल्पसंख्याकांनी अल्पसंख्याकांकरता केलेला आहे. देशाच्या प्रगतीत जर देशातील शंभर टक्के लोकांचा सहभाग असता, तर हा देश सर्व क्षेत्रात जगातील एक अव्वल दर्जाचा




देश म्हणून गणला गेला असता. परंतु मनुवाद्यांना या देशाच्या प्रगतीची कधीच पर्वा नव्हती व नाही. त्यांना सतत स्वतःच्या स्थानाचीच काळजी असते. म्हणूनच आजही त्यांचा उद्देश व कार्यक्रम हा बहुजनांना जास्तीत जास्त दुर्बल ठेवणे, कमीत कमी समर्थ करणं हाच राहिला आहे. आजच्या विकासाची दिशाही मूठभरांच्या विकासाचीच आहे.

त्यामुळे जनतेला तिच्या दुःस्थितीची व दारिद्र्याची मूळ कारणे समजू न देणे व या कारणांपासून लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवणे, आपापसातील भांडणात त्यांना गुंतवणं, काल्पनिक बाह्य शत्रू उभे करणं व त्यांच्याविरूद्ध त्यांना सतत चेतावणी देत राहणं इत्यादी खेळ या शक्ती नेहमी खेळत असतात.

आज या शक्तींना शिक्षणाची दारे इतरांकरता बंद करता येत नाहीत. परंतु कुठलं शिक्षण द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार आजही त्यांनी आपल्या हाती राखून ठेवला आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी नेमायची क्रमिक पुस्तके, अवांतर वाचनासाठी नेमलेली पुस्तके, शिक्षणाचा आशय, शाळा कॉलेजातील शिक्षण, वाद-विवाद, चर्चा, व्याख्याने, उत्सव-समारंभ, एकूण शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण यावर यांचंच नियंत्रण असतं. आज तर राष्ट्रीय पातळीवर शिक्षणाचं मनुवादीकरण (संघीकरण/आर. एस.एससीकरण) करण्यासाठी सर्व केंद्रीय शिक्षण संस्थांवर संघाच्या एकनिष्ठ स्वयंसेवकांनाच उघडपणे नेमण्यात येत आहे.

शिक्षणाच्या मनुवादीकरणाबरोबर, सर्व देशाचच संघीकरण करण्यासाठी सर्व प्रसारमाध्यमं वर्तमानपत्रापासून ते दूरदर्शनपर्यंत, त्याचप्रमाणे सामाजिक माध्यम (सोशल मिडिया), चित्रपट, रंगभूमी, सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रम, सभा-संमेलने, उत्सव, जाहिराती, प्रचार-वाङ्मय आदि सर्व मार्गांचा सर्रास उपयोग करण्यात येत आहे. असत्य, अर्धसत्य, द्वेष, धर्मांधता, जातीयता व असहिष्णुता यांनी पेरलेला अपप्रचार तर अहोरात्र चाललेला असतो. यामुळे समाजजीवन अस्थिर, अशांत व असुरक्षित होत चाललं आहे. यातूनच जाती-जमातीत संघर्ष, दंगेधोपे व हिंसाचार पेटतो आहे. देशात आज एक अंधारयुग अवतरत आहे.

त्यातच काही संघवाद्यांनी बहुजनातील तरूणांना गाठून, त्यांचे पद्धतशीर संघीकरण करण्यासाठी आश्रम उभारले आहेत. या आश्रमात त्यांना इतर सर्व धर्मीयांचा द्वेष, संविधान व त्यातील लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता या तत्त्वांविरूद्ध घृणा, एकतंत्री हुकूमशाहीबद्दल प्रेम, चातुर्वर्णीय हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व, पोथीपुराण, अनैतिहासिक घटना, देव-देवता, अंधश्रद्धा, भ्रामक व अशास्त्रीय गोष्टी, पोथीनिष्ठा, दैववाद, कर्मसिद्धांत, पुराणमतवाद आदींचं शिक्षण देण्यात येतं. तरूण वयापासूनच त्यांना बौद्धिक व मानसिकरित्या गुलाम करण्यात येतं. इतर संघीयाप्रमाणे त्यांच्या डोक्यांची मडकी करण्यात येतात. त्यांच्यातून हिंदू जिहादी, सनातनी व तालिबानी निर्माण करण्यात येतात. कालांतराने ही मडकी इतकी पक्की होतात, की त्यांच्यावर कुठल्याही ज्ञानाचा वा विज्ञानाचा परिणाम होत नाही. ते बौद्धिक रूग्ण होतात. आपल्याकडे मानसिक रुग्णांसाठी औषधोपचारांची सुविधा आहे, रुग्णालयेही आहेत. परंतु या बौद्धिक रुग्णांवर कुठले उपचार करायचे? त्यांना कुठल्या रूग्णालयात पाठवायचे?

गेली ९० हून अधिक वर्षे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्याच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, मनुवादी विचारसरणीचा प्रपंच व प्रसार करीत आले आहेत. आज तर ते देशाची राजसत्ता, जी ते आजपर्यंत अप्रत्यक्षपणे भोगत होते, ती प्रत्यक्ष हस्तगत करण्यात यशस्वी झाले आहेत. देशपातळीवर महाराष्ट्रातील पूर्वसूरीची पेशवाई स्थापन झाली आहे. तिचं स्वरूप व कार्यपद्धती परिस्थितीनुरूप बदलली आहे.

या शक्तीचे चाळे मात्र अव्याहत चालू आहेत. आजवर

त्यांनी आपल्या मार्गात आड येणाऱ्या व्यक्ती व त्यांचे विचार आणि तत्त्वज्ञान यांचा निरनिराळ्या मार्गांनी बंदोबस्त केला आहे. कट, कारस्थान, खून-खराबा त्यांना निषिद्ध नाही. आपल्याला गैरसोईचे वाटणारे वाङ्मय, ऐतिहासिक कागदपत्रे व पुरावे नष्ट करणे व खोटे कागदपत्रे व पुरावे तयार करणे हा तर त्यांचा नित्याचा उद्योग. त्यामुळे खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करणे त्यांना सहज शक्य झाले आहे. अशा करामती करून लिहिलेली पुस्तके इतिहासाची चोपडी म्हणून वाचकांवर लादली म्हणजे यांचा हेतू सफल होतो. हेतू असतो उच्चवर्णीयांकडे सर्व प्रशंसनीय घटनांचे श्रेय घेणे व त्यांचे दोष, गुन्हे, स्वार्थी डावपेच, समाजद्रोही कृत्ये यावर पांघरूण घालणे. नायकांना खलनायक व खलनायकांना नायक बनविणे.

ही शक्ती म्हणजे वास्तवात उच्चवर्णीयांची स्वार्थी मनोवृत्ती आहे. ती मनुस्मृतीच्या काळापासून आजतागायत तशीच कायम आहे. उलट, आज ती अधिकाधिक बळकट होत आहे व करण्यात येत आहे. प्रथमपासूनच इतरांपासून अलग राहिल्यामुळे, लोकशाही राजवटीत उच्चवर्णीयेतरांच्या बहुमतांवर मात करण्यासाठी, अशा मनोवृत्तीची या शक्तीला अधिकच गरज भासत आहे. त्यामुळे तिच्या फुटपाड्या कारवायांना अधिक पाय फुटू लागले आहेत. अपरिहार्य परिस्थितीशी जुळवून घेणं, आहे त्या परिस्थितीत सर्व उपलब्ध अवकाशांचा उपयोग करणं, नवीन अवकाश तयार करणं व अखेर प्रतिकुल परिस्थितीवरही मात करून आपलीच सत्ता निर्माण करणं हे या शक्तीला बुद्धीचातुर्य, संघटनाकौशल्य व चिवटपणा यामुळे शक्य होत आहे आणि आज ते प्रत्यक्षात दिसतही आहे.

मनुस्मृतीनिर्मित चातुर्वर्ण्य, स्त्रीदास्य व सतीप्रथेतून स्त्री हत्याकांड, अस्पृश्यता, ज्ञानाची मक्तेदारी व सर्व प्रकारची विषमता यामुळे देशाचा आजवर झालेला विनाश हा कमी झाल्यामुळे की काय आज पुन्हा मनुस्मृतीची नव्या अवतारात पुनर्स्थापना करण्याची मागणी याच मनुवादी शक्ती करत आहेत. हा केवळ सत्तेचा उन्माद नाही, तर बेबंद बेजबाबदारपणा व समाजद्रोह, घटनाद्रोह आणि देशद्रोहही आहे.

इथे एक गोष्ट आवर्जून स्पष्ट केली पाहिजे. सर्व ब्राम्हण मनुवादी नाहीत व सर्व मनुवादी ब्राम्हण नाहीत. उलट काही ब्राम्हणांनी या मनुवादी मानसिकतेचा अत्यंत परखड व जहाल भाषेत धिक्कार केला आहे. त्याकरता समाजसुधारक चळवळीही झाल्या आहेत. आज ज्या हिंदू धर्मात सुधारणा दिसून येतात, त्या या चळवळीचा परिपाक आहे. १८६२ च्या सती बंदीच्या कायद्यापासून ते १९५५-५६ च्या हिंदू कौटुंबिक कायद्यापर्यंत सर्व सुधारणांचे जनकत्व या समाजसुधारणा चळवळींकडे आहे.

मनुस्मृती ही अप्पलपोट्या, स्वार्थी, स्वकेंद्रीत, पुरूषी अहंगंडातून निर्माण झालेली व एका विशिष्ट समाज समूहाकरता खास अधिकार व सवलतींची तरतूद करण्याकरता व इतरांना त्या समूहाचे दास करण्याकरता रचण्यात आलेली संहिता आहे. ती विशिष्ट मनोवृत्तीची द्योतक आहे. जोपर्यंत ही मनोवृत्ती नाहीशी होत नाही, तोपर्यंत या ना त्या स्वरूपात ती या देशाला नेहमीच हानिकारक ठरणार आहे. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती १९२७ साली जाळली. परंतु त्यामुळे मनुस्मृती निर्माण करणारी मनोवृत्ती नष्ट झाली नाही. आम्हाला गरज आहे ती या मनोवृत्तीला जाळण्याची. या मनोवृत्तीमुक्त भारताची. ●●●





मुलाखत

# मत व्यक्त करण्यास अटकाव, ही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदाच..!

**तुमचं मत व्यक्त करण्यापासून तुम्हाला अडवलं जाणं ही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदाच आहे. आता स्वतंत्र पत्रकारितेचे दिवस संपले असून भडक गोष्टींना प्रसारमाध्यमं अतिमहत्त्व देऊ लागले आहेत. देशभरातच मुस्कटदाबीचे धोरण आहे, असे रोखठोक विचार अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'द पीपल्स पोस्ट'ला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केले.**

➲ चेतन शिंदे

**प्रश्न : साहित्यापेक्षा वादामुळेच साहित्य संमेलन चर्चेत राहते. तुम्हाला नेमकं काय वाटतं?**

**कोत्तापल्ले :** येथे दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे ज्या ज्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर लोक जमतात, त्या ठिकाणी बरोबर असतील चुकीचे असतील, पण आपले प्रश्न मांडावेत, असे लोकांना वाटत असते. याचे चांगले उदाहरण म्हणजे औरंगाबादला जेव्हा संमेलन झालं त्यावेळेस हा ठराव मांडला गेला आणि तो एकमताने मंजूर झाला. पुढे संयुक्त महाराष्ट्रही झाला. दुसरे, नामांतराचा ठराव किंवा नामांतराचा प्रश्न सतत साहित्य संमेलनामधून मांडला गेला. आता हे का मांडले गेले? तर जिथे मराठी लोक मोठ्या प्रमाणात जमतात, त्या ठिकाणी अशा प्रश्नांच्या चर्चेला जाग येते. चांगले प्रश्न मांडणं, ते लोकांच्या पुढे जाणं ही एकप्रकारे विधायक बाजू असू शकते. पण पुष्कळदा असे होते, नको ते प्रश्न, नको त्या गोष्टी या संमेलनाच्या निमित्ताने उभ्या राहतात. ठाण्याला संमेलन झालं तेव्हा उत्तम कांबळे अध्यक्ष होते. तिथल्या सभेत नथुराम गोडसेचा विषय निघाला. त्याच्याबद्दल लोकांच्या तक्रारी होत्या, थोडा गोंधळ झाला. चिपळूणला जिथे मी संमेलनाचा अध्यक्ष होतो, त्या ठिकाणी निमंत्रण पत्रिकेवर परशुरामाचं चित्र होतं आणि हे चित्र बरोबर नाही म्हणून लोकांनी नाराजी व्यक्त केली. परंतु या दोन्ही ठिकाणी संमेलन व्यवस्थित झालं. प्रत्येक संमेलनामध्ये अशाप्रकारे प्रश्न निर्माण होतात. हे गृहितच धरलं पाहिजे. त्याचं एक कारण असं की, १०,००० पासून ४०,००० पर्यंत लोक या संमेलनाला जमतात. हे एकाच विचारधारेचे नसतात. त्यामुळे लोकांनाही असं वाटतं की, आपले प्रश्न मांडले जावेत किंवा तिथे प्रश्नांवर चर्चा व्हावी. काही वेळा अनावश्यक बाबीसुद्धा त्याच्यात

येतात. त्या येऊ नयेत, असं वाटतं. पण यावर्षी जे घडलं ते मात्र अभूतपूर्व असं होतं. एक म्हणजे भारतीय पातळीवरच्या मोठ्या लेखिकेला आधी निमंत्रण दिलं, तुम्हीच बोलावलं आणि नंतर तुम्ही त्यांचं भाषण ऐकून नकार दिला. हे कुठल्याही परिस्थितीमध्ये क्षम्य नाही. कारण शेवटी साहित्य संमेलन अभिव्यक्ती स्वातंत्र्य मुक्तपणे वावरलं पाहिजे, अशा प्रकारचं असतं. म्हणून मला असं वाटतं की, यंदाचे साहित्य संमेलन अभूतपूर्व होतं. प्रत्येक वर्षी काहीतरी होतं. त्याच्याकडे आपण जरा वेगळ्या पद्धतीने पाहतो. पण यावर्षी मात्र आयोजकांनी उद्घाटक बोलावून नंतर त्यांचं निमंत्रण रद्द करणं मात्र काही चांगली गोष्ट नाही, असं मला वाटतं. ही आजपर्यंतच्या साहित्य संमेलनाच्या इतिहासातली सगळ्यात गंभीर गोष्ट आहे. पूर्वी पंजाबमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत घडले होते. जाती निर्मूलनाच्या भाषणावर बाबासाहेब ठाम होते. आता सहगल यांच्याबाबतीत असं झालं आहे.

**प्रश्न : साहित्य संमेलनामध्ये साहित्यिक व्यवहारापेक्षा राजकारणावर, इतर वादांवर जास्त चर्चा होते. या संमेलनात खरंच साहित्यावर गांभीर्याने चर्चा होते असं तुम्हाला वाटतं का ?**

**कोत्तापल्ले :** नाही. स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर साहित्य संमेलनाची लोकांनाही आवड निर्माण व्हायला लागली. जिथे कुठे साहित्याचा व्यवहार असेल तिथे आपण जावं असं वाटायला लागलं. त्यामुळे साहित्य संमेलनाचं स्वरूप हे साहित्यावरील चर्चेबरोबरच आणखी अनेक गोष्टींमुळे महत्त्वाचं आहे. तेथे अनेक ग्रंथ पाहायला मिळतात. पुस्तकांचे किमान २०० स्टॉल असतात. लेखकांच्या भेटीगाठी, चर्चा आणि परिसंवाद असे अनेकविध वाङ्मयीन कार्यक्रम असतात. परंतु दुर्दैवाने या कार्यक्रमांवर भर न देता अन्य किरकोळ मुद्द्यांना मीडिया महत्त्व देत असते. आपल्याकडची पत्रकारिता ही पुष्कळवेळा प्रश्न पेटवून देत असते. एखादा छोटा प्रश्न असला तरी त्याचं मोठं भांडवल पत्रकारिता करत असते. संमेलनात साहित्यिक चर्चा होतात. गांभीर्याबद्दल बोलताना असं म्हणता येईल की, समजा एका परिसंवादामध्ये दहा वक्ते किंवा पाच वक्ते बोलले तर पाचच्या पाच वाईट बोलतात, असं नाही. एखाद-दुसरा तरी अभ्यास करून बोलतो. संमेलनात होणाऱ्या चर्चांना प्राधान्य देण्यापेक्षा प्रसारमाध्यमे किरकोळ गोष्टींना महत्त्व देतात.

**प्रश्न : मीडिया प्रश्न पेटवतो, गंभीर विषयावर मीडिया चर्चा घडवून आणत नाही, असं तुम्हाला वाटतं का?**

**कोत्तापल्ले :** नाही. इंग्रजी आणि मराठी वर्तमानपत्रांचा आपण विचार केला तर पुष्कळदा असं होतं की, राष्ट्रीय स्वरुपाचे प्रश्न इंग्रजी वृत्तपत्रे उचलून धरतात. मराठीमध्ये तो प्रश्न साईडला



पडलेला असतो. तसं मराठी पत्रकारितेमध्ये भडक विधानाला प्रसिद्धी दिली जाते. संमेलन कशाला पाहिजे, असं नेमाडे दरवर्षी बोलतात. यावर्षीच बोलले नाहीत. माझं काय म्हणणं आहे की, बाबा तुम्हाला संमेलन नको तर तुम्ही नका येऊ. ज्यांना संमेलनाला जायचं आहे, त्यांना जाण्यापासून तुम्ही कसं रोखता? किंवा तुम्ही कसे रोखू शकणार आहात? लोक उत्स्फूर्तपणे स्वतः प्रवासखर्च करून जातात. असं भडक विधान आलं की, लगेच माध्यमं त्याला प्रसिद्धी देणार. त्याची साधकबाधक चर्चा काही आपल्याकडे होत नाही. माझा मीडियाचा अनुभव फारसा चांगला नाही. पुष्कळदा तर खोट्या बातम्या एडिट करून छापल्या जातात. मी औरंगाबादला कुलगुरू असताना माझ्यासंदर्भातच तीन-चार बातम्या खोट्या छापल्या गेल्या आणि शेवटी वर्तमानपत्रांना दिलगिरी व्यक्त करावी लागली.

**प्रश्न : सहगल यांच्या भाषणाऐवजी निमंत्रण नाकारलं, याच्यावरच जास्त चर्चा झाली. मराठी साहित्य संमेलन आणि वाद असं एक नवीन सूत्र झालेलं आहे?**

**कोत्तापल्ले :** सूत्र नवीन नाही, ते जुनंच आहे. संमेलनामध्ये जी कुठली गोष्ट घडते, त्या गोष्टीला काही प्रमाणात राजकीय वातावरण जबाबदार असते. सध्या आपल्याला असं दिसतं की, व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होत चाललेला आहे. दुसरं असं की, तुम्ही विरोधी मत मांडाल तर फार मोठ्या प्रमाणात बदनामी केली जाते. असे प्रकार सुरू झालेले आहेत. कोत्तापल्ले

भारतामध्ये लिंचिंगचे प्रकार झाले. मला असं सांगा की, माणूस महत्त्वाचा की प्राणी महत्त्वाचा? मला असं वाटतं की, कुठल्या एका जातीवर, जमातीवर, धर्मावर सूड उगवण्यासाठी याचा वापर करून घेणं चाललं आहे. या संमेलनाबाबत असं दिसतं की, तुमच्या बोलण्यावर अंकुश प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे राहिला जाईल, ठेवला जाईल. याला अघोषित आणीबाणी असंच म्हणावं लागेल. अशी परिस्थिती असेल तर स्वाभाविकपणे सहगलबाई काय बोलल्या त्यावर चर्चा होण्यापेक्षा, त्यांना बोलावलं नाही या मुद्यावरच चर्चा होणं स्वाभाविक आहे. त्याचं कारण राजकीय पर्यावरण आहे, असं मला वाटतं.

**प्रश्न : अशा संमेलनाचं फलित तुम्हाला काय दिसतं? एका बाजूला संमेलनं झाली पाहिजेत असा सूर आहे. दुसऱ्या बाजूला काही साहित्यिक संमेलन नको म्हणतात. काय आहे हे नेमकं?**

**कोत्तापल्ले :** बघा, तुम्हाला मी आधीही सांगितलं की, साहित्यासंबंधी आस्था असल्याशिवाय लोक मोठ्या संख्येने संमेलनाला जमत नाहीत. म्हणजे ५० वर्षांपूर्वी जिथे ५०० ते १००० लोक जमत, तिथे आज १०,००० पासून ४०,००० पर्यंत लोक जमतात. साहित्यासंबंधीची आस्था वाढत चाललेली आहे. हेच मोठं फलित आहे, असं मला वाटतं. कोण अध्यक्ष आहे? त्याचं काय भाषण आहे. ते आपण ऐकूयात, परिसंवाद ऐकूयात, पुस्तकं पाहूयात, तर हे त्याचं फलितचं आहे. संमेलन यशस्वीतेच्या ज्या १०० टक्के अपेक्षा तुम्ही करता, त्या नसतील होत पूर्ण, पण काहीच होत नाही, असं म्हणणं मात्र फारसं बरोबर नाही. तुम्ही म्हणालात त्या वादावर 'पुणे ते प्रवरानगर साहित्य संमेलन : एक सांस्कृतिक संघर्ष' नावाचं पुस्तक मी लिहिलं आहे.

संमेलन हे सांस्कृतिक संघर्षाचंही केंद्र झालेलं आहे. संमेलनाच्या निमित्ताने वेगवेगळा सांस्कृतिक दृष्टिकोन असणारे लोक बोलायला लागलेले आहेत आणि प्रस्थापित प्रत्येकाला हे दुसरे सूर नको असतात. त्यामुळे नकोच, हे संमेलनच नको, असंही मत होतं. या संमेलनामध्ये वेगवेगळ्या चळवळीतले लोक असतात. उदाहरणार्थ, आंबेडकरवादी चळवळीतले लोक असतात, ग्रामीण चळवळीतले लोक असतात. कदाचित त्यांचा आवाज फार मोठा होत नसेल, पणं असतात ते. एक काळ असा होता की, मराठी साहित्य संमेलन हे केवळ ब्राम्हणी संमेलन होतं, त्यावेळेस कोणाची काहीही तक्रार नसे. तुम्हाला असं आठवतं का की, २० वर्षांपूर्वी संमेलनाच्या विरोधात कोणी लिहिलं. सगळीकडे छान झालं, छान झालं असंच होतं, तर मग आता का लिहिताहेत? त्याचं सरळ-सरळ कारण असं आहे की, वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक तिथे येत आहेत आणि आपापली मते मांडताहेत. मग त्यांच्यात विरोध करणारेही असतील. उदाहरणार्थ, संमेलन सुरू आहे आणि संमेलनाच्या विरोधामध्ये बाकी लोक बाहेर घोषणा देताहेत, असंही चित्र दिसतयं ना? मा या दृष्टीने एकप्रकारे सांस्कृतिक संघर्ष सुरू झालेला आहे आणि तो या संमेलनाच्या निमित्ताने व्यक्त होत आहे, ही चांगली गोष्ट आहे. या अर्थाने, संमेलनाची फलश्रुती नाहीच असं जे संपूर्णतः निगेटिव्ह म्हटलं जातं. मला असं वाटत नाही. राहिला प्रश्न अध्यक्षाचा! अध्यक्षांनी तिथे जाऊन त्यांचे म्हणणे मांडले पाहिजे. काही मांडतात, काही अध्यक्ष मांडत नाहीत. पण काही अध्यक्ष तर नुसतं मी काय काय लिहिलं एवढंच सांगतात. पण काही अध्यक्ष असे असतात की, जे साहित्यासंबंधी, भोवतीच्या पर्यावरणासंबंधी एकूण वाङ्मयासंबंधी, संस्कृतीसंबंधी बोलत जातात. कमी लोक असतील बोलणारे, पण असतात. मा या दृष्टीने ही जमेची बाजू आहे.

**प्रश्न : सहगल यांचं निमंत्रण रद्द झालं, ते का रद्द झालं? कुणी केलं? विशिष्ट विचारधारेचे लोक सगळे एकत्र आल्यामुळे साहित्य महामंडळामध्ये असं होतंय, असं तुम्हाला वाटतं का?**

**कोत्तापल्ले :** साहित्य संमेलन ज्या गावामध्ये होत असते तिथले सर्वपक्षीय लोक संमेलनाच्या यशस्वीतेसाठी एकत्र येतात. संमेलनासाठी निधी गोळा करतात. त्यामुळे पुष्कळदा तुम्हाला मान्य नसलेल्या व्यक्तीचे नाव सभागृहाला दिले जातं, तुम्हाला मान्य नसलेल्या राजकीय पुढाऱ्याच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन केले जाते. संमेलनाला जमणारे हजारो लोक वेगवेगळ्या विचारसरणीचे असतात. आयोजकही वेगवेगळ्या विचारसरणीतील असतात. त्यामुळे आयोजकांच्या आणि संबंधित ग्रामस्थांच्या मतानुसार पाहुणा ठरत असतो. हा एक भाग. दुसरे असे की, शासन या संमेलनाला ५० लाख रुपयांचे अनुदान देत असते. त्यामुळे अनेकदा आयोजकांवर वेगवेगळ्या प्रकारचा दबाव





असतो. त्यातून छोट्या-मोठ्या तडजोडी त्यांना कराव्या लागतात. महामंडळाबद्दल बोलायचे झाले तर सध्या हे महामंडळ संमिश्र स्वरुपाचे आहे. त्यामध्ये बहुतांश मंडळी संघविचाराची आहे. सहगल यांचं निमंत्रण रद्द करण्याच्या घटनेचा दोष महामंडळाकडे किती जातो हे मला सांगता येणार नाही. पण एक गोष्ट मात्र खरी की, सहगलबाईंचं निमंत्रण नाकारण्यामागचे कारण महामंडळावर संघ विचारसरणीचा मोठा प्रभाव हे आहे. या महामंडळात मसाप, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक येथीलही प्रतिनिधी आहेत. त्यामुळे मराठी साहित्य महामंडळ म्हणजे संघ विचाराचे महामंडळ आहे, असे म्हणता येत नाही.

**प्रश्न : महामंडळात सर्वाधिक संख्या संघ विचारसरणीच्या लोकांची आहे, त्यामुळे कदाचित सहगल यांना नाकारण्याबद्दल चर्चा झाली असावी. शक्य काय आहे?**

**कोत्तापल्ले** : नाही. हे असं जरी असलं तरी एक प्रक्रिया नक्की आता सुरू झालेली आहे, ती म्हणजे समावेशकता करत जाणे.

**प्रश्न : साहित्य महामंडळाची पुनर्रचना केली पाहिजे का?**

**कोत्तापल्ले** :यावर्षीपासून निवडणूक न घेता संमेलनाचा अध्यक्ष निवडण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. पूर्वी अध्यक्ष निवडण्यासाठी ११०० लोक मतदान करायचे. आता २० लोक करतात. २० लोकांमध्येसुद्धा मतदान होतेच ना. म्हणजे निवडणूक नको म्हणून थेट निवड होत असल्याचे सांगितले जात असले तरी निवडणूक झालीच. मग निवडणूक होणारच असेल तर ११०० लोकांची का नको? १५०० लोकांची का नको? असा माझा सवाल आहे. त्यामुळे महामंडळाचा हा निर्णय लोकशाहीविरोधी आहे. देशात सध्या एकाधिकारशाहीचे जे वातावरण सुरू आहे, त्याला हा निर्णय समांतर आहे. दुसरे असे की, महामंडळामध्ये लोक घटक संस्थांमधून संलग्न संस्थांच्या मदतीने येतात. औरंगाबाद, पुणे, नागपूर, मुंबई या चार मुख्य घटकसंस्था आणि गोवा, मध्यप्रदेश, हैदराबाद, कर्नाटक आणि बडोदा या संलग्न संस्था आहेत. आता महामंडळाचं रूप बदलायचं असेल आणि ते बदलावं असं वाटत असेल तर मुळात त्याच्या साहित्य संस्थांमध्ये बदल करणं गरजेचं आहे. महामंडळ काही आकाशातून पडलेलं नाही किंवा ते शासनाने नेमलेलं आहे असंही नाही. संस्थांनी मिळून तीन-तीन प्रतिनिधी एकत्र येऊन हे महामंडळ झालेलं आहे. आता महामंडळाचे कोणते प्रतिनिधी तुम्हाला नको असतील तर तुम्हाला मूळ जी घटकसंस्था आहे त्या घटकसंस्थेमध्ये बदल करावा लागेल. मला असं वाटतं की, याला विरोध करणारे लोक कधीही मूळ घटकसंस्थांचे सभासद होत नाहीत. १००-२०० रुपये भरून मतदार व्हायचं असतं. म्हणजे तुम्हाला अशा प्रवृत्तीचे लोक नको असतील तर त्या साहित्य संस्थेमध्ये शिरुन त्या साहित्य संस्थेत बदल करता येऊ शकतो.

**प्रश्न : साहित्य महामंडळामध्ये साहित्यावर कमी आणि राजकीयदृष्ट्या जास्त चर्चा होते. राजकारणाच्या चर्चेचं ते ठिकाण बनलंय. साहित्य महामंडळ हे साहित्यिकांचा विचार करतंय की राजकारण्यांचा विचार करतंय? बरे वाटणारे निर्णय जास्त घेतले जातात, सत्ताधारी व्यवस्थेकडून फंडिंग मिळवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले जातात?**

**कोत्तापल्ले** : प्रत्येक घटकसंस्थेला शासनाच्या वतीने निधी मिळतो. महामंडळाला स्वतंत्र २५ लाख रुपये मिळतात आणि घटकसंस्थेला ५-५ लाख मिळतात. अर्थात, हे पैसे काही पुरत नाहीत. लोकशाही व्यवस्थेमध्ये असं गृहित असतं की, देणारी संस्था सरकारचीच आहे, ती काय खिशातून देत नाही. प्रगत राष्ट्रांमध्ये, मी निधी दिला म्हणून माझं ऐकलं पाहिजे, असं म्हटलं जात नाही. दुर्दैवाने आपल्याकडे मात्र आम्ही निधी दिला म्हणजे आमचं ऐकले पाहिजे, अशी भूमिका घेतली जाते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ही अपरिपक्व लोकशाही आहे. खरं म्हणजे, महामंडळाला खूप गोष्टी करता येतात. पण महामंडळ ते करत नाही. मराठी शाळांचा प्रश्न, मराठी शाळांबाबत शासनाचे धोरण, इंग्रजी शाळांमध्ये मराठी विषय नसणे, त्याचबरोबर बेळगावचा प्रश्न, असे अनेक प्रश्न आहेत, ज्यांच्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने पाठपुरावा केला पाहिजे पण

तसे होत नाही. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना ठाले पाटील महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यावेळी महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या उपोषणामुळे बेळगाव सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात गेला. आज मराठीसाठी महामंडळाला करण्यासारखे खूप आहे. परंतु वर्षभरातून एखादं संमेलन घेणे एवढ्यापुरतेच महामंडळाचे काम मर्यादित झाले आहे. उपरोक्त प्रश्नांसाठी महामंडळाने काम केले तरच महामंडळाला अर्थ असेल. संमेलन अध्यक्षासाठीची निवडणूक रद्द करणे चुकीचेच आहे. अध्यक्षाच्या निवडीचे अधिकार २० लोकांना देऊन निवडणूक झालीच ना. तुम्हाला निवडणूक नको म्हणून जी पद्धत आणली ती अंतिमत: निवडणूकच आहे.

**प्रश्न : त्याच्याविषयी तुमचे मत काय? तुमची भूमिका काय?**

**कोत्तापल्ले :** मी त्यांना आता पत्र पाठवणार आहे. यवतमाळच्या साहित्य संमेलनासाठी ढेरेबाईंना निवडून आणायचं ठरलेलं होतं. त्यामुळे मराठवाडा साहित्य परिषदेने ना.धों. महानोरांचं नावं मागे घेतलं, नरेंद्र चपळगावकरांचं नाव मागे घेतलं. मग तुम्ही असं का नाही म्हणालात की ज्येष्ठतेप्रमाणे आपल्याला अध्यक्ष निवडायचा आहे. म्हणजे पुन्हा जवळीकतेचा मुद्दा आलाच ना. नाही म्हटलं तरी थोडफार जवळचा दूरचा असे पाहिले जातेच!

**प्रश्न : पूर्वी अध्यक्ष निवडला जायचा. आता नेमणूक केली जाते, हे चुकीचे नाही का?**

**कोत्तापल्ले :** हे चुकीचं आहे. मी तर स्पष्टपणे सांगितलं की, ११०० मतदार होते. तुम्ही २० लोकांच्यामध्ये निवडणूक करता म्हणजे ही एकाधिकारशाही आहे. भारत सरकारची जी एकाधिकारशाही सुरू आहे, त्याला समांतर ही गोष्ट आहे, जी निषेधार्थ आहे.

**प्रश्न : यवतमाळ साहित्य संमेलनाच्या निमित्ताने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आली का?**

**कोत्तापल्ले :** हो ना, मुद्दा तर तोच आहे. राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याद्वारे तुम्ही तुमचे मत व्यक्त करू शकतात. परंतु तुमचे मत व्यक्त करण्यापासून तुम्हाला अडवणं चाललं आहे. ही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदाच आहे. सबंध देशभरातील वातावरणच मुळी अभिव्यक्ती स्वातंत्र्याला मारक आहे. इलेक्ट्रॉनिक मीडियाबद्दल बोलायचे तर, बहुसंख्य इलेक्ट्रॉनिक मीडिया हा कुणी ना कुणी विकत घेतलेला आहे, असं दिसतं. म्हणजे स्वतंत्र पत्रकारितेचे दिवसच संपले. आता केवळ २ ते ४ चॅनेल्स असे असतील की, जे स्वतंत्रपणे काहीतरी करतात. देशभरच मुळी मुस्कटदाबीचं धोरण आहे आणि त्यातून प्रतिकात्मक निषेध म्हणून हे सगळं प्रकरण आलेलं आहे.

## प्रश्न : अभिव्यक्ती स्वातं[त्र्य]... विशिष्ट विचारधारेचेच लो[क]...

**कोत्तापल्ले :** होय. उघडच आहे ते. आपल्या देशाच्या सामाजिक रचनेमध्ये मुळातच अभिव्यक्ती स्वातंत्र्याला फारसा वाव नाही. ज्या देशामध्ये जातीव्यवस्था आहे, तिथे एका जातीविषयी बोलताना दुसऱ्या जातीच्या माणसाला भय वाटतं. मग तो कुणीही असो. कारण ही व्यवस्थाच अशी आहे. आपण अजूनही परिपक्व लोकशाहीपर्यंत आलेलो नाही. पण सध्याची परिस्थिती अधिक गंभीर आहे. केंद्र आणि महाराष्ट्रामधील सत्ताधाऱ्यांची जी मातृसंस्था आहे, ती मुळातच विदेशावर अवलंबली आहे. गोळवलकरांच्या 'विचारधन' या पुस्तकात त्यांनी सरळ असं सांगितलं आहे की, डाव्या विचारसरणीचे कम्युनिष्ट, मुस्लिम आणि ख्रिश्चन हे तीन या देशाचे शत्रू आहेत. आज मुस्लिमांना टार्गेट केलं जातं, ख्रिश्चनांच्या चर्चवर हल्ले होतात, परंतु गुन्हेगारांवर कारवाई होत नाही. डाव्यांना कुठल्या ना कुठल्या पद्धतीनं अडवलं जातं आणि आंबेडकरवाद्यांनासुद्धा काहीतरी आरोप करून तुरूंगात अडकवलं जात आहे. त्याचं एक कारण

**प्रश्न : अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर देशभर चर्चा झाली. दडपशाहीविरोधात अनेकांनी पुरस्कार परत केले. साहित्यिक, कलाकार बोलले; परंतु मराठी साहित्यिकांच्या ठोस भूमिका दिसल्या नाहीत. काय सांगाल?**

**कोत्तापल्ले :** काही मराठी साहित्यिकांनीसुद्धा महाराष्ट्र सरकारचे पुरस्कार परत केले. काही बोलले. काही बोलले नाहीत. लोक बोलत नाहीत, असं नाही. पण त्याचं प्रमाण अतिशय थोडं आहे. कारण मराठी लेखक हा मुळामध्ये घाबरट आहे. मराठी लेखक कधी बोलला? कधी बोलणार? महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये किती मराठी माणसं होती, किती लेखक होते? फारसे नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी चळवळीबद्दल मराठी लेखकांचं काय मत होतं तर, ते नवकथेत रमलेले होते. तेव्हा किमान खुले बंडखोर अशाप्रकारचे लेखन करत होते किंवा टिंगलटवाळीच करत होते. मराठी लेखकांचा गेल्या १००-१५० वर्षातला आढावा घेतला तर असं लक्षात येतं की, व्यवस्थेचा विरोध करावा किंवा व्यवस्थेचा शोध घ्यावा, असं वाटणारे फार थोडे लोक आहेत. अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लोक भूमिका घेणारे आहेत. बहुसंख्य लोकांना तर भूमिकाच नाही, ही गोष्टही तितकीच खरी आहे.

**प्रश्न : परंतु ते साहित्यिक म्हणून मिरवतात?**

**कोत्तापल्ले :** मिरवतात ना, ते तर जास्त मिरवतात. त्यांचं कौतुक जास्त होतं ज्यांना भूमिकाच नाही. ते जास्त मिरवत असतात. जे ठोस भूमिका मांडतात ते मिरवत नाहीत.

## याचे जे प्रश्न आहेत, याला
## क जबाबदार आहेत काय?

असं की, यांच्या मानसिकतेमध्ये कुठेतरी जी क्रमवारी आहे ती तशीच आहे. म्हणून हा मूळ मुद्दा मानसिकतेचा आहे. भारतीय राज्यघटना तयार झाली तेव्हा याच लोकांनी राज्यघटना काही आमची नाही, असं म्हटलं होतं. ही राज्यघटना म्हणजे वेगवेगळ्या देशांच्या राज्यघटनेचं ठिगळ आहे, असं म्हटलं होतं. त्यांचा मूळ घटनेलाच विरोध आहे. म्हणून 'ते' कर्नाटकातले मंत्री बोलले की, आम्ही घटना बदलायला आलो आहोत. दिल्लीला कॅनॉट प्लेसवर घटनेची प्रत जाळणाऱ्यांवरही कठोर कारवाई झाली नाही. मुळात, हे लोक स्टेजवर काही जरी बोलत असले तरी मूलतः घटनाविरोध, मुस्लिमविरोध, ख्रिश्चनविरोध आणि प्रागतिक विचारांना विरोध ही यांची संघसूत्री आहे आणि याचं कारण त्यांचा मूळ ग्रंथ आहे. देशातील लोकशाही संस्था नष्ट करण्याचे त्यांचे षड्यंत्र सुरू आहे. मात्र, दुर्दैवाची गोष्ट अशी की, सामान्य माणसाला अजूनही हे लक्षात येत नाही की, आपण कोणत्या दिशेला निघालेलो आहोत.

**प्रश्न : शासनदरबारी गोड बोलणाऱ्यांची दखल घेतली जाते?**

**कोत्तापल्ले** : हो. घेतली जाते. ते तर जवळचे असतात.

**प्रश्न : त्यामुळे तुम्ही भूमिका घेतलीच पाहिजे की नाही?**

**कोत्तापल्ले** : हो, भूमिका घेतलीच पाहिजे. भूमिका घेतली तरच तुम्ही लेखक आहात.

**प्रश्न : सुरुवातीला ही संमेलनं ज्या भूमिकेतून व्हायची, त्यात भूमिका असलेल्या लेखकांची मतं चर्चेत यायची. विचारांची देवाण-घेवाण व्हायची. आज अजिबात असं होत नाही?**

**कोत्तापल्ले** : भूमिकेचा हा मुद्दा गेल्या २५-३० वर्षातला आहे. मराठीमध्ये जेव्हापासून नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांच्यासारखे डाव्या विचारसरणीचे लोक प्रभावी झाले, जेव्हांपासून दलित लेखक लिहायला लागले, ग्रामीण साहित्याच्या चळवळी सुरु झाल्या, आदिवासी साहित्याच्या चळवळी सुरु झाल्या, स्त्रीवादी चळवळी सुरू झाल्या तेव्हापासून भूमिकांचा प्रश्न आला. त्यापूर्वी भूमिकांचा काही मुद्दाच नव्हता.

**प्रश्न : डाव्या विचारसरणीच्या आंबेडकरवादी लेखकांनी या साहित्याची परिभाषा बदलली? त्यांना भूमिका घ्यायला भाग पाडलं?**

**कोत्तापल्ले** : हो, उघडच आहे ना. एकेकाळी दलित लेखकांना संमेलनात बोलावलं जात नव्हतं. मला आठवतं की, चंद्रपूरला संमेलन झालं तेव्हा वामनराव चोरघडे अध्यक्ष होते. या संमेलनाला एकही दलित कवी किंवा लेखक नव्हता. याचा यशवंत मनोहरांनी निषेध केला होता. तेव्हापासून दलित साहित्यिकांनाही बोलवायला लागले. ग्रामीण साहित्यावर पहिल्यांदाच बार्शीच्या संमेलनात चर्चा झाली. म्हणजे हळूहळू समावेशन सुरू आहे. भूमिका घेणारे लोक अगदी गेल्या ३० वर्षात संमेलनात यायला लागले. यापूर्वी एकच भूमिका होती. 'ना.सी. फडके बोलले... वा...वा... छान छान छान, अमूक बोलले वा...वा... छान छान' असं त्यावेळी होतं. फक्त कौतुकाचीच भूमिका होती. डाव्या आणि आंबेडकरवादी लेखकांनी भूमिका घ्यायला भाग पाडले.

**प्रश्न : विद्रोही साहित्य संमेलने, दलित साहित्य संमेलने ही, मराठी साहित्य संमेलनाला बोलावलं जात नाही म्हणून पुढे आली?**

**कोत्तापल्ले** : नाही, नाही. विद्रोही साहित्य संमेलन थोडं आपण वेगळं ठेऊ. ही गोष्ट खरी आहे की, पहिल्यांदा दलित साहित्य संमेलन आलं. आपली वेगळी विचारधारा आहे, आपण मांडूयात म्हणून ते सुरू झालं. त्यानंतर मग ग्रामीण आलं, मग आदिवासी आलं. एक संयुक्त प्रयोगही झाला. ग्रामीण, आदिवासी आणि दलित असं एकत्रही झालं. गेल्या ३० वर्षात हा सगळा व्यवहार घडून गेलेला आहे आणि म्हणून आता भूमिका असलेले लेखक थोडे हा होईना दिसताहेत आणि थोडे लेखक संमेलनात येताहेत.

**प्रश्न : साहित्य संमेलनं चालू राहतील आणि त्यांचा जो समाजासाठी उपयोग आहे तो कसा टिकून राहील, यासाठी काय केले पाहिजे?**

**कोत्तापल्ले** : संमेलनं तर चालूच राहणार आहेत. कारण दरवर्षी आपण पाहतो की, हे संमेलन घेण्यासाठी खूप लोक इच्छुक असतात. त्या सगळ्यांचं वाङ्मयावर प्रेम असतंच असं नाही. हेसुद्धा समजून घेतलं पाहिजे. त्यांचे वेगवेगळे हेतू असतात, पण हेतू कोणता का असेना, दरवर्षी किमान चार-पाच लोक असं म्हणतात की, आम्ही संमेलन घेऊ इच्छितो. त्यामुळे संमेलन चालू राहणारच. या संमेलनाचं स्वरूप तुम्हाला बदलायचं असेल तर मुळामध्ये मूळ घटकसंस्थेकडेच जावं आणि मूळ घटकसंस्थेमध्ये शिरणं, त्यात बदल करणं ही थोडीशी दीर्घ प्रक्रिया आहे. आपण तर त्यावर नेहमी बहिष्कारच टाकतो. अनेक लोक असं म्हणतात, कशाला जायचं साहित्य संमेलनाला, काय असतं तिथे ? आणि मग संमेलनाच्या वेळी मात्र गदारोळ करतात. हे चुकीचं झालं, अमूक झालं, तमूक झालं. बाबा रे तिथे लोकशाही पद्धतीने निवडणुका होतात. तिथे जायला तुम्हाला कोणी अडवत नाही. त्यामुळे तिथे जा आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हा. ●●●



# सामाजिक समानतेपासून आपण अद्यापही कोसो दूर



डॉ.विनोद मिश्रा

आपण नुकताच सत्तरावा प्रजासत्ताक दिन साजरा केला. साहजिकच सामाजिक समतेचा विचार करता आपण या संपूर्ण काळात किती प्रगती केली आहे, या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. या संदर्भात गेल्या सात दशकांतील अनुभव आणि उपलब्धी संमिश्र स्वरूपाच्या आहेत. गरिबीच्या गुणोत्तरात लक्षणीय घट करणे, अन्नसुरक्षेच्या बाबतीतील स्वयंपूर्णता आणि विशेषतः गेल्या दोन दशकांतील मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आलेली आणि गाजावाजा झालेली उच्च आर्थिक वृद्धी अशी काही दीर्घकालीन उद्दिष्टे आपण यशस्वीरित्या साध्य केली आहेत. मात्र विविध विकास कार्यक्रम आणि त्यातही विशेषतः गरिबी निर्मूलन कार्यक्रमांसारखे विकास कार्यक्रम शाश्वत ठेवण्यासाठी उच्च आर्थिक वृद्धी आवश्यक असली तरीही तिच्यामुळे सामाजिक तफावती निर्माण होत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी आखलेली विविध धोरणे आणि कार्यक्रम यांच्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासारख्या दुर्बल सामाजिक गटांच्या सामाजिक आणि आर्थिक हितामध्ये सुधारणा होण्यास मदत झाली असली तरीही घरे, अन्न, शिक्षण आणि आरोग्य यांच्यासारख्या विविध मूलभूत सेवा उपलब्ध होण्याच्या संदर्भातील तफावती मात्र वाढत गेल्या आहेत. देशाच्या लोकसंख्येचा जवळजवळ चौथा भाग असलेल्या अनुसूचित जातींना आणि अनुसूचित जमातींना सामाजिक ओळखीच्या आधारे अलगीकरण आणि भेदाभेद यांमुळे पद्धतशीरपणे समान प्रवेश किंवा उपलब्धी नाकारण्यात आली आहे.

देशाच्या सामाजिक आणि राजकीय यंत्रणेने समाजाच्या मुख्य प्रवाहात विविध गटांना समाविष्ट करण्यासाठी विविध कार्यक्रम सुरू केले. मात्र तरीही सामाजिक तफावती तशाच राहिल्या. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या काही दशकांत सकारात्मक विकास झाला असला तरीही काही सामाजिक समस्या सोडवल्या गेलेल्या नाहीत आणि भारतात त्या अद्यापही तशाच रेंगाळत राहिल्या आहेत. चांगली घरे किंवा निवारा, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या विविध तरतुदींपासून सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समाजांना अद्यापही बाजूलाच ठेवण्यात आले आहे आणि हीच सर्वाधिक महत्त्वाची समस्या आहे. राज्य आणि केंद्र सरकारांनी विशिष्ट धोरणांच्या आणि कार्यक्रमांच्या स्वरूपात केलेल्या विविध प्रयत्नांनंतरही अनुसूचित जाती आणि अनुसूचित

जमाती यांच्यासारखे सामाजिकदृष्ट्या उपेक्षित घटक अद्यापही मागासच राहिले आहेत.

स्वाभिमानी जीवनासाठी अन्न, निवारा आणि वस्त्र या तीन मूलभूत गरजा महत्त्वाच्या मानल्या जातात. अन्न आणि पोषण ही मूलभूत मानवी गरज आहे. आरोग्यपूर्ण जगण्यासाठी पुरेशा प्रमाणात अन्न उपलब्ध असण्याची आवश्यकता असते. परंतु भारत प्रजासत्ताक बनल्याच्या सत्तर वर्षांनीही संपूर्ण लोकसंख्येला पुरेसे अन्न पुरवण्यास आपण सक्षम बनलेलो नाही. सामाजिक गटनिहाय विश्लेषणातून असे सूचित होते की, सर्व सामाजिक गटांमध्ये अनुसूचित जातींमध्ये आणि अनुसूचित जमातींमध्ये भुकेची भीषण समस्या असण्याचे सर्वोच्च प्रमाण आहे. ७० वर्षांनंतरही जागतिक भूक निर्देशांकावरची भारताची कामगिरी दुःखदायक आहे. सन २०१८ मध्ये जागतिक भूक निर्देशांकावर एकूण ११९ देशांमध्ये भारताचा १०३ क्रमांक होता.

गंभीर पातळीवरच्या भुकेला तोंड द्यावे लागणाऱ्या ४५ देशांमध्ये भारताचा समावेश आहे ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. त्याबरोबरच भारताच्या लोकसंख्येत मोठे प्रमाण असलेल्या उपेक्षित, शोषित समूहांमध्ये पुरेशा प्रमाणात अन्न आणि पोषण उपलब्ध असण्याचे प्रमाणही मर्यादित आहे. स्वातंत्र्यानंतर विशेषतः अनुसूचित जाती आणि महिला यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण खूपच अधिक आहे. भारतात १५ ते ४९ वयोगटातील ५३ टक्के महिला आणि २३ टक्के पुरुष रक्तक्षयाने ग्रस्त (अ‍ॅनेमिक) आहेत. रक्तक्षयाच्या प्राबल्यात गेल्या १० दशकांत फारसा बदल झालेला नाही या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे. (२००५-२०१६). रक्तक्षयाचे प्राबल्य हे कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. गरिबीचे उच्चतर गुणोत्तर आणि पुरेशा प्रमाणात उदरनिर्वाहाची साधने नसणे यांमुळे अनुसूचित जातींना आणि अनुसूचित जमातींना मोठ्या प्रमाणात भूक, रक्तक्षय आणि कुपोषण यांना तोंड द्यावे लागत आहे. एनएफएचएस-४ मधील माहितीनुसार, भारतातील सामाजिकदृष्ट्या दुर्बल गटांमधील सुमारे निम्मी मुले कुपोषणग्रस्त आहेत. दुर्बल, उपेक्षित घटकांमधील रक्तक्षयाच्या प्राबल्याचा विचार करता, अनुसूचित जातींमधील आणि अनुसूचित जमातींमधील ६० टक्क्यांहून अधिक मुलांना रक्तक्षयाच्या परिस्थितींचा त्रास सहन करावा लागत आहे. इतर मागास प्रवर्गातील आणि उच्चवर्णीयांमधील मुलांच्या तुलनेत हे प्रमाण खूपच अधिक आहे. त्याचप्रमाणे भारतातील अनुसूचित जातींमधील आणि अनुसूचित जमातींमधील ४० टक्क्यांहून अधिक महिला तीव्र कुपोषणाच्या समस्यांना तोंड देत आहेत.

वर दिलेल्या आकडेवारीवरून स्पष्टपणे असे सूचित होते की, सामाजिकदृष्ट्या उपेक्षित गटांमधील कुटुंबांना अन्न आणि पोषण अत्यल्प प्रमाणात उपलब्ध होते. भारतातील आणि महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या लोकांना उच्चवर्णीयांच्या तुलनेत पुरेशा प्रमाणात अन्न आणि पोषण मिळण्यापासून अधिक प्रमाणात वंचित रहावे लागते. या वंचनांना तोंड देण्यासाठी भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर अन्न



आणि पोषणासंदर्भात विशेषतः समाजातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विभागांवर भर देऊन विविध कार्यक्रम सुरू केले. या कार्यक्रमांची विविध विभागांकडून आणि सरकारी यंत्रणांकडून अंमलबजावणी केली जात आहे. मात्र तरीही या विविध यंत्रणांमधील सहकार्याच्या आणि सामुदायिक ताकदीच्या अभावामुळे या कल्याणकारी कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीस प्रतिबंध होत आहे. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या वगळणुकीची वागणूक देण्यात येणाऱ्या गटांतील कुटुंबांवर याचा विपरीत परिणाम झाला असून त्यांना विविध कार्यक्रमांचे एकत्रित लाभ मिळण्यास प्रतिबंध झाला आहे.

सहकार्याच्या आणि अंमलबजावणीच्या अभावाच्या समस्या वगळता अनुसूचित जातींच्या विरोधात पाळल्या जाणाऱ्या सर्व स्तरांवरच्या वगळणुकीच्या आणि भेदभावाच्या पद्धती या त्यांना अन्न आणि पोषण यांच्याशी संबंधित विविध कार्यक्रम मर्यादित प्रमाणात उपलब्ध होण्यामागची प्रमुख कारणे आहेत. गाव पातळीवर राबवला जाणारा एकात्मिक बालविकास कार्यक्रम (आयसीडीएस) हा मुलांना आणि महिलांना अन्न व पोषण पुरवणारा प्रमुख आघाडीवरचा कार्यक्रम आहे. विविध अभ्यासांतून पुढे आलेल्या अनुभवाधिष्ठित पुराव्यांवरून असे दिसते की, अनुसूचित जातीच्या मुलांना आणि महिलांना या सेवांमध्ये समान हक्क नाकारला जातो. उपेक्षित, वंचित गटांमधील मुलांना स्वतंत्र, अलग बसायला सांगितले जाते आणि त्यांना नेहमीच शेवटी अन्न दिले जाते. शिवाय गावातील इतर सामाजिक गटांमधील मुलांच्या तुलनेत त्यांना अन्न व पोषक द्रव्ये कमी प्रमाणात दिली जातात. या कार्यक्रमाच्या अत्यल्प यशाला अस्पृश्यतेच्या आणि अन्याय्य वगळणुकीच्या प्रथाही जबाबदार आहेत. त्याचप्रमाणे अनुसूचित जातींसारख्या भेदभाव करण्यात येत असलेल्या गटांना माध्यान्ह भोजन आणि

सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्था (रेशनिंग व्यवस्था) या सेवा मिळवतानाही अन्याय्य वगळणुकीला तोंड द्यावे लागते. अन्न आणि आहारविषयक गरजा भागवण्यासाठीचे हे दोन प्रमुख कार्यक्रम आहेत.

अनुसूचित जातीच्या कुटुंबांना या कार्यक्रमांचा लाभ मिळवताना सेवा पुरवठादारांकडून दिल्या जाणाऱ्या भेदभावाच्या वागणुकीचा सामना करावा लागतो. जातिधारित वगळणूक आणि भेदभावामुळे अनुसूचित जातीच्या कुटुंबांना अन्न आणि पोषण कमी प्रमाणात उपलब्ध होते. गरिबीच्या आर्थिक स्थितीमुळे त्यांना पुरेशा प्रमाणात अन्न आणि पोषण मिळवणे परवडत नाही आणि त्यातूनच त्यांच्यामध्ये भूक आणि निकृष्ट पोषणाची स्थिती निर्माण होते. अखेरीस या सामाजिक गटांमध्ये आरोग्यविषयक खराब फलिते निर्माण होण्यात याची परिणती होते; म्हणजेच त्यांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होतो. सन २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने एकूण १७ जागतिक उद्दिष्टांच्या संचांनी बनलेल्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाचा ठराव केला. भारत हा या ठरावावर सह्या करणाऱ्या देशांपैकी एक आहे. शाश्वत विकासाच्या संचातील दोन क्रमांकाचे उद्दिष्ट हे सन २०३० पर्यंत भूक पूर्णपणे भागवण्याचे म्हणजेच 'झिरो हंगर'चे आहे. याखेरीज या उद्दिष्टांमध्ये कोणालाही मागे न सोडण्यावर भर देण्यात आला आहे. या लेखाच्या वर दिलेल्या भागांत करण्यात आलेल्या विश्लेषणातून स्पष्टपणे असे सूचित होते की, भारताला भुकेचे संपूर्ण निर्मूलन करण्यासाठी आगामी दशकात अत्यंत अवघड असे प्रचंड काम करावे लागणार आहे. इतर देशांप्रमाणे भारतात गरीब लोकांचा एकच सामाईक गट नाही. उदरनिर्वाहाची साधने मिळवताना आणि याचाच अर्थ गरिबी आणि भूक कमी करताना सामाजिक-धार्मिक आणि वांशिक ओळखी महत्त्वाची भूमिका बजावतात. केंद्र आणि राज्य सरकारे गरिबी निर्मूलनाचे आणि रोजगाराचे विविध कार्यक्रम राबवत आहेत. या कार्यक्रमांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासारख्या सामाजिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या गटांवर खास भरही दिला जात आहे. परंतु विशेषतः उपेक्षित सामाजिक गटांमधील गरिबी निर्मूलनात या कार्यक्रमांचा परिणाम मर्यादित स्वरूपाचा आहे. विविध सामाजिक गटांमधील गरिबीविषयक आकडेवारीच्या विश्लेषणातून असे दिसते की, सर्व सामाजिक गटांमधील गरिबीत घट झाली असली तरी अनुसूचित जातींमधील आणि अनुसूचित जमातींमधील गरिबीच्या गुणोत्तरातील घट ही इतर प्रबळ सामाजिक गटांच्या तुलनेत कमी आहे.

भारताची राज्यघटना आणि त्यातही विशेषतः मूलभूत हक्क आणि राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांद्वारे अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या हितांचे रक्षण करणाऱ्या विशिष्ट तरतुदी देण्यात आल्या आहेत. राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून सत्तर वर्षांनंतरही वंचित सामाजिक घटकांना पद्धतशीरपणे करण्यात येणाऱ्या भेदभावाला, वगळणुकीला आणि सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये समान हक्क नाकारले जाण्याला तोंड द्यावे लागत आहे ही गोष्ट दुःखद आणि दुर्दैवी आहे.



विशिष्ट सामाजिक गटाच्या सामाजिक ओळखीला चिकटून असलेले पूर्वग्रह आणि कलंक हेच अद्यापही अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या विविध निर्देशकांची फलिते निश्चित करत आहेत. स्वातंत्र्यानंतर सरकारने सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे कल्याणकारी कार्यक्रमांचे लाभ मिळवण्याच्या संदर्भात उपेक्षित, वंचित सामाजिक गटांच्या आर्थिक स्थितींमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. मात्र हा सकारात्मक कल असला तरीही उपेक्षित, वंचित सामाजिक गटांमधील बदलाचा दर अत्यंत कमी आहे. त्यामुळे गरिबीत सर्वसामान्यपणे घट झाली असली तरीही रोजगार, निवारा किंवा घरे, आरोग्य, शिक्षण आणि पोषण या जीवनाच्या मूलभूत, अत्यावश्यक गरजा मिळवण्यात सामाजिक गटांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावती आहेत. उपेक्षित, वंचित गटांमधील उच्च प्रमाणातील गरिबी टिकून राहिली असून त्याबरोबरच या गटातील आरोग्य, शिक्षण आणि पोषण यांची स्थितीही खराब आहे. धोरणकर्त्यांनी याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.



फक्त कार्यक्रमांची रचना आणि अंमलबजावणीच वंचित गटांना अनुकूल असून चालणार नाही; तर कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना भेदभावाच्या रुढींचे निर्मूलन करण्यावरही लक्ष केंद्रित करण्याची तातडीची गरज आहे. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची वगळणुकीच्या आणि भेदभावांच्या रुढींच्या पालनाची भूमिका आणि अनुसूचित जातींच्या विरोधातील जातिधारित पूर्वग्रह आणि दृष्टिकोन हेसुद्धा सामाजिकदृष्ट्या वगळणूक करण्यात येणाऱ्या गटांमध्ये या कार्यक्रमांचा मर्यादित परिणाम दिसण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. या गोष्टी लक्षात घेऊन कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतील भेदभावाच्या पद्धतींचे निर्मूलन करण्याच्या उपाययोजनांचा सरकारी धोरणांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये समावेश करण्याची गरज आहे.

अशा प्रकारे, भारताच्या राज्यघटनेने विविध कायदेशीर संरक्षणे देऊनही अनुसूचित जातींसारख्या उपेक्षित, वंचित गटांना अस्पृश्यतेची, भेदभावाची, वगळणुकीची आणि अत्याचाराची वागणूक देण्याच्या प्रथा अद्यापही सुरूच राहिल्या आहेत. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये न्याय्य वाटा आणि समान हक्क मिळण्यापासून भारताच्या एक चतुर्थांश लोकसंख्येला वंचित ठेवणाऱ्या भारताच्या प्रशासनाच्या आणि सामाजिक व्यवस्थांच्या या दुखण्याचे सिंहावलोकन करण्याची गरज आहे. आम्ही २०१९ मध्ये तोंड द्यावी लागणारी अनेकविध आव्हाने सूचित केली आहेत. यात गरिबी आणि भुकेच्या आव्हानांबरोबरच रोजगारात, आरोग्याच्या संदर्भात आणि शिक्षणात समान हक्क नाकारले जाणे यांसारख्या अधिक प्रमाणातील घटनांचा समावेश आहे. उच्च आर्थिक वाढ राखण्यात भारत यशस्वी झाला आहे, परंतु भारताच्या राज्यघटनेच्या अंमलबजावणीला ७० वर्षे झाल्यानंतरही अद्याप प्रचंड गरिबीत आणि भुकेल्या स्थितीत जगणाऱ्या भारतातील लाखो वंचित गटांच्या आयुष्याला कलाटणी देण्यात, त्यांच्या आयुष्यांत बदल घडवून आणण्यात या वाढीचे लाभ रूपांतरित झालेले नाहीत. वंचित, शोषित, सामाजिक गटांना समान सामाजिक आणि आर्थिक हक्क देण्यास सातत्याने नकार देण्यात आल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासात बिघाड झाला आहे. म्हणून शोषित, वंचित गटांना आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात समान हक्क मिळावेत यासाठी भेदभावाच्या दहशतीच्या निर्मूलनाची हमी देणाऱ्या अर्थपूर्ण मध्यस्थीची तातडीची गरज आहे. जोपर्यंत आपण हे साध्य करणार नाही, तोपर्यंत राज्यघटनेने दिलेले सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य निरर्थक असेल. ●●●



# भय, भूक, बेरोजगारीचा आगडोंब

**सत्ताधारी कुणीही असो, त्यांनी लोककल्याणाच्या नावाखाली जनतेच्या तोंडाला पाने पुसली. काँग्रेसने 'गरिबी हटाव'चा नारा देत गरिबांच्या मतांवर राज्य केलं. पूर्ण बहुमतानं सत्तेवर आलेले मोदी सरकार तर घराणेशाहीचा बागुलबुवा उभा करून 'अच्छे दिन'च्या भूलभुलैयाने जनतेचा भ्रमनिरास केला. सर्वाधिक काळ सत्ता उपभोगलेली काँग्रेस असो, की प्रथमच पूर्ण बहुमतानं सत्ता राबवणारा भाजप असो, या दोन्ही पक्षांनी जनहिताऐवजी वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवून 'मतपेढी'चे राजकारणच केले. त्यामुळे देश प्रजासत्ताक होऊन ७० वर्षे झालेली असूनही या देशातील भय, भूक आणि बेरोजगारी कमी होण्याऐवजी वाढत गेली. कायदा हातात घेऊन संसदीय शासनप्रणालीसमोर संकट निर्माण करणाऱ्या अपप्रवृत्तीही मोदी सरकारच्या काळात बळावल्या, ही चिंताजनक बाब आहे.**

**प्रकाश खंडेलोटे**

भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्याच्या घटनेला २६ जानेवारी २०१९ रोजी ७० वर्षे पूर्ण झाली. विविध जाती, धर्म आणि पंथांच्या अठरापकड जातींच्या देशाचा कारभार याच एका राज्यघटनेनुसार जवळपास सात दशकं सुरळीत सुरू राहिला, ही अभिमानाची बाब बाहे. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाही देशातील सर्व सत्तांतरे लोकशाही पद्धतीने घडून आली आहेत. जगात इतरत्र विशेषतः शेजारील राष्ट्रांमध्ये लष्कराने सत्ता ताब्यात घेण्याचे, जनतेने सत्ताधाऱ्यांविरूद्ध आंदोलन करून सत्तांतर घडविण्याचे प्रकार घडत असूनही आमच्या देशात मात्र संसदीय शासनप्रणाली अबाधित राहिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या राज्यघटनेमुळेच हे शक्य झाले आहे. राज्यघटनेने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये, न्यायालयीन स्वातंत्र्य यात बाधा पोहचू शकली नाही. याचा अर्थ,

नागरिकांच्या अधिकारांवर नियंत्रण आणण्याचे किंवा अनिष्ठ प्रवृत्तींनी राज्यघटनेला दूषण देण्याचे प्रकार घडले नाहीत, असे नाही. अलीकडे राजकारणाचे गुन्हेगारीकरण मोठ्या प्रमाणावर झाले असून कायदेमंडळात गुन्हेगार मंडळी स्थान पटकावू लागली आहे. प्रशासनातही अपप्रवृत्तींनी शिरकाव केलेला आहे. कायदा हातात घेऊन आणि लोकांच्या खाण्या-पिण्या, राहण्यावरही बंधने आणण्याच्या प्रयत्नातून अलीकडे अराजक माजवण्याचा प्रयत्न झाला. अशा प्रवृत्तींवर कोणतीही ठोस कारवाई करण्याचे टाळून सरकारचे त्यांना अभय असल्याचेच दाखवून देण्यात आले. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करून राज्यघटनेची पायमल्ली करण्याचे प्रयत्न आज सुरू आहेत. अशा स्थितीत सैरभैर झालेल्या सामान्य माणसाला संसदेपासून न्यायालयापर्यंत आपल्याला कोणी वालीच उरलेला नाही, ही भीती सतावू लागली आहे.

दोन वर्षे, अकरा महिने आणि १८ दिवस खपून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेची सनद देशाला बहाल केली. येथील समाजाचे मुळापासून मन्वंतर घडून यावे, वर्षानुवर्षांपासून येथील माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या प्रथा-परंपरांना मूठमाती मिळून मानवी मूल्ये जनजीवनात रुजावीत म्हणजेच अंधश्रद्धांना तिलांजली देऊन समाजाने डोळस बनावे, देशातील सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट व्हावी आणि समताधिष्ठित समाज निर्माण व्हावा अशी घटनाकारांची रास्त अपेक्षा होती. परंतु देश प्रजासत्ताक बदल्याच्या ७० वर्षांनीही समताधिष्ठित समाजरचना निर्माण होण्याची घटनाकारांची अपेक्षा पूर्ण झालेली नाही. राजकारण्यांनी केवळ राजकीय लोकशाहीच महत्त्वाची मानल्याने सामान्य जनतेच्या जीवन-मरणाचे प्रश्न अजूनही सुटू शकलेले नाहीत. संविधान सभेत दिलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच अनुषंगाने बजावले होते. ''संविधानाने उभारलेल्या राजकीय लोकशाहीला प्रयत्नपूर्वक सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड आपण न दिल्यास राजकीय लोकशाहीचा डोलारा फार काळ टिकून राहणार नाही.'' घटनाकारांनी त्यावेळी दिलेला हा इशारा प्रत्यक्षात आणण्यासाठी काही शक्ती आज सक्रिय आहेत. बाबासाहेबांनी राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याला महत्त्व दिले होते. परंतु राजकारण्यांनी सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याला गौण लेखले. राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याच्या उद्देशाने झपाटलेल्या तत्कालिन नेतेमंडळींनी सामाजिक स्वातंत्र्याला तिलांजली देण्याचे काम केले. आजही तेच सुरू आहे. त्यामुळे देशात भूक, भय, दारिद्र्य, बेरोजगारी वाढताना दिसत आहे.

स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे उलटली तरी गरिबीशी झगडणारा माणूस दारिद्र्यरेषेच्या वर येत नाही. धोरणकर्त्यांच्या दृष्टीक्षेपात सामान्य माणूस फार अभावानेच असतो. त्यामुळे त्याचे प्रश्न सुटण्याच्या दृष्टिने नियोजन होताना दिसत नाही. लाखो



रोजगार मिळवण्यासाठी ठिक-ठिकाणी होणाऱ्या रोजगार मेळाव्यांना बेरोजगार तरुण-तरुणींची अशी गर्दी असते. (संग्रहित छायाचित्र.)




२०१६ साली पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या नोटबंदीनंतर नोटा बदलून घेण्यासाठी बँकांसमोर लोकांना असे तिष्ठत रहावे लागले.

लोकांना दोनवेळच्या भाकरीचीही भ्रांत आहे, सन्मानाने जगता येणे तर दूरच. नोएडा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी या संस्थेतील इलेक्ट्रिकल डिव्हायसेस अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स विभागातील प्रा. विपुल इन्सान यांनी केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, जगात ८२० दशलक्ष लोक उपाशीपोटी राहतात. यापैकी एक तृतीयांश लोक एकट्या भारतात राहतात. जगण्यासाठी दिवसाकाठी २० रुपयांपेक्षाही कमी रक्कम हाती पडणाऱ्या भारतीयांचे प्रमाण तब्बल ८३६ दशलक्ष आहे. २० कोटी भारतीय उपाशी झोपतात. म्हणजे आमच्या देशातील २० कोटी लोकांना एकवेळचे जेवण मिळत नाही. भुकेमुळे देशात दररोज सातशेच्यावर लोक मरतात. देशातील भुकेल्या लोकांचे प्रमाण हे दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या सरकारी आकडेवारीपेक्षा नेहमीच जास्त राहिले असल्याचे निरीक्षण विपुल इन्सान यांनी नोंदवले आहे.

देशातील बेरोजगारीचे प्रमाणही वरचेवर वाढताना दिसत आहे. डिसेंबर २००२ मध्ये बेरोजगारीचे प्रमाण ४.४३ टक्के होते. ते २०१४ मध्ये ३.४१ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे जागतिक बँकेचा अहवाल सांगतो. भारतीय अर्थव्यवस्था देखरेख संस्थेने (सीएमआयई) दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर २०१८ मध्ये बेरोजगारीचे प्रमाण ६.९ टक्के होते. दोन वर्षांतील हे उच्चांकी प्रमाण आहे. मागील ऑक्टोबरमध्ये रोजगार मिळवू इच्छिणाऱ्यांची आकडेवारी २९.५ दशलक्षांपर्यंत पोहोचली असल्याचे सीएमआयईने म्हटले आहे. अजिम प्रेमजी विद्यापीठाच्या स्थायी रोजगार केंद्राच्या २५ सप्टेंबर २०१८ रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, भारतातील धोरणकर्ते आणि प्रशासक हे गतिने वाढणाऱ्या बेरोजगारीच्या मोठ्या नवीन आव्हानाला तोंड देत आहेत. मागील २० वर्षांत यंदा प्रथमच युवकांच्या बेरोजगारीचे प्रमाण १६.१ टक्के अधिक झाल्याचे अहवालात म्हटले आहे. ८२ टक्के पुरूष आणि ९८ टक्के महिलांची मिळकत महिना १० हजार रुपयांपेक्षा कमी असून मजुरीत झालेल्या घटीमुळे रोजगार कमी झाल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे. महिना १० हजार रुपये कमाई असेल तर त्यातून मुलांचे शिक्षण, आरोग्य, घरखर्च कसा भागवणार? एकीकडे देशात श्रीमंतांची संख्या वाढत असताना गरिबांच्या प्रश्नांचा गुंता अत्यल्प मजुरी आणि रोजगार घटीमुळे वाढताना दिसतो आहे. 'हरूण' संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार, जगभरातील अब्जाधिशांमध्ये भारताचा तिसरा क्रमांक आहे. २०१८ मध्ये 'हरूण'ने प्रसिद्ध केलेल्या श्रीमंतांच्या यादीत ३१ भारतीयांचा समावेश आहे.

इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या निवडणूक प्रचारात 'गरिबी हटाव'ची घोषणा केली होती. पुढे राजीव गांधी यांनीही याच घोषणेचा पुरस्कार करीत गरिबांच्या मतांवर राज्य केलं. गरिबांची गरिबी मात्र कमी होऊ शकली नाही. काँग्रेसच्या पी.व्ही. नरसिंहराव सरकारने १९९१ साली आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली भारतीय बाजारपेठ खुली करून गरिबांच्या जगण्यावर वरवंटा फिरवण्याचे काम केले. २०१४ साली पूर्ण बहुमताने सत्तेत आलेल्या नरेंद्र मोदींनी 'सबका साथ, सबका विकास'चा धोशा लावत भांडवलदारांच्या हितासाठी सरकार चालवलं. 'अच्छे दिन'च्या प्रतीक्षेत गोरगरीब लोक मात्र समस्यांच्या जंजाळातून बाहेर येऊ शकले नाहीत. लोकहिताच्या म्हणून ज्या योजना मोदींनी सुरू केल्या, त्यांचा लाभ देशातील किती लोकांना झाला असेल, हे एक कोडंच आहे. कारण योजनांच्या

काटेकोर अंमलबजावणीपेक्षा त्यांचं मार्केटिंग करण्यावरच या सरकारचा भर आहे. शहरातील गरिबांना अल्पदरात निवारा उपलब्ध करण्यासाठी सुरू केलेली प्रधानमंत्री आवास योजना असेल किंवा ८०० ते ८५० रुपयांत (अनुदान नाकारून) गोरगरीब महिलांना गॅस जोडणी देणारी उज्ज्वला योजना असेल, त्या कुण्या गरिबांच्या भल्याच्या ठरल्या, हा एक संशोधनाचाच विषय ठरू शकतो. शेतकरी, कामगार, महिलांच्या हिताला प्राधान्य देण्यापेक्षा उद्योगपतींच्या हिताचा विचार करणारे मोदी सरकारही काँग्रेसच्याच पावलावर पाऊल ठेऊन चाललेय. किंबहुना मोदींच्या राजवटीत भय, भूक, दारिद्र्य, बेरोजगारी वाढली आहे.

बेरोजगारांच्या हाताला काम नाही आणि उपजीविकेच्या साधनांची उपलब्धता नसल्यामुळे दलित-आदिवासींच्या जगण्यात 'राम' राहिलेला नाही. देशात अनेकांना दोनवेळच्या भाकरीची भ्रांत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र परदेश दौऱ्यात मशगुल आहेत. ५९ देशांच्या दौऱ्यांवर मोदींनी जानेवारी २०१९ पर्यंत २०२१ कोटी रुपये खर्च केले आणि याच्या बदल्यात १,३६,०७७.७५ मिलियन एवढी विदेशी गुंतवणूक आणली. विशेष म्हणजे, ज्या देशाचा दौरा त्यांनी केला त्यापैकी केवळ १० देशांतून भरीव गुंतवणूक आली. स्मारकांचे राजकारण जीवंत ठेऊन सरकारची नौका त्यांनी तिरावर आणली. देशात बेरोजगारीचा आकडा फुगत असताना, शेतमालाला रास्त दर देण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू असताना आणि नोटबंदीनं छोट्या व्यावसायिकांवर संक्रांत आणलेली असताना सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यावर २,९८९ कोटींची उधळपट्टी सरकारने केली. ६८ वर्षात प्रजासत्ताक भारतातील गोरगरीब जनतेला अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेही आम्हाला शक्य झालेले नाही. प्रजासत्ताकाच्या सात दशकानंतरही या देशातील प्रजेचे प्रश्न सुटण्याऐवजी जटील बनले. जनतेला झुलवत ठेऊन सत्ताधारी आपापला 'अजेंडा' राबवत राहिले.

## राजकारणासाठी राज्यघटनेची चौकट मोडीत काढण्याचा प्रयत्न

१९९३ साली अयोध्येत झालेल्या विध्वंसानंतर देशात जे सूडचक्र सुरू झाले, त्याचे परिणाम असंख्य निरपराधांना भोगावे लागले आहेत. त्याच्या परिणामाची दाहकता अजूनही आहे. लाभासाठी काही राजकीय पक्ष राममंदिराचा मुद्दा पेटता ठेवण्याचे क्षुद्र राजकारण करत आहेत. २०१९ च्या निवडणुका जिंकण्यासाठी काही हिंदुत्ववादी संघटना आणि पक्ष अयोध्येत राममंदिर झालेच पाहिजे, अशी भूमिका घेऊन वातावरण पेटवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे पायाखालची जमीन सरकलेल्या भाजप सरकारने सवर्णांमधील गरिबांना १० टक्के आरक्षण देण्याचा कायदा केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के घालून दिलेली आहे आणि राज्यघटनेतही अशा आरक्षणाची तरतूद नाही. परंतु मोदी सरकारने राजकीय लाभासाठी १० टक्के आरक्षणाचा कायदा केला. सत्तेची ऊब कायम ठेवण्यासाठी भाजप राज्यघटनेची चौकट मोडीत काढण्याचा प्रयत्न करत आहे. ●●●



ग्रामीण भागातील भीषण पाणीटंचाईचे असे चित्र सर्वत्र आढळते.



शेतमालाला रास्त दर मिळत नसल्याने सरकारचा निषेध करताना शेतकरी.



# व्यक्त न होऊ देणं किती अस्वस्थ करतं !!!

**इंग्रजी भाषेतील ज्येष्ठ लेखिका नयनतारा सहगल यांना यवतमाळच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून आमंत्रित केल्यानंतर आमंत्रण रद्द करण्यात आले. त्यांच्या प्रखर आणि रोखठोक भाषण शैलीमुळे त्यांना राजकीय हस्तक्षेपातून संमेलनापासून दूर ठेवण्यात आले असले तरी संमेलनापूर्वीच त्यांचे उद्घाटकीय भाषण बीबीसीच्या सौजन्याने प्रसारमाध्यमांमध्ये प्रसृत झाले. सहगल यांच्या इंग्रजी भाषणाचा प्रशांत तळणीकर यांनी केलेला अनुवाद वाचकांसाठी येथे देत आहोत....**

**- संपादक**

---

यवतमाळ येथे ११ ते १३ जानेवारी या कालावधीत झालेल्या ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून उद्घाटनाच्या भाषणाद्वारे नयनतारा सहगल जी भूमिका मांडणार होत्या, ती त्यांनी बीबीसी मराठीवर व्यक्त केली. सध्याच्या सामाजिक-राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी जे महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत, ते येथे ठळकपणे नमूद केले आहेत.

माझ्याकरता हा एक भावनिक क्षण आहे. मला असे वाटते आहे की, ज्यांचे नाव आपल्या देशाच्या आधुनिक इतिहासामध्ये नोंदवले गेलेले आहे, ते मराठी साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ रोवणारे महादेव गोविंद रानडे (माझे चुलत आजोबा शंकर पांडुरंग पंडित हे त्यांचे जवळचे स्नेही आणि सहकारी होते), या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवलेले सर्व थोर मराठी साहित्यिक आणि ज्यांच्या लेखनामुळे भारतीय साहित्य नावाचे महान सृजनात्मक कार्य समृद्ध झालेले आहे, असे सर्व संमेलनांमध्ये सहभागी झालेले सगळेच लेखक, या सर्वांच्या छायेत मी आज उभी आहे. माझ्याकरता हा क्षण भावनिक असण्याचे आणखी एक कारण म्हणजे माझे वडील रणजित सीताराम पंडित यांच्याकडून माझे स्वतःचे महाराष्ट्राशी असलेले नाते. त्यांच्याबद्दल थोडक्यात तुम्हाला सांगू इच्छिते.

संस्कृत विद्वानांच्या एका नामांकित कुटुंबातले माझे वडील स्वतःही संस्कृतचे विद्वान होते. त्यांनी 'मुद्राराक्षस', कालिदासाचे 'ऋतुसंहार' आणि 'राजतरंगिणी' या तीन अभिजात संस्कृत ग्रंथांचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले होते. त्यापैकी 'राजतरंगिणी' हा ग्रंथ म्हणजे कल्हण पंडिताने बाराव्या शतकामध्ये लिहिलेला काश्मिरी राजांचा इतिहास आहे. माझ्या वडिलांना या ग्रंथाचे विशेष आकर्षण होते, कारण संस्कृत आणि काश्मीर हे दोन विषय त्यांच्या अगदी जिव्हाळ्याचे होते.

ब्रिटिश अंमल असताना त्यांना अनेकवेळा तुरुंगात जावे लागले होते. त्यापैकी दोन तुरुंगवाऱ्यांमध्ये मिळून त्यांनी हे भाषांतर केले आणि ते आपले काश्मिरी श्वशूर पंडित मोतीलाल नेहरू यांना अर्पण केले. हे भाषांतर प्रकाशित झाले, तेव्हा त्यांचे मेहुणे जवाहरलाल नेहरू यांनी त्याची प्रस्तावना लिहिली.

डॉ. अरुणा ढेरे आणि प्रशांत तळणीकर यांनी अतिशय कष्टपूर्वक हा प्रदीर्घ इतिहास माझ्या वडिलांच्या आणि त्यांच्या स्वतःच्या मातृभाषेमध्ये आणला, याबद्दल मी त्यांची मनः

पूर्वक ऋणी आहे. मी खात्रीने सांगू शकते की, इतर कशाहीपेक्षा माझ्या वडिलांना या गोष्टीचा मनस्वी आनंद झाला असता.

## देशभक्तीचा वारसा

माझ्या आई आणि वडिलांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये भाग घेतला होता. या काळात माझी आई विजयालक्ष्मी पंडित हिला तीन वेळा, तर माझ्या वडिलांना चार वेळा तुरुंगवास घडला होता. वडिलांच्या चौथ्या तुरुंगवासाच्या वेळी बरेलीतल्या तुरुंगामध्ये माझे वडील गंभीर आजारी पडले. त्या तुरुंगातले एकूण वातावरण आणि तिथली सर्व व्यवस्था केवळ भयानक होती.

वडील आजारी पडल्यावर ना त्यांना कुठलेही वैद्यकीय उपचार देण्यात आले, ना त्यांच्या आजाराच्या नेमक्या स्वरुपाची आणि तीव्रतेची माझ्या आईला कल्पना देण्यात आली. पण असे असूनही माझ्या वडिलांनी सुटकेची याचना करण्यास नकार दिला. अखेर जेव्हा माझ्या आईला त्यांच्या अवस्थेबद्दल कळवण्यात आले, तेव्हाही तिला त्यांच्याशी फक्त वीस मिनिटांची भेट मंजूर करण्यात आली. ही भेटही नियमाप्रमाणे तुरुंग अधीक्षकांच्या कार्यालयामध्ये, त्यांच्या नजरेखाली झाली. या नियमांमध्ये राजकीय बंद्यांना त्यांना भेटायला आलेल्या व्यक्तीसोबत एकांत मिळण्याची तरतूद नव्हती. भेटीसाठी म्हणून माझ्या वडिलांना जेव्हा तिथे स्ट्रेचरवर आणण्यात आले, तेव्हा माझ्या आईला प्रचंड धक्का बसला.

डोक्याचा संपूर्ण गोटा केलेला आणि शरीरावर मांस जणू नाहीच, अशी त्यांची अवस्था होती. त्यांना पाहताच आईला रडू फुटले, पण तुरुंगाधिकाऱ्यासमोर तिने अश्रू ढाळलेले वडिलांना अजिबात आवडले नसते हे ठाऊक असल्याने तिने महत्प्रयासाने स्वतःच्या अश्रुंना बांध घातला. सुटकेची याचना करून सरकारचे उपकार शिरावर न घेण्यामागची त्यांची भूमिका त्यांनी तिच्याजवळ स्पष्ट केली.

ते म्हणाले, 'गांधी आणि नेहरू या सिंहांच्या साथीने मी लढलो आहे. मग आता मी (भित्र्या) कोल्ह्याप्रमाणे वागावे असे तुला वाटते का?' त्यांच्या निर्धारामध्ये बदल होणार नाही हे ठाऊक असल्यामुळे तिने स्वतःच्या भावनांना आवर घातला आणि त्यांचा हात हातात घेऊन ती त्यांच्या स्ट्रेचरजवळ बसून राहिली. मग तिने त्यांना घरची, मुलांची खबरबात सांगितली आणि त्यांच्या आवडत्या बागेत सध्या काय-काय फुलले आहे तेही सांगितले. अंतिमतः सरकारने त्यांची सुटका केली, पण ती जणू मरण्यासाठीच, कारण जेमतेम तीनच आठवड्यांनी त्यांचा मृत्यू झाला. नंतर अनेक वर्षांनी, स्वातंत्र्य मिळाल्यावर, माझी आई भारताची ब्रिटनमधील उच्चायुक्त असताना एकदा पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्यासोबत भोजन घेत असताना चर्चिल तिला म्हणाले, 'तुमच्या पतीचा जीव आम्हीच घेतला, नाही?' त्यांचे हे कबुलीजबाबासम उद्‌गार ऐकून तिला खूप आश्चर्य वाटले होते.

१९४०च्या दशकात तुमच्यापैकी बहुतेकांचा जन्मदेखील झालेला नसेल. तुम्ही सगळे एका स्वतंत्र देशात जन्मले आणि मोठे झालेले आहात, म्हणून मी तुम्हाला ही व्यक्तिगत कहाणी सांगितली. त्यावरून तुम्हाला त्या काळातल्या धैर्य आणि शिस्त यांची, तसेच देशाच्या स्वातंत्र्याकरता जे स्त्री-पुरुष लढले, त्यांच्या निर्धाराची कल्पना यावी. त्या महान लढ्यामध्ये ज्यांनी आपले आयुष्य पणाला लावले आणि स्वातंत्र्याची तीव्र आस असल्यामुळे सर्व प्रकारे प्रचंड दुःखही भोगले, अशा ज्ञात-अज्ञात, आबालवृद्ध, हजारो, लाखो भारतीयांमध्ये माझे आईवडील होते. मला तुम्हाला विचारायचे आहे, आज आपल्यामध्ये स्वातंत्र्याची तीच आस आहे का? आपल्या आधी होऊन गेलेल्या, भारताच्या भावी पिढ्या स्वातंत्र्यात जगाव्या म्हणून लढत मृत्यू पत्करलेल्या स्त्री-पुरुषांचे नाव सांगण्यास आपण पात्र आहोत का?

## धार्मिक-सांस्कृतिक विविधता संपवण्याचा प्रयत्न

मी हा प्रश्न उपस्थित करण्याचे कारण म्हणजे आपली विविध प्रकारची स्वातंत्र्ये आज धोक्यात आहेत. या स्वातंत्र्यांना असलेल्या धोक्यांनी माझ्या मनात एवढे वादळ उठवले आहे, की आज इथे तुमच्यासमोर काय बोलायचे याचा विचार करत असताना, सध्या भारतामध्ये जे काही चालले आहे त्याबद्दलच तुमच्याशी बोलायला हवे हे माझ्या लक्षात आले. याचे कारण म्हणजे, या गोष्टी आपल्या जीवनाच्या प्रत्येक बाबीवर वाईटरित्या परिणाम करत आहेत. आपण काय खातो, कुणाशी विवाह करतो, काय विचार करतो, काय लिहितो आणि अर्थातच, आपण ईश्वराची प्रार्थना कशी करतो. आज अशी परिस्थिती आहे, जिच्यात वेगळेपण आणि सत्तारुढ विचारप्रणालीला विरोध या गोष्टींवर भयंकर हल्ले होत आहेत.

वैविध्य हे आपल्या सामाजिक व्यवस्थेचे मूळ आहे. आपल्याकडे विविध भाषांमधले प्राचीन साहित्य आहे. आपण वेगवेगळ्या प्रकारचे अन्न खातो, आपली वेशभूषा वेगवेगळी आहे, आपले सण वेगवेगळे आहेत आणि आपण वेगवेगळ्या धर्मांचे आचरण करतो. सर्वसमावेशकता हा आपल्या जीवनाचा एक भाग राहिलेला आहे आणि ही प्राचीन, बहुसांस्कृतिक सामाजिक व्यवस्था, जिचे नाव भारत आहे, ती म्हणजे आपले सर्वात मोठे, विलक्षण असे यश आहे, जे अन्य कुठल्याही देशाला माहीतदेखील नाही.

आज मात्र धार्मिक विविधता निपटून टाकून आपल्याला एकाच धार्मिक आणि सांस्कृतिक ओळखीमध्ये कोंबू पाहणाऱ्या धोरणामुळे आपली हीच गोष्ट धोक्यात आली आहे. हे धोरण एका फटक्यात, हिंदू नसलेल्या आपल्या कोट्यवधी देशबंधूंचे आणि स्त्रियांचे घटनात्मक अधिकार काढून घेऊन त्यांना आक्रमक, बाहेरचे आणि शत्रू ठरवू पाहते आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यावर देशाची जडणघडण करणाऱ्या आपल्या पूर्वसूरींनी देशाकरता धार्मिक ओळख नाकारली होती आणि भारताला एक निधर्मी लोकशाही प्रजासत्ताक देश घोषित करण्याचा सूज्ञपणा दाखवला होता. याचा अर्थ ते



धर्मविरोधी होते असे नव्हे, तर आपल्यासारख्या विविध धर्म असलेल्या आणि धार्मिक प्रवृत्तीच्या देशाला, केवळ निधर्मी राज्यव्यवस्थाच एक सर्वसमावेशक, तटस्थ छत्रछाया देऊ शकेल आणि तिच्यात प्रत्येक भारतीयाला त्याच्या वा तिच्या श्रद्धेनुसार जगण्याचा व ईश्वरभक्ती करण्याचा अधिकार असेल, हे त्यांनी जाणले होते.

हा निर्णय ज्यात घेतला गेला, त्या विधीमंडळामध्ये बहुसंख्य सदस्य हिंदू होते आणि तरीही त्यांनी अशी एक राज्यघटना तयार केली, जिच्या प्रस्तावनेमध्ये सर्व भारतीयांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावयुक्त जीवनाची हमी देण्यात आली होती. हा उच्च आदर्श घटनेचे शिल्पकार आणि ज्यांच्या अखिल मानवजात समान आहे अशा आग्रहातून जातिव्यवस्थेविरूद्ध एक क्रांती सुरू झाली, ते थोर मराठी विभूती डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या प्रेरणेतून निर्माण झाला होता. आज तोच उच्च आदर्श बाजूला सारण्यात आलेला आहे. अल्पसंख्याक आणि हिंदू राष्ट्राच्या उद्दिष्टाला पाठिंबा न देणारे लोक रस्त्यांवरून मोकाट फिरणाऱ्या दुराग्रही लोकांचे लक्ष्य ठरत आहेत.

नुकतीच देशाविरूद्ध कट करण्याचे खोटे आरोप करून, पाच नागरिकांना अटक झालेली आपण पाहिली आहे. आदिवासी आणि जंगलांच्या हक्कांकरता, आणि उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याकरता काम करण्यात आयुष्य वेचलेले हे स्त्री-पुरुष आहेत. ख्रिश्चन चर्चेसचा विध्वंस करण्यात आला आहे आणि ख्रिश्चन लोकांना असुरक्षित वाटते आहे. कायदा हातात घेऊन जीवे मारणारे जमाव गोहत्या आणि गाईचे मांस खाण्यासंबंधीच्या कृत्रिम अफवांच्या आधारे उघडपणे मुस्लिमांवर हल्ले करत आहेत, त्यांना ठार मारत आहेत. आपण सगळे ही झुंडशाही टीव्हीवर पाहात आहोत. उत्तर प्रदेशात गोहत्येच्या नावाखाली या जमावांचे हल्ले सर्रास सुरू आहेत आणि सरकारी यंत्रणा बाजूला उभ्या राहून ते पाहात आहेत. या प्रकारचा दहशतवाद जेव्हा अधिकृत ठरतो, जसे उत्तर प्रदेशात घडते आहे, तेव्हा आपण न्यायाकरता कुणाच्या तोंडाकडे पाहायचे?

## जमावाच्या हिंसाचारामुळे भीतीचं वातावरण

सरकारचा पाठिंबा असलेला जमावाचा हा हिंसाचार बचावहीन लोकांविरूद्ध अनेक ठिकाणी सुरू आहे आणि त्यातल्या दोषींना शिक्षा होत नाहीत. काही प्रसंगांमध्ये उलट बळी पडलेल्या लोकांवरच गुन्हे दाखल झाले आहेत आणि काही ठिकाणी गुन्हेगारांचे कौतुक झाले आहे. या दुःखदायक परिस्थितीची मोजावी लागणारी मानवी किंमत म्हणजे, सुरक्षित राहू शकण्याच्या, आपल्या पद्धतीने ईशप्रार्थना करू शकण्याच्या आपल्या हक्काची ज्यांना शाश्वती वाटत नाही अशा अनेक भारतीयांच्या मनामध्ये भीती आणि दुःख दाटण्याचा काळ आता आला आहे. त्यांच्यापैकी जे गरीब आणि असहाय्य आहेत, ज्यांना त्यांच्या गावांतून, घरांतून आणि नोकऱ्यांमधून हाकलून देण्यात आले आहे. ते लोक कामधंदा, मदत, आशा किंवा भवितव्याविना जगत आहेत. मी कादंबऱ्या लिहिते आणि माझ्या कथांचे वस्तुविषय राजकीय असत आले आहेत. लेखक म्हणून आपण सर्व जाणतो की आपण आपले विषय निवडत नाही. आपल्या सभोवताली असलेल्या विषय आणि वातावरणातून आपण कथांना जन्म देत असतो.

माझा जन्म स्वातंत्र्यलढ्याच्या काळात झालेला असल्यामुळे त्या काळाची आणि त्याने जन्म दिलेल्या देशाची मूल्ये हीच माझ्या काल्पनिक आणि वास्तविक विषयांवरच्या लेखनाचा विषय होती. माझ्या कादंबऱ्या आधुनिक भारताच्या घडण्यासंबधी आहेत असे मला वाटत असे. पण माझ्या शेवटच्या दोन कादंबऱ्या आजच्या काळावर बेतलेल्या असल्याने त्या मात्र आधुनिक भारताच्या बिघडण्यासंबंधी आहेत.

## कलेवर नियंत्रण हे हुकूमशाहीचं लक्षण

आपण सर्व लेखक असल्यामुळे, सध्याच्या राजकीय वातावरणामध्ये आपल्या लेखक आणि कलावंत भाईबंदांच्या बाबतीत काय घडते आहे त्याकडे लक्ष देऊ या. प्रश्न विचारणारे मन, सृजनात्मक कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्य यांना सध्याच्या राजकीय वातावरणामध्ये काहीही स्थान नाही हे आपण पाहतोच आहोत आणि जिथे विचारस्वातंत्र्य किंवा लोकशाही हक्कांप्रती आदर नसतो, तिथे लेखन ही एक धाडसी, धोकादायक कृती बनते. जगभरातल्या हुकूमशाही राजवटींमध्ये नेहमी असेच घडत आले आहे. तिथे कला ही सरकारी नियंत्रणाखाली ठेवली जाते आणि लेखकांनी जर त्यांच्या लक्ष्मणरेषेच्या बाहेर पाऊल टाकले, तर त्यांना शिक्षा होण्याची किंवा छळ होण्याची भीती असते. स्टॅलिनच्या सोव्हिएट युनियनमधल्या जोसेफ ब्रॉड्स्कीचे उदाहरण घ्या. ब्रॉड्स्कीला अटक होते आणि त्याची चौकशी करणारा अधिकारी त्याच्या तोंडासमोर कागद फडकवून विचारतो, 'तू स्वतःला कवी समजतोस? तू याला कविता म्हणतोस? सोव्हिएट युनियनला कुठलेही ठोस योगदान देणारी नसेल, तर ती कविताच नव्हे.' मग तो ब्रॉड्स्कीला तुरुंगात टाकतो. अनेक वर्षांनंतर जोसेफ ब्रॉड्स्कीला साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळते. आणखी एक प्रसिद्ध रशियन प्रकरण आहे

सोल्झेनित्सिन यांचे, ज्यांना सरकारवर टीका केल्यामुळे अनेक वर्षे सायबेरियात सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली गेली होती. त्यांनाही साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. आणि आता कला आणि साहित्याबद्दलचे तेच अज्ञान इथे अवतरले आहे. लेखकांवर अज्ञानमूलक टीकेची आगपाखड आणि त्याहीपेक्षा भयंकर गोष्टी सोसण्याचे प्रसंग येत आहेत.

तीन प्रमुख बुद्धिप्रामाण्यवादी, नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे आणि एम. एम. कलबुर्गी यांना तर्कबुद्धीची कास धरून अंधश्रद्धांना नकार दिल्याबद्दल गोळ्या घालून ठार मारण्यात आले आणि बंगळुरूमध्ये स्वतंत्र विचार आणि हिंदुत्वाला विरोध असल्यामुळे गौरी लंकेशला ठार मारण्यात आले. आणखी काहींना ठार मारण्याच्या धमक्या देऊन लिहिण्यापासून परावृत्त करण्यात आले आहे. आपल्याला सांगितले जाते, 'तुमचे पुस्तक प्रकाशित करू नका, अन्यथा आम्ही ते जाळून टाकू. तुमची चित्रे प्रदर्शित करू नका, अन्यथा आम्ही तुमचे चित्रप्रदर्शन उध्वस्त करू.' चित्रपटकर्त्यांना सांगितले जाते, 'अमुक दृश्यामधले संवाद बदला आणि तमुक दृश्य काढून टाका, अन्यथा आम्ही तुमचा चित्रपट दाखवू देणार नाही आणि तरीही तुम्ही तो प्रदर्शित केला, तर आम्ही सिनेमागृहाची तोडफोड करू. आमच्या भावना दुखावतील असे काही करू नका.' निराळ्या शब्दांत, 'आम्ही सांगू तसे करा अन्यथा तुमचे जीवन आणि तुमची कला सुरक्षित राहणार नाही.' पण सर्जनात्मक कल्पनाशक्ती सरकार किंवा जमावाकडून आदेश स्वीकारू शकत नाही आणि हे भावना दुखावणे वगैरे अर्थातच निव्वळ निरर्थक आहे. शंभर कोटी लोकांना एकाच पद्धतीने विचार करायला लावणे केवळ अशक्य आहे. प्रत्येक समाजगटाला विविध प्रश्नांवर त्याची स्वतंत्र मते असतात आणि त्याच्या स्वतंत्र संवेदना असतात. पण काय चूक आणि काय बरोबर हे भावनांवर ठरत नाही. काही बाबतीत तर भावनांना धक्का लावणे हे आपले कर्तव्यच असते. भावना दुखावण्यावर जर बंदी असती, तर आपण आजही विधवा स्त्रियांना जाळत राहिलो असतो आणि कुठल्याही प्रकारची सुधारणा कधीच झाली नसती. संसदेमध्ये हिंदू कोड बिलावर चर्चा सुरू असताना अनेकांच्या भावना दुखावल्या होत्या आणि साधूंनी संसद भवनावर दगडफेक केली होती. पण जर ते विधेयक पास झाले नसते, तर हिंदू स्त्रियांना कुठलेही हक्क मिळाले नसते.

## इतिहासाचं पुनर्लेखन हा हिंदुत्ववादी मनांचा उद्योग

आता भारताचा इतिहास सरकारच्या नियंत्रणाखाली आणण्यात आल्यावर इतिहासकारांना त्याची धग जाणवू लागली आहे. काही राज्यांमध्ये इतिहासाच्या मोठ मोठ्या भागांची तोडमोड तरी करण्यात आली आहे किंवा ते पूर्णपणे गाळूनच टाकण्यात आले आहे आणि हा सगळा खास इतिहासाचे पुनर्लेखन करण्याकरताच निवडलेल्या हिंदुत्ववादी मनांचा उद्योग आहे.

एखादा भारतीय इतिहास लेखक आणि इतिहासाचे पुनर्लेखन करणाऱ्या या लोकांपैकी एक, यांच्यामधल्या संभाषणाची कल्पना



करायची झाली, तर तो काहीसा असा असेल – इतिहासकार पुनर्लेखकाला म्हणतो, 'अकबराने हल्दिघाटीची लढाई जिंकली. पण या पुस्तकात तुम्ही म्हणत आहात तो हरला. ते कसे काय?' यावर पुनर्लेखक उत्तर देतो, 'तो हरला, कारण मी ठरवले आहे तो हरला. आम्ही सांगू तोच खरा इतिहास.' या पुनर्लिखित इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांपैकी काही पुस्तकांमध्ये संपूर्ण मुघल साम्राज्यच पुसून टाकले आहे आणि निव्वळ इतिहास पुसून समाधान न झाल्यामुळे, त्याचे संपूर्ण नामोनिशाणही उद्ध्वस्त करणे चालले आहे. बाबरी मशीद पाडली गेली आणि गावे व रस्त्यांची मुघल व मुस्लिम नावे बदलली जात आहेत. काही पाठ्यपुस्तकांमध्ये, ज्यांच्या सरकारने आधुनिक भारताची पायाभरणी केली त्या नेहरूंच्या सर्व प्रकारच्या उल्लेखांना चाळणी लावण्यात आली आहे आणि महात्मा गांधींना तर काय, या प्रवृत्तींनी १९४८ मध्ये त्यांनी आपल्याला दिलेल्या 'ईश्वर अल्ला तेरो नाम, सब को सन्मति दे भगवान' या मंत्राबद्दल ईश्वरनिंदेचे कारण दाखवून ठारच मारले आहे. गांधीजींच्या अहिंसेकडे भारतीयांना नपुंसक करून भ्याड बनवण्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते आहे. व्यक्तिशः माझ्या मते निःशस्त्र भारतीयांनी एका साम्राज्याच्या शस्त्रबळाला जे आव्हान दिले, त्यापेक्षा महान शौर्यच नव्हे. लेस्सर ब्रीड्स ही माझी एक कादंबरी म्हणजे त्या अभूतपूर्व कालखंडाला माझी मानवंदना आहे. अनेक गोष्टी पुसून टाकण्याबरोबरच आपण स्वातंत्र्यापासून जोपासलेले वैज्ञानिक मनही मारले जात आहे. त्याची जागा दंतकथा आणि पुराणकथा, तसेच मध्ययुगीन मानसिकता घेत आहेत.

## सरकारी संस्थांची स्वायत्तता धोक्यात

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण उभ्या केलेल्या महत्त्वाच्या संस्थांचा आपल्याला रास्त अभिमान वाटत होता, पण त्यासुध्दा सरकारच्या नियंत्रणाखाली आणण्यात आल्या आहेत. मग त्या कला आणि साहित्याशी संबंधित असोत, वा इतिहासाशी, वा तंत्रज्ञान, विज्ञान, माहिती, शिक्षण वा संस्कृतीशी संबंधित

असोत. सार्वजनिक विद्यापीठे, संग्रहालये आणि अकादम्या आता स्वायत्त उरलेल्या नाहीत. दिल्लीतले नेहरू मेमेरियल म्युझियम आणि ग्रंथालय, हे आपल्या संस्था कशा बिघडवल्या जात आहेत, याचे अगदी सुरूवातीचे उदाहरण आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ हिंदुत्ववाद्यांच्या द्वेषाचे नित्यनैमित्तिक लक्ष्य आहे. एक हिंदू आणि सनातन धर्म नावाच्या महान, ज्ञानप्रकाशी वारश्यावर श्रद्धा असलेली व्यक्ती म्हणून मी हिंदुत्व स्वीकारू शकत नाही. विविधता, मतभेद आणि वादविवाद यांच्याविरूद्ध पुकारण्यात आलेल्या या युद्धामध्ये, ज्यांना स्वातंत्र्याची चाड आहे असे लोक गप्प बसलेले नाहीत. आपल्या मूलभूत हक्कांच्या पायमल्लीच्या विरोधात पदयात्रा आणि मेळावे घेतले जात आहेत. सेवानिवृत्त सनदी अधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातले लोक, वकील, इतिहासकार आणि वैज्ञानिक, दलित आणि आदिवासी, आणि शेतकरी प्रचंड निषेध करत आहेत.

डॉ. आंबेडकरांचे नाव असलेली भीम आर्मी आपला आवाज बुलंद करते आहे. १९२० च्या दशकात आंबेडकर व ई. व्ही. रामस्वामी पेरियार यांनी, जातिव्यवस्थेमध्ये दलितांकरता अपमानास्पद आणि आक्षेपार्ह नियम घालण्याद्वारे त्यांना हीन लेखल्याबद्दल मनुस्मृतीची जाहीर होळी केल्याच्या नाट्यपूर्ण बंडखोर कृतीचा वारसा तिला लाभला असल्याची आठवण आपल्याला करून देते आहे.

आपला वैयक्तिक निषेध जोरकस रीतीने मांडणाऱ्या लोकांमध्ये गायक टी. एम. कृष्णा आणि इतिहासतज्ज्ञ रामचंद्र गुहा आहेत. कृष्णा यांचा कार्यक्रम रद्द करण्यात आला, तर गुहा यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. नुकतेच, महान अभिनेते नसिरुद्दीन शाह यांनी इस्लामच्या विरोधातील युद्धाविरुद्ध वक्तव्य केले आणि त्यांच्या मुलांच्या संबंधात त्यांना कशी भीती वाटते हे सांगितले.

## साहित्यिकांची भूमिका महत्त्वाची

आपण साहित्यिक अशा परिस्थितीमध्ये काय करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर आहे– आपण लिहू शकतो. सशक्त काल्पनिक वाङमय त्याच्या लेखकांनी विवादामध्ये उडी घेऊन कुठली तरी बाजू उचलून धरण्यातून निर्माण होत आले आहे. पण त्यात वितंडवाद किंवा प्रचारकीपणा नव्हता. त्यांची नाटके, कविता आणि कादंबऱ्या लोकांबद्दल होत्या. विचारांबद्दल नव्हे आणि या गोष्टी अशा लेखकांनी लिहिलेल्या आहेत जे त्यांच्या-त्यांच्या काळाशी अगदी समरस झालेले होते आणि आहेत.

लेखक हस्तिदंती मनोऱ्यामध्ये राहात नसतात. त्यांच्या लिखाणातून सुष्ट आणि दुष्ट, उचित आणि अनुचित यांच्या द्वंद्वामध्ये ते ठामपणे एक बाजू घेत असतात. जगभरातील अनेक देशांमधील लेखकांनी लिहिलेले महान साहित्य हेच कार्य करत आलेले आहे आणि हेच साहित्य पिढ्यानपिढ्या लोकांच्या हृदयाला स्पर्श करत आलेले आहे. तेच अजूनही जिवंत आहे. आपण कुठे उभे आहोत हे आपण निवडत असलेल्या विषयांमधून, आपण लिहित असलेल्या कथांमधून आणि आपण त्या ज्या पद्धतीने लिहितो त्यातून, आपण दाखवून देत असतो.

आपण आपल्या आजीच्या स्वयंपाकाबद्दल लिहित असू वा छतावर पडणाऱ्या पावसाबद्दल वा आपल्या प्रिय व्यक्तीच्या शरीराचे वर्णन करत असू, आपण लिहित असलेला प्रत्येक शब्द आपण कुठे उभे आहोत हे स्पष्ट करतो. कुठल्याही सृजनात्मक कलाप्रकाराप्रमाणेच लेखन हादेखील राजकीय कृतीशीलतेचा एक सशक्त प्रकार आहे. आणि ते विद्रोहाचे एक साधन आहे. म्हणूनच हुकूमशहा त्याला भितात आणि त्याच्यावर अंकुश ठेवण्याकरता पावले उचलतात.

## लेखकांचा निषेध

तीन वर्षांपूर्वी पुरस्कार वापसी चळवळीच्या रूपात सुरू झाला. आम्ही सुमारे शंभर जणांनी, पुरस्कार विजेते लेखक डॉ. दाभोलकर यांच्या हत्येच्या निषेधार्थ आमचे साहित्य अकादमी पुरस्कार परत केले. अकादमीने याची काहीही दखल घेतली नाही. पण दिल्लीजवळच्या दादरी गावातील एक गरीब लोहार मोहंमद अखलाक याची जमावाने हत्या केल्यानंतर आमची ही चळवळ वाढली आहे आणि लोकशाही व मानवी हक्कांवरील हल्ल्यांशी संबंधित अन्य घटनांपर्यंत तिची व्याप्ती वाढली आहे.

माझ्यावर आपली छाप सोडलेल्या परदेशी लेखकांच्या लेखनाविषयी मी उल्लेख केला, कारण मी त्यातले काही लेखन भाषांतराद्वारे वाचू शकले. आपल्या अनेकानेक भाषांमधल्या भारतीय लेखनाचे काय? भाषांतराच्या अभावी आपण एकमेकांना वाचू शकत नाही ही शोकांतिका आहे. आपले संगीत, आपली नाटके आणि आपले चित्रपट आपल्याला एकत्र आणत असले, तरी आपले साहित्य आपल्याला एकमेकांपासून दूरच ठेवते आणि जोवर आपण एकमेकांना वाचू शकत नाही, तोवर आपण एकमेकांना जाणून घेऊ शकत नाही. प्रकाशक मंडळी ही दरी दूर करतील आणि भारतीय भाषांमधले साहित्य आपल्यालाच नव्हे, तर संपूर्ण जगात उपलब्ध होईल, अशी मी फक्त आशा व्यक्त करू शकते. मला विशेषतः मराठी स्त्री लेखिकांना सलाम करायला हवा, कारण स्त्रियांना आपले जीवनानुभव शब्दांमध्ये कागदावर उतरवण्याकरता कितीतरी भयंकर अडथळे पार करावे लागतात. आपला पती, आपले कुटुंब आणि समाजाला दुखावण्याचा धोका त्यांना पत्करावा लागत असतो, त्यांची सृजन ऊर्जा उत्तरोत्तर वृद्धिंगत होवो.

आपला देश एका दुविधेत सापडला आहे. आपण कुठला मार्ग निवडावा – स्वातंत्र्याकडे की स्वातंत्र्यापासून दूर – ही गोष्ट इतर अनेक गोष्टींबरोबरच आपण काय लिहितो यावर आणि आपल्याला गप्प राहण्यास भाग पाडणाऱ्यांपुढे मान तुकवण्याचे नाकारण्यावर अवलंबून असेल. ज्यांच्या हत्या झाल्या आहेत त्यांचे स्मरण करून, वेगळे मत मांडण्याच्या हक्काकरता उभे राहणाऱ्यांना पाठिंबा देऊन आणि भय व अनिश्चिततेच्या छायेत जगणाऱ्या, पण तरीही आपले मत व्यक्त करणाऱ्या, विरोधी मत असलेल्या सर्वांकरता, आपण स्वातंत्र्याचा मार्ग निवडू या.

●●●

कविता

# सावित्रीमाई !

सावित्रीमाई,
तू लावलीस आग अविद्येच्या अनर्थाला आणि
प्रश्नांचं घनघोर आभाळ जळत गेलं
इथल्या शोषणाचं शास्त्र हळूहळू कळत गेलं

तू उपसत राहिलीस कसोशीन
यातनांचा सनातन गाळ
कोंडवाड्यांचे तोडून कडीकोंडे
तू दिलंस स्त्रीजातीला मुक्तीचं आभाळ

तुझ्यावर शेण-गोट्यांचा मारा करणाऱ्यांना
तू कधीच दिला नाहीस भाव
बुद्धीचं अपहरण करणाऱ्यांचे
तू उधळत गेलीस प्रत्येक डाव

ज्योतिबा होते सूर्य
तू नव्हतीस फक्त त्यांची सावली
तू एक स्वयंप्रकाशित तेजोगोल
तुझ्या काळजात होती
ममतेची अतोनात ओल

तू भुकेल्यांची ताई
निराश्रित विधवांची माई
प्लेगच्या रुग्णांची आई
थिजलेल्या ओठांवर तू फुलविलंस उबदार हास्य
हीच तुझी थोर कमाई

करुणेच्या धाग्याने
तू निरंतर विणत राहिलीस
मानवतेचं तलम वस्त्र
तुला कधीच पराभूत करू शकलं नाही
इथल्या क्रूर व्यवस्थेचं कोणतेच अस्त्र



पुरात वाहून टाकली तू संस्कृतीची जुनाट जळमटं
क्षितिजाच्या तप्त रेषेवर
तू ठेवलीस संघर्षाची बाराखडी आणि
उगवणारा प्रकाश खात्रीचा झाला

रस्ते असेही असतात जे कधीकधी मागे फिरतात
पण तू दिलीस दिशा अशी की
वाटाच पुढं पुढं धावत येतात

सावित्रीमाई, तुझं पूर्णविराम नसलेलं जगणं
वर्तमानातही आहेच आहे
आसमंत आताही जरासा काळवंडून आहेच आहे
म्हणून मी नोंदवून ठेवला आहे तुझा पत्ता माझ्या
मुलींच्या मेंदूवर
त्यांच्या भविष्याबाबत निर्धास्त राहायला आता
मला काय हरकत आहे?

– प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर, नांदेड.



# प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या नयनतारा सहगल

## लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी कार्यरत

यवतमाळ येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्याच्या प्रश्नावर उधाणलेल्या वादळासंदर्भात एक महत्वाची बाब म्हणजे नयनतारा सहगल या तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांची सुकन्या. विजयालक्ष्मी पंडित यांना पंडित नेहरु यांनी तत्कालिन संविधानतज्ज्ञ सर आयव्हर जेनिंग यांची भेट घ्यायला लावली आणि त्यांना भारतीय संविधान लिहिण्याची विनंती करायला सांगितली. सर आयव्हर जेनिंग यांनी मी भारताचे संविधान लिहिले असते, परंतु भारतीय संविधान लिहिण्यास बॅ. तेजबहादूर सप्रू, बॅ. एम.आर. जयकर व बॅ. बी.आर. आंबेडकर हे सक्षम असून त्या तिघांनीही नकार दिला तरच मी भारतीय संविधान लिहीन, असे स्पष्ट केले. त्यानंतर विजयालक्ष्मी पंडित भारतात आल्यावर नेहरुंना सर जेनिंग यांचे म्हणणे सांगितले. नंतर नेहरु यांनी बॅ. सप्रू आणि बॅ. जयकर यांना संविधान लिहिण्याबद्दल विचारणा केली. त्यांनी नकार दिल्यावर नेहरुंनी बॅ.आंबेडकर यांची भेट घेतली. बाबासाहेब तर एकाच पायावर तयार होते. त्यांच्या होकारानंतर बॅ. बाबासाहेब आंबेडकर यांचा घटना समितीत प्रवेश झाला. नयनतारा यांची परंपरा अशी असल्यामुळे लोकशाहीला बळकटी आणण्यासाठी त्या कार्यरत आहेत.

ज.वि. पवार

नयनतारा सहगल या इंग्रजी भाषेतील प्रतिभासंपन्न लेखिका. यवतमाळ येथे मागील महिन्यात पार पडलेल्या ९२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने त्या प्रकाशझोतात आल्या होत्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपीविरूद्ध ठोस भूमिका घेणाऱ्या या लेखिकेला या संमेलनाच्या उद्घाटक म्हणून दिलेले निमंत्रण मागे घेतल्याच्या प्रकरणानं साहित्यिक क्षेत्रात तीव्र संताप व्यक्त झाला. सरकारच्या हस्तक्षेपामुळे अ.भा.मराठी साहित्य महामंडळाने एका प्रतिथयश लेखिकेचा अवमान केल्याची भावना सर्व स्तरावर व्यक्त झाली. नयनतारा सहगल यांना साहित्य संमेलनाला बोलावून पुन्हा निमंत्रण मागे घेणे हा केवळ त्यांचाच अपमान नव्हता तर त्यांच्या साहित्यावर प्रेम करणाऱ्या साहित्यरसिकांचा आणि त्यांच्या साहित्यकृतीचाही अवमानच होता.

यापूर्वी पंजाबी कवी सुरजित पातर, गुजराथी कवी सुरेश दलाल, हिंदी साहित्यिक इंदिरा गोस्वामी, हिंदी व इंग्रजी भाषेतील लेखक विष्णु खरे यांच्यासह इतर भाषांमधील अनेक अभ्यासक अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटक होते. विशेष म्हणजे २०१० मध्ये द.भि. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात

भरलेल्या ८३ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन अभिनेता अमिताभ बच्चन यांनी केले होते.

देशातील वेगवेगळ्या भाषांमधील लेखक, कवी आणि कलावंतांनी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन केलेले असताना इंग्रजी भाषेच्या व्यासंगी साहित्यिक नयनतारा सहगल यांना दिलेले निमंत्रण मागे घेणे नि:संशयपणे वैचारिक दिवाळखोरीच आहे. सहगल यांनी झुंडशाहीविरुद्ध उघडलेली आघाडी आणि त्यांचे नेहरू-गांधी घराण्यांशी संबंधित असणे, यावरून साहित्य संमेलनाचे विचारपीठ त्यांना का नाकारण्यात आले, हे स्पष्ट होते.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांच्या नयनतारा सहगल या कन्या आहेत. गांधी नेहरू घराण्याचा वारसा लाभलेला असतानाही सहगल यांनी त्याचे कधीही भांडवल केलेले नाही. उलट त्या घराण्यांवर त्या सातत्याने टीकाच करीत राहिल्या. त्यांचे १९७८ मध्ये प्रकाशित झालेले 'इंदिरा गांधीज् इमरर्जन्स ॲण्ड स्टाईल' आणि १९८२ मध्ये प्रकाशित झालेले 'इंदिरा गांधी : हर रोड टू पॉवर' या दोन पुस्तकांमधून सहगल यांनी इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीच्या कारभाराला जोरदार विरोध केला होता. विशेष म्हणजे, इंदिरा गांधींनी देशावर लादलेल्या आणीबाणीविरोधात नयनतारा सहगल यांनी जोरदार भूमिका घेतली होती. त्यामुळे इंदिरा गांधी यांनी नयनतारा यांच्याकडे आपल्या विरोधक म्हणूनच पाहिले. यावरून नयनतारा सहगल यांचा जीवनाकडे पाहण्याचा वास्तववादी दृष्टिकोन दिसून येतो. दोन डझनभर कादंबऱ्या एवढं विपुल साहित्य नावावर असलेल्या नयनतारा सहगल या इंग्रजीतील प्रख्यात लेखिका आणि विचारवंत म्हणून जगविख्यात आहेत. त्यांच्या 'रिच लाईक अस' या ऐतिहासिक आणि राजकीय कल्पित कादंबरीला १९८५ साली साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. परंतु त्यानंतर ३० वर्षांनी म्हणजे २०१५ मध्ये लिंचिंगवरून त्यांनी हा पुरस्कार परत केला. उत्तरप्रदेशातील दादरी गावी २८ सप्टेंबर २०१५ रोजी गोमांस बाळगल्याच्या आरोपावरून मोहम्मद अखलाक याला जमावाने घरात घुसून ठार मारले होते. या घटनेने उद्विग्न होऊन नयनतारा सहगल यांनी साहित्य अकादमी पुरस्कार परत केला. देशात पुरस्कार नाकारण्याच्या आणि परत करण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या; परंतु मानवी स्वातंत्र्याच्या गळचेपीचा निषेध म्हणून सहगल यांनी पुरस्कार परत करणे ही दुर्मिळ गोष्ट मानली पाहिजे.

भारतीय राज्यघटनेने येथील नागरिकाला दिलेल्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे षड्यंत्र लोकशाहीला मारक असल्याची भूमिका नयनतारा सहगल यांनी वेळोवेळी व्यक्त केलेली आहे. २०१५ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार परत करण्याचा निर्णय एका वृत्तवाहिनीवर जाहीर करताना सहगल यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हिटलरशहा अशा शब्दात टीकास्त्र सोडले होते. ''देशात निरपराधांचे मुडदे पाडले जात असताना मोदी गप्प आहेत. ते विदेशात दौरे करीत असून मोठमोठी भाषणे देत आहेत. देशातील परिस्थिती यापुढेही अशीच राहिली तर मोदींचेही तेच होईल, जे आणीबाणीनंतर इंदिरा गांधींचे झाले.'' अशा शब्दात नयनतारा सहगल यांनी आपला संताप व्यक्त केला होता.

सहगल यांची ही भूमिका सरकारविरुद्ध नाही तर 'हम करे सो कायदा' या प्रवृत्तीविरुद्ध असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांनी नात्याने मामेबहीण असलेल्या इंदिरा गांधींनाही सोडले नाही. स्वातंत्र्यानंतरची ४० हून अधिक वर्षे घरातच सत्ता असूनही प्रत्यक्षात सत्तासहभागाची लालसा त्यांच्या मनाला कधी शिवली नाही. वाढत्या असहिष्णुतेतून झालेल्या दाभोलकर, कलबुर्गी, पानसरे आणि गौरी लंकेश यांच्या हत्यांमुळे व्यथित झालेल्या नयनतारा सहगल यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याची नेहमीच पाठराखण केली. याबाबतीत सरकारी यंत्रणेवरही त्या तुटून पडल्या. १४ ऑगस्ट २०१७ रोजी 'द हिंदू' या दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी देशातील सद्यस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली होती. ''देशात जे काही आहे, ते नष्ट केलं जात आहे. नेहरू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मजबूत पायावर देशाची उभारणी केली. परंतु आता सरकार चालवित असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुन्हा एकदा हिंदू आणि इतर अशी देशाची विभागणी करीत आहे. अगोदरच आम्ही भयानक अशी फाळणी पाहिलेली आहे. आज घडणाऱ्या खुनाच्या घटनांनी मी स्तब्ध आहे. संघ देशाला हिंदू राष्ट्र बनवू इच्छित आहे. ते इतिहासाला खोटं ठरवत आहेत. ते रस्त्यांची, संस्थांची नावे बदलत आहेत. आमची झपाट्याने अधोगतीकडे वाटचाल सुरू आहे. विज्ञानाची जागा आता पुराण घेत आहे. देशाची ही भेसूर भविष्याकडे वाटचाल आहे. त्यामुळे मी यंदा स्वातंत्र्यदिन साजरा करणार नाही.'' अशा शब्दात सहगल यांनी आपली नाराजी व्यक्त केली होती.

नयनतारा सहगल यांच्या आई विजयालक्ष्मी पंडित आणि संस्कृतचे विद्वान असलेले त्यांचे वडील रणजित सीताराम पंडित यांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. त्याबद्दल त्यांना अनेकदा तुरूंगवासही भोगावा लागला होता. देशभक्तीचा असा वारसा लाभलेल्या डाव्या विचारसरणीच्या ९१ वर्षीय नयनतारा सहगल यांची कारकीर्द पारदर्शक आणि म्हणून समाजाला सकारात्मक जगण्याची दिशा देणारी आहे.

●●●



# काँग्रेसला
# घराण्या

➲ प्रकाश एस. तळेगावकर

काँग्रेसच्या दुसऱ्या इंदिरा गांधी अशी प्रतिमा असलेल्या प्रियंका गांधी अखेर सक्रीय राजकारणात उतरल्या. मागील १०० वर्षात नेहरू-गांधी कुटुंबातून राजकारणात येणाऱ्या त्या अकराव्या सदस्य ठरल्या आहेत.

नरेंद्र मोदी सरकार केंद्रात सत्तेत आल्यापासून काँग्रेसची जेंव्हा जेंव्हा निवडणुकीत पीछेहाट झाली, तेंव्हा तेंव्हा 'प्रियंका लाओ, देश बचाओ', असा नारा काँग्रेस कार्यकर्त्यांनी दिलेला आहे. मात्र काँग्रेसने त्याकडे दुर्लक्षच केले. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मणिपूर या पाच राज्यांच्या निवडणुकाही काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्याच नेतृत्वाखाली लढल्या गेल्या. विशेष म्हणजे, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये गेली १५ वर्षे सत्तेत असलेल्या भाजप सरकारला शह देण्यासाठीही प्रियंका गांधींचा सक्रीय राजकारण प्रवेश पक्षाला गरजेचा वाटला नव्हता. २०१९ चे लोकसभेचे मैदान मारण्यासाठी मात्र काँग्रेसने प्रियंकारूपी ब्रम्हास्त्र बाहेर काढले आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपशी मोठ्या ताकदीने लढता यावे, यासाठी प्रियंका गांधी यांना राजकारणात आणण्यात आले आहे.

१३३ वर्षे जुन्या काँग्रेस पक्षाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत गांधी-नेहरू घराण्याचेच लक्षणीय योगदान राहिलेले आहे. स्वातंत्र्योत्तर राजकारणात पक्षाची गांधी घराण्याच्या करिष्म्यावर जास्त भिस्त होती. आजही या घराण्याच्याच नेतृत्त्वाने पक्ष वाटचाल करताना दिसतो आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यापासून वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये झालेल्या पराभवामुळे काही काळ पक्ष बॅकफुटवर राहिला. परंतु भाजपशासित तीन राज्यांमध्ये राहुल गांधींच्या नेतृत्त्वाखाली सत्ता मिळवल्यानंतर पक्षाला लोकसभेच्या 'रणसंग्रामा'त यशाचा किरण दिसू लागला आहे.

देशातील सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तरप्रदेशच्या पूर्व भागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. सक्रीय राजकारणात आलेल्या नेहरु-गांधी कुटुंबातल्या त्या ११ व्या सदस्य आहेत.

वकिली व्यवसायात असलेले भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतील अग्रणी नेते मोतीलाल नेहरु वयाच्या ५८ व्या वर्षी १९१९ मध्ये अमृतसर येथील अधिवेशनात काँग्रेसचे अध्यक्ष बनले. १९२८ मध्ये कलकता अधिवेशनात त्यांची पुन्हा अध्यक्षपदी निवड झाली. ते गांधी-नेहरू घराण्याचे संस्थापक होते. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी १९२० च्या सुमारास राजकारणात प्रवेश केला. स्वातंत्र्य सैनिक आणि देशाच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणातील ते एक प्रमुख व्यक्तिमत्व होते. वयाच्या ४७ व्या वर्षी १९३६ मध्ये ते पक्षाध्यक्ष बनले. ते एकूण पाचवेळा काँग्रेस अध्यक्ष आणि जवळपास १७ वर्षे देशाचे पंतप्रधान होते. इंदिरा गांधी ४२ वर्षांच्या असताना १९५९ मध्ये दिल्लीतील अधिवेशनात पक्षाध्यक्ष बनल्या. त्यांनी तीन वेळा पक्षाचे अध्यक्षपद सांभाळले. त्यांचे पिता पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असतानाच्या काळात म्हणजे १९४७ ते १९६४ दरम्यान त्यांच्या त्या स्वीय सहायक होत्या. पित्याच्या



**१३३ वर्षे जुन्या काँग्रेस पक्षाच्या आजपर्यंतच्या वाट राहिलेले आहे. स्वातंत्र्योत्तर राजकारणात पक्षाची आजही या घराण्याच्याच नेतृत्त्वाने पक्ष वाटचाल कर वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये झालेल्या पराभ भाजपशासित तीन राज्यांमध्ये राहुल गांधींच्या नेतृ 'रणसंग्रामा'त यशाचा किरण दिसू लागला आहे. लो मोठे राज्य असलेल्या उत्तरप्रदेशच्या पूर्व भागाची ज आलेली आहे. सक्रीय राजकारणात आलेल्या नेह**

मृत्यूनंतर १९६४ मध्ये त्या राज्यसभा सदस्य बनल्या. त्यानंतर लाल बहादूर शास्त्री मंत्रिमंडळात माहिती आणि प्रसारण मंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला.

१९६६ ते १९७७ आणि १९८० ते १९८४ अशी १५ वर्षे त्या पंतप्रधानपदी होत्या. फिरोज गांधी यांनी १९४२ मध्ये इंदिराजींशी लग्न केले. त्यानंतर दहा वर्षांनी १९५२ मध्ये उत्तर प्रदेशातील प्रतापगड आणि १९५७ मध्ये रायबरेली येथून लोकसभेवर निवडून गेले. एअर इंडियामधून आपली कारकीर्द सुरू केलेले राजीव गांधी नेहरु-गांधी कुटुंबाचे सर्वात तरूण काँग्रेस अध्यक्ष होते. २३ जून १९८० रोजी संजय गांधी यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर राजीव गांधी राजकारणात आले. आपल्या लहान भावाच्या निधनानंतर राजीव गांधी यांनी देशाच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित करावे, अशी सूचना शंकराचार्य स्वामी श्री स्वरुपानंद यांनी केली होती. त्यावर आईला (इंदिरा गांधी) माझी मदत होणार असेल तर

# गांधी-नेहरू
# चेच बळ!



**चालीत गांधी-नेहरू घराण्याचेच लक्षणीय योगदान गांधी घराण्याच्या करिष्म्यावर जास्त भिस्त होती. ताना दिसतो आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यापासून मुळे काही काळ पक्ष बॅकफुटवर राहिला. परंतु त्वाखाली सत्ता मिळवल्यानंतर पक्षाला लोकसभेच्या कसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वात बाबदारी प्रियंका गांधी-वड्रा यांच्यावर सोपवण्यात रू-गांधी कुटुंबातल्या त्या ११ व्या सदस्य आहेत.**


मी राजकारणात प्रवेश करीन, असे राजीव गांधी यांनी सांगितले होते. १६ फेब्रुवारी १९८१ रोजी राष्ट्रीय राजधानीत शेतकऱ्यांच्या रॅलीला संबोधित करून त्यांची राजकारणात एन्ट्री झाली. १९८५ मध्ये मुंबई अधिवेशनात त्यांची पक्षाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये ते देशाचे ६ वे पंतप्रधान झाले. १९९१ पर्यंत म्हणजे हत्येपर्यंत ते या पदावर होते. १९८० मध्ये अमेठीतून निवडून गेलेले संजय गांधी केवळ ५ महिने खासदार होते. मात्र ५ महिन्यांनी विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. १९७५ च्या आणीबाणीत त्यांनी मोठी भूमिका बजावली होती. मोदी सरकारमध्ये महिला आणि बालविकास मंत्री असलेल्या मनेका गांधी या दिवंगत नेते संजय गांधी यांच्या पत्नी आहेत. पशूहक्क कार्यकर्ती आणि पर्यावरणवादी अशी त्यांची ओळख आहे. यापूर्वी त्यांनी केंद्रात चार सरकारांमध्ये महत्त्वाच्या खात्यांचे मंत्रिपद सांभाळलेले आहे. मनेका गांधी वयाच्या ३३ व्या वर्षी १९८८ मध्ये जनता दलच्या महासचिव झाल्या. त्या १९८९ मध्ये प्रथमच पिलीभीतमधून खासदार बनल्या. दोन वेळा जनता दलाच्या तिकिटावर त्या खासदार बनल्या. दोन वेळा अपक्ष खासदार होत्या. २००४ पासून आजतागायत त्या भाजपकडून पिलीभीत लोकसभा मतदारसंघाचं नेतृत्त्व करीत आहेत. पशू रक्षण आणि पर्यावरण जतनाच्या कार्याबद्दल त्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील १४ पारितोषिके मिळालेली आहेत.

पती राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनिया गांधी यांनी पक्षाचं नेतृत्व करावं, अशी गळ पक्षनेत्याने घातली. मात्र त्यांनी त्यास नकार दिला. शेवटी पक्षनेत्यांच्या आग्रहास्तव परिस्थितीची गरज म्हणून सोनिया गांधी राजकारणात आल्या. त्यानंतर सात वर्षांनी म्हणजे १९९८ मध्ये वयाच्या ५२ व्या वर्षी कलकता अधिवेशनात त्यांची पक्षाध्यक्षपदी निवड झाली. सर्वात जास्त काळ म्हणजे १९ वर्षे त्यांनी काँग्रेस अध्यक्षपद भुषविले. २००४ मध्ये डावे आणि अन्य पक्षांच्या मदतीने संयुक्त पुरोगामी आघाडीचे (यूपीए) सरकार स्थापन करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. विदेशी असल्याच्या कारणावरून त्यांना पंतप्रधानपदी बसण्यास विरोधकांचा विरोध झाला. यूपीएच्या दुसऱ्या टर्मच्या मध्यपासून त्यांनी सक्रिय राजकारणातील सहभाग आरोग्याच्या कारणावरून कमी केला. राहुल गांधी २००४ मध्ये राजकारणात आले. यापूर्वी त्यांचे वडील जेथून निवडून आले त्या अमेठी मतदारसंघातून ते लोकसभेत निवडून गेले. सलग तिसऱ्या टर्मसाठी ते याच मतदारसंघाचे नेतृत्व करीत आहेत. वयाच्या ३७ व्या वर्षी २००७ मध्ये ते काँग्रेसचे महासचिव बनले. २०१७ मध्ये पक्षाच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. २०१८ मध्ये त्यांच्याच नेतृत्त्वाखाली झालेल्या मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड विधानसभा निवडणुकीत पक्षाने तीनही राज्यांत सत्ता मिळवली.

संजय गांधी व मनेका गांधी यांचे पुत्र वरुण हे २००४ मध्ये भाजपमध्ये गेले. २००९ मध्ये या पक्षाच्या तिकिटावर पिलीभीत मतदारसंघातून निवडून गेले. २०१३ मध्ये वयाच्या ३३ व्या वर्षी ते भाजपचे महासचिव बनले. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते सुलतानपूरचे खासदार बनले. काँग्रेसची दुसरी इंदिरा अशी ओळख असलेल्या प्रियंका गांधी-वड्रा यांचा २०१९ च्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सक्रीय राजकारणात नुकताच प्रवेश झाला आहे. वयाच्या २६ व्या वर्षी १९९९ मध्ये त्या आई सोनियांसमवेत प्रथमच जनतेसमोर आल्या.

वीस वर्षांपासून आईच्या आणि २००४ पासून भाऊ राहुल गांधी यांच्याही प्रचाराची धुरा त्या सांभाळत आहेत. उच्चविद्याविभूषित असलेल्या प्रियंका गांधी यांना भाऊ राहुल गांधी यांच्या मदतीने बिकट स्थितीत असलेल्या पक्षाला मजबूत जनाधार मिळवून देण्यासाठी मोठे काम करावे लागणार आहे.

लोकांशी संवाद साधण्याची हातोटी, अपील करणारी प्रतिमा, लोकांना आपलसं करणारी ओघवती भाषणशैली, छाप पाडणारी इंदिरा गांधींसारखी प्रतिमा आणि प्रचार मोहिमा हाताळण्याचा दांडगा अनुभव ही प्रियंका गांधी यांची वैशिष्ट्ये काँग्रेसला २०१९ चा रणसंग्राम जिंकून देऊ शकतील का, याचे उत्तर येणारा काळच देईल. ●●●




# मेहतर समाजाच्या समस्यांचं चित्रण करणारी कादंबरी

**पद्मभूषण अमृतलाल नागर हे हिंदी साहित्यातील अग्रगण्य असं नाव आहे. साहित्य अकादमी पुरस्कारासह जवळपास १७ प्रतिष्ठित पुरस्कार मिळवणाऱ्या नागर यांनी चित्रपट संवादलेखन, बाल साहित्य, नाटके, कथा, कादंबऱ्यासह विविध साहित्यप्रकार कुशलतेने हाताळले. त्यांच्या १४ कादंबऱ्यांपैकी 'नाच्यो बहुत गोपाल' ही कादंबरी अन्य कादंबऱ्यांपेक्षा वेगळ्या धाटणीची मौलिक कादंबरी आहे. मेहतर या दलित समाजाच्या प्रश्नांवर यामध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे.**

**➲ डॉ. सूर्यनारायण रणसुभे**

जन्माने दलित असलेले ज्या व्यथा-वेदनांना सामोरे जातात, त्या व्यथा-वेदनांना सवर्ण सामोरे जरी जात नसले, तरी त्यातील प्रतिभासंपन्न लेखक हे त्या व्यथा-वेदनांना खोलवर जाऊन लिहू शकतात, भिडतात आणि त्यांचे अस्वस्थ करणारे चित्रण सादर करतात. अशांचे साहित्य दलित जाणिवांचे साहित्य म्हणून स्वीकारण्यात काय अडचण आहे, असा मा यासारख्या अनेकांचा प्रश्न आहे. त्यांच्या मर्यादा जाणून घेऊन त्यांना आपण स्वीकारणार आहोत की, ते जन्मतः दलित नाहीत म्हणून त्यांच्या साहित्यास नाकारणार आहोत.

दलित जाणिवांची प्रखर अभिव्यक्ती करणारे अदलित लेखक हिंदीत अर्ध्या डझनापेक्षा अधिक आहेत. यामध्ये प्रेमचंद, नागार्जुन, जगदीशचंद्र, यशपाल, सूर्यकांत त्रिपाठी 'निराला', मन्नू भंडारी, कमलेश्वर, अमृतलाल नागर हे प्रमुख आहेत.

अमृतलाल नागर यांची 'नाच्यो बहुत गोपाल' ही कादंबरी २०१५ मध्ये प्रकाशित झालेली आहे. नागर यांचे एक वैशिष्ट्य असे की, ते कोणतीही कादंबरी लिहिताना भरपूर गृहपाठ करतात. कल्पनेचा वापर जरी ते करीत असले, तरी वास्तवाच्या पायावरच त्यांच्या कल्पना उभ्या असतात. एक लेखक म्हणून आपल्या अवतीभोवती जगणाऱ्या माणसांच्याबद्दल त्यांच्या मनात विलक्षण जिज्ञासा असते. या जिज्ञासेपोटी ते त्या व्यक्तीच्या जगण्याचा शोध घेतात व त्यातून त्यांची कादंबरी साकारते. प्रस्तुत कादंबरीची मूळ कथादेखील अशीच आहे. लेखकाच्या घरामागे भंगी समाजाची वस्ती आहे. या वस्तीतील एक स्त्री ही भंगी समाजातल्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करीत आहे, असे त्यांनी ऐकलेले आहे. या कादंबरीतील काळ ब्रिटिशांच्या सत्तेचा म्हणजे १९२०-२५ असा आहे. या काळात डॉ. आंबेडकर हे परदेशात शिक्षण घेत होते, तर गांधी नुकतेच दक्षिण आफ्रिकेतून परतले होते. दलितांचा प्रश्न हा या वेळेपर्यंत सार्वजनिक चर्चेचा विषय झालेला नव्हता. लेखकाच्या घरामागील ही वस्ती 'द' अक्षराने ओळखली जात. 'द' म्हणजे ज्यांचे दमन होत आहे, त्यांची वस्ती. या वस्तीतील उपरोक्त स्त्री एकदा लेखकांच्या घरी येते. लेखक जात-पात-धर्म याच्या पलीकडे जाऊन जगत असतो. ती स्त्री लेखकाच्या घरी येते, त्यावेळी लेखकाच्या घरी पूजाअर्चा चाललेली असते. लेखक त्या स्त्रीस जाणीवपूर्वक पूजागृहात घेऊन जातो आणि तेथे गेल्यावर ती स्त्री शुद्ध संस्कृत उच्चारणात श्लोक म्हणू लागते. लेखक चपापतो. ही तर भंगी समाजाची. इतके स्पष्ट उच्चारण आणि तेही संस्कृतमधून! त्यांच्यातला लेखक या स्त्रीस जाणून घेण्याचा प्रयत्न करू लागतो आणि येथून ही कादंबरी सुरू होते. यासाठी लेखक भारतीय जातिव्यवस्थेबद्दलच्या ग्रंथांचे पारायण सुरू करतो. त्यातही मेहतर समाजाचा इतिहास जाणून घेण्याची त्याची इच्छा असते. एका पातळीवर हे वाचन सुरू असते, तर दुसऱ्या पातळीवर तो मेहतर वस्तीत रोज जाऊ लागतो. ही स्त्री निरगुनिया नावाने आपली ओळख देते. लेखक तिचा भूतकाळ

जाणून घेण्याचा प्रयत्न करू लागतो. तेथून एकेक गोष्ट उलगडत जाते. निरगुनिया आपली जीवनकथा सांगू लागते. अधे-मधे लेखक डोकावत असतो. निरगुनियाचा जन्म १९०५ मध्ये ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील मोठे पंडित, त्यांची ही एकुलती एक लेक. वडील एका जमीनदाराकडे गुमास्ता. निरगुनियावर संस्कार झाले ते आईचे आणि आईच्या वडिलांचे. घरी सोवळे-ओवळे. लहानपणापासूनच वर्णव्यवस्थेचे दृढ संस्कार. घरचे वातावरण अत्यंत पवित्र असे; पण वडील मात्र या सर्व संस्कारांच्या विरोधात जगत असतात. भ्रष्ट, विलासी, शृंगारी, उच्छृंखल. वडिलांच्या या अशा जगण्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संस्कार तिच्यावरही होऊ लागतात. त्यामुळे वयाच्या १६-१७ व्या वर्षातच तिला यौनसंबंधाबद्दलची केवळ विकृत माहितीच मिळत नाही, तर तिचे शारीरिक संबंधदेखील या वयातच तिघांशी येतात. या अशा संबंधांमुळे (सन १९२१-२२) ती गर्भवती होते. वडील तिचे लग्न घाईघाईने तिच्यापेक्षा वयाने खूप मोठ्या अशा एका धनाढ्य व्यापाऱ्याशी लावून देतात. त्या प्रचंड मोठ्या घरात ती आणि तिचा तो प्रौढ नवरा दोघेच! सर्व भौतिक सुख असूनदेखील ती शारीरिकदृष्ट्या अतृप्त आहे. शरीरसुख तर तिने आधी घेतलेलेच असते. आता ते न मिळाल्यामुळे ती तडफडू लागते. घरात ती जवळपास बंदिस्त आहे. भंगीशिवाय घरात इतर कोणाही पुरुषाला प्रवेश नाही. शारीरिक अतृप्ती घेऊन ती कसेबसे एक वर्ष आठ महिने काढते. ज्यावेळी तिला हे सर्व असह्य होते, त्यावेळी भंगी म्हणून येणाऱ्या मोहना या तरुणास ती पटवते आणि एक दिवस भरपूर दागदागिने, रोकड घेऊन तेथून पळ काढते. मोहनावर ती एका अर्थाने जबरदस्तीच करते की, तू मला पळवून ने.

मोहना तिला आपल्या मामा-मामीच्या घरी घेऊन येतो. या मोहनाच्या मनात सवर्णाविषयी विलक्षण राग आहे. हा सर्व राग तो निरगुनियावर काढत जातो. एवढेच नव्हे, तर तिला मेहतरानी करण्याचा तो चंगच बांधतो. मैला काढण्यासाठी जबरदस्ती करू लागतो. निरगुनिया मोहनास स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करते, तर मोहना तिला मेहतरानी करण्याचा. स्वतःजवळचे दागिने विकून ती त्याला बँड वाजवण्याचा समूह उभा करण्यासाठी प्रयत्न करते. यात यश मिळत नाही. येथून कादंबरी वेगवेगळ्या वळणांवरून जाते. वेगवेगळ्या प्रकारच्या घटना घडतात. या निमित्ताने अमृतलाल नागर मेहतर समाज, त्यांच्या चालीरीती, कर्मकांड, त्यांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा हे सर्व ताकदीने उभे करतात. एका अर्थाने उत्तर भारतातील भंगी समाजाचे हे एक महत्त्वाचे दस्तावेजच होऊन जाते. मोहना निरगुनियाला अनेक प्रकारे छळतो. तिच्या शरीराचा यथेच्छ उपभोग घेतो. विकृत प्रकार करतो. तो निरगुनियाकडून सतीत्वाची, पवित्रतेची अपेक्षा करीत असतो. त्यामुळे तिच्यावर कठोर नियंत्रण ठेवतो. नंतर हा मोहना डाकू होतो. निरगुनिया अनेक दिव्यांतून जाते. तरुणपणी ज्या तिघांनी तिला भोगलेले असते, त्यापैकी दोघे प्रकटतात आणि तिला त्रास देऊ लागतात. सवर्ण तिला भोगण्याचा प्रयत्न करतात. बहुतेकांना वाटते, ही भंगीण आहे. त्यामुळे तिला भोगणे शक्य आहे. इतकी वर्षे मेहतर समाजात राहून तीही मेहतर भंगी झालेली आहे. आता ती मैला उचलण्याचे काम करीत नाही; पण तिच्याच शब्दांत-मन से तो भंगी बन ही गई हूँ।

या कादंबरीच्या केंद्रस्थानी ही निरगुनियाच आहे. तरुणपणापासून ते आजपर्यंत (म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षात) ती सतत स्वातंत्र्य, स्वावलंबन व अस्मितेसाठी संघर्ष करीत असते. मेहतर समाजातील मुला-मुलींना शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी करणे, त्यांना त्यांच्या अस्मितेची जाणीव करून देणे यासाठी ती सुरुवातीपासून धडपडत असते. सुरुवातीचे तिचे चरित्र हे उच्छृंखलतेकडे झुकणारे असते; पण मोहनासोबत पळून आल्यानंतर मात्र ती हळूहळू स्वतःत बदल घडवून आणते. तिच्या जन्माचे व कर्माचे संस्कार वेगवेगळे आहेत. यात सुरुवातीला द्वंद्व असते. नंतर हे द्वंद्व संपते व ती पूर्णपणे मेहतरीण भंगीण होते. सवर्णांबद्दल तिच्या मनात चीड आहे, तिरस्कार आहे. कारण ही तथाकथित सुसंस्कृत, श्रेष्ठ वर्णाचे किती ढोंगी, किती उच्छृंखल, किती बदमाश व इतरांचे कसे शोषण करतात हे तिने जवळून केवळ पाहिलेच नव्हते, तर हे सर्व भोगलेलेही असते.

आपल्या आजपर्यंतच्या जगण्याबद्दल तिला कसलाही पश्चाताप नाही. जे जगले, ते पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे हे ती अभिमानाने सांगते. स्वतःच्या स्थितीची तुलना ती अशा व्यक्तीशी करते, ज्याला परिस्थितीने खूप नागवले आहे. 'नाच्यो बहुत गोपाल' नागर कादंबरीत या स्त्रीबद्दल लिहितात, ''इस चरित्रहीना नारी के जीवन की चरित्रनिष्ठा देखकर मेरे मन में समुद्र की लहारों की तरह अनगिनत वैचारिक तरंगे उठ जाती हैं।'' एके ठिकाणी ती म्हणते- ''मैंने ब्राह्मण भी देखा, मेहतर भी देखा। मरद सब जगह एक हैं। सब जगह औरत की एक जैसी मिट्टी पलीत होती है। मैंने दलितों की समस्या को दोहरे ढंग से भोगा है। औरत से बढ़कर और कोई ज्यादा गुलाम नहीं है।''

मध्यकाळात युद्धात पराभूत झालेल्या राजपुतांवर विजेत्या राजाने अनन्वित अत्याचार केले व त्यांना मानवी विष्ठा उचलण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली. याचा पुरावा म्हणून मेहतर जातीतील उपजातींत आणि राजपूतांतील उपजातींत विलक्षण साम्य आढळते. या दोघांतील कर्मकांडात साम्य आहे. यापैकी अनेकजण इस्लाम झाले किंवा त्यांना करण्यात आले. त्यामुळे यांच्यात हिंदू-मुस्लिम संस्कृतीचे विलक्षण असे समन्वय झालेले आहे. बाहेर मुसलमानी चालचलन; पण घरात मात्र हिंदूंचे कर्मकांड. उच्चवर्णीय यांच्या स्त्रिया जबरदस्तीने भोगत. त्यातून अनेकांचा जन्म झाला. त्यामुळे त्या स्त्रिया व त्यांचे पुरुष उच्चवर्णियांचा तिरस्कार करत. हा तिरस्कार पिढ्यान्‌पिढ्या पुढे जात असतो. संपूर्ण कादंबरी ही वास्तवावर उभी आहे. यासाठी लेखकाने १९२०-२५ चा भारत, ब्रिटिशांचे जीवन, त्यांच्या घरी नोकर म्हणून काम करणाऱ्यांचे जीवन, त्या काळातील रूढी, परंपरा, कर्मकांड, ख्रिश्चन धर्म, त्या काळचे पादरी, धर्मोपदेशक, त्या काळचे मुस्लिम जीवन, डाकूंची संस्कृती, त्यांची जीवनशैली, त्या काळचे जमीनदार, सवर्ण ब्राह्मण, त्यांची जीवनशैली, मेहतर समाज, त्यांचा इतिहास या सर्वांचा खूप बारकाईने अभ्यास करून ही कादंबरी सिद्ध केलेली आहे. ●●●

# आजकालचे प्रश्न

पंक्चरवाला




# साहित्य संमेलनवाल्यांनी आखरीस घाण केलीच

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि तत्त्वहीन वाद यांचं एक अतूट नातं तयार झालं आहे. मराठी साहित्य महामंडळ आणि बाह्य राजकारणातून हे नाते जन्माला येत असते. वादातीत संमेलन दाखवा आणि संमेलनासाठीचे तीन-चार कोटी मिळवा असं म्हणण्याची वेळ आली आहे. यंदा त्याचा कळस झाला. लोकशाहीचा उदोउदो करणाऱ्या वाचक, साहित्यिक यांच्या महामंडळानं लोकशाहीचा गळा दाबून निवडणुकीऐवजी नेमणुकीनं अध्यक्ष निवडण्याची परंपरा यंदापासून सुरू केलीय. म्हणजे आता महामंडळाच्या कारभाऱ्यांनीच बनवलेली एक समिती आपल्याला हवा तसा अध्यक्ष निवडणार. या निवडीला कोणी आव्हान द्यायचं नाही किंवा सामान्य माणसांनी निवडणुकीत सहभाग घ्यायचा नाही. निवडणूक लढवण्यास इच्छुक नसलेल्या पण कर्तृत्वानं मोठ्या किंवा ज्येष्ठ असलेल्यांची नेमणूक सोपी व्हावी म्हणून हा फंडा सुरू करण्यात आला. यंदा त्याची रंगीत तालीम झाली. प्रक्रिया अस्तित्वात आली. मुळात ज्यांना लोकशाही प्रक्रियाच नको त्यांना अध्यक्षपद कशासाठी द्यायचं? ते कितीही मोठे असले तरी लोकशाहीपेक्षा तर मोठे नाहीत ना? ज्यांना लोकशाही नकोच त्यांनी खरं तर अध्यक्ष होताच कामा नये. भावनांच्या मोठेपणाचा दबाव आणून लोकशाहीची गळचेपी करू नये. समाजजीवनातल्या सर्वच क्षेत्रात त्यांना निवडणुका चालतात तर मग इथं का नको. हवं तर मतदानाची पद्धत बदलावी. मतदार वाढवावेत, पण नेमणुकीला विरोध करावा. शेवटी आठ-दहा जणांच्या टोळक्यानं केलेली निवड महत्त्वाची की शेकडो मतदारांनी केलेली निवड महत्त्वाची हेही कधी तरी ज्येष्ठांनी लक्षात घ्यायला हवं अन्यथा रोज उठून लिहून, बोलून समाजाला लोकशाही शिकवायची आणि स्वतः लोकशाहीच्या पेकाटात लाथ घालायची असं काही तरी घडलं.

यापूर्वीची संमेलनं अनेक कारणांवरून गाजली. निवडून आलेल्या अध्यक्षाला अध्यक्षपदावरच पोहोचता आलं नाही. कधी राजकारण्यांचा हस्तक्षेप, कधी प्रदेश, कधी उमेदवाराची जात तर कधी गांधींची हत्या करणारा गोडसे. अनेक कारणं होती. यंदा त्यावर कळस झाला. संमेलनाचे उद्घाटक म्हणून ज्यांना आदरानं निमंत्रण दिलं गेलं, उद्घाटकानं भाषण तयार केलं आणि संमेलन अगदी तोंडावर आल्यानंतर उद्घाटकाला संमेलनासाठी येऊ नका असं सांगण्यात आलं. अख्खी संमेलनाची नाचक्की झाली. असं का झालं तर नयनतारा यांचं भाषण परवडणारं नव्हतं. त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, मानवी मूल्यांवर बोलणार होत्या. उजव्या शक्तीविरुद्ध बोलणार होत्या. पण ते काहींना नको होतं. उद्घाटक बदला अथवा संमेलन रद्द करा, अशी धमकी उजव्यांनी मनसेच्या माध्यमातून दिली. आता नावाशिवाय त्याच्याकडे काहीच उरलेलं नाही तो मनसे. त्याचं आयोजकांनी ऐकलं किंवा शक्तीहिन मनसेच्या पायावर नाक घासलं. नयनतारा यांचं निमंत्रण अतिशय निर्लज्जपणे रद्द केलं, संमेलनाला येऊ नका असं सांगण्यात आलं. अनैतिकतेचा कळस झाला. यातून मार्ग काढत विरोधकांच्या नाकावर बुक्की मारण्याऐवजी एरव्ही स्वतःला बेडर समजणाऱ्या महामंडळाच्या अध्यक्षांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पलायनवादाचा आणि शरणवादाचा एक नवा मार्ग सांगितला. संमेलनाच्या समारोपातही याविषयी ठराव येणार नव्हता. बालवाडीतल्या पोरांना मूल्यशिक्षण द्यावं तसं संमेलनाच्या अध्यक्ष बोलल्या. शेवटी संमेलन ढासळत, ढासळत कुठंवर चाललय याचा एक लाईव शो झाला. आता प्रश्न असा आहे की, नेमलेला किंवा लादला जाणारा अध्यक्ष आणि वादाचे झेंडे घेऊन अशी संमेलनं चालूच ठेवायची का? संमेलनात वैचारिक, मौलिक वाद झडायलाच पाहिजेत, पण या अशा वादांना काय म्हणायचं?




# अपघाती पंतप्रधान आणि घाती डावपेच

**मा**जी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या राजकीय जीवनावर आलेला आणि लगेचच पडद्यामागं गेलेला **'द ॲक्सिडेन्टल प्राईम मिनिस्टर'** हा चित्रपट लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर प्रसिद्ध होणं हा काही योगायोग नव्हे. *जीएसटीमध्ये तीस–चाळीस कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप ज्यांच्यावर आहे आणि जे बेलवर सुटले त्या विजय रत्नाकर गुत्ते यांनी दिग्दर्शित केलेला हा पहिलाच चित्रपट आहे. जे नरेंद्र मोदी यांचे झिलकरी आहेत आणि ज्यांच्या पत्नी भाजपमध्ये बऱ्यापैकी सत्तास्थानी आहेत ते अनुपम खेर यांनी डॉ. मनमोहन सिंग यांची भूमिका केलीय.* सुनील बोहरा निर्माते आहेत तर सुझने बेरनेर्ट या परदेशी अभिनेत्रीला सोनिया गांधी यांच्या खास भूमिकेसाठी आणलंय. एकीकडे मोदी यांच्यावरील चित्रपटाची जुळवाजुळव आणि दुसरीकडे निवडणुकीच्या तोंडावर त्यांचा राजकीय शत्रू आणि गांधी घराण्याचा एक निष्ठावंत सिंग यांच्यावर चित्रपट हा योगायोग आहे, असे हिंदुत्ववाद्यांच्या पंचांगात कितीही सांगितलं तरी ते कोणी खरं मानणार नाहीय. राजकारण आणि तेही भाजपचे व्यक्तीद्वेषी कडू राजकारण कोणत्या पातळीवर जातं याचं हे एक उदाहरण. अर्थात नथुराम गोडसे यांना हुतात्मा जाहीर करून त्यांच्यावरील नाटकांचा विक्रम करणारे दुसरं काही करू शकणार नाहीत. व्यक्तिगत चारित्र्यहनन, व्यक्तिगत द्वेष आणि त्यासाठी पगारी ट्रोलरची फौज वापरणं हा तर भाजपचा, आर.एस.एस.चा हुकमी मार्ग आहे.

राजकारण बऱ्याच वेळेला अंदाज तुडवत जात असतं. त्याचं भाकित करता येणं कठीण असतं. देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल कधी पंतप्रधान होतील असं कुणाला वाटलं नव्हतं, पण ते झाले. अटलबिहारी वाजपेयी एका मतानं पराभूत होऊन खुर्ची सोडतील असंही कुणाला वाटलं नव्हतं. पण तसं घडलं. पंतप्रधानपदी पोहोचलेले चरणसिंग संसदेत पोहोचण्यापूर्वीच राजीनामा देतील, असंही कुणाला वाटलं नव्हतं. नितीन गडकरी यांच्यासारखा कर्तबगार नेता भाजपच्या अध्यक्षपदावरून दूर केला जाईल असंही कुणाला वाटलं नव्हतं. लालकृष्ण अडवाणींना पुन्हा पुन्हा भिजवून पुन्हा पुन्हा वाळवत घातलं जाईल, असंही कुणाला वाटलं नव्हतं. गोपीनाथ मुंडेंना दिल्लीत पाठवलं जाईल आणि एकनाथराव खडसे यांच्यासारख्या अनेक सरस नेत्यांना डावलून वक्तृत्व स्पर्धा जिंकणारे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, असंही कुणाला वाटलं नव्हतं. नारायण राणे भाजपमध्ये घुसतील असं कुणाला वाटलं नव्हतं. स्वतःला कट्टर आंबेडकरवादी समजणारे आणि  रोज उजव्या पक्षांविरुद्ध गरळ ओकणारे रामदास आठवलेच भाजप– शिवसेनेमध्ये जातील आणि मोदी कसे आंबेडकरवादी आहेत यावर भंपक चारोळी लिहितील हेही कुणाला वाटलं नव्हतं. स्वयंघोषित अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधवही सत्तेचा तुकडा शोधत भाजपमध्ये घुसतील किंवा मायावती आणि भाजप, मायावती आणि समाजवादी पक्ष अशी समीकरणं तयार होतील हे तर कुणाला ठाऊक होतं? पण घडलं तसं. मनमोहन सिंग यांनी पंतप्रधानपदावरून देशासाठी सारं काही नीट करून दाखवलं. नव्या अर्थव्यवस्थेचे ते शिल्पकार ठरले. हातात आलेले पंतप्रधानपद सोडण्यासाठी एक मोठी शक्ती लागते ती सोनिया गांधी यांनी कोठून मिळवली यावर कधी नागपूरमध्ये ट्यूशन घेणाऱ्यांनी चर्चा केली नाही. मनमोहन सिंग हे सोनिया गांधींचे ऐकतात हे खरं असंल तर भाजपचं अख्खं सरकार कुणाचं ऐकतं? मंत्रिपदावर असतानाही नागपूरमध्ये अर्ध्या चड्डीवर कोण कवायत करतं यावरही चित्रपट निघायला हवा. त्यात प्रमुख भूमिका अनुपम खेर या राजकीय चमचेगिरी करणाऱ्यालाच द्यावी. चित्रपटावर जास्त खर्च येईल म्हणून परदेशात पळून गेलेल्या मल्ल्या आणि मोदी (पंतप्रधान नव्हे) यांच्याकडून त्यासाठी निधी घ्यावा. फार तर अंबानीला असा चित्रपट काढायला सांगावा. पण याला खूप मोठी हिंमत लागते. राजकीय नैतिकता लागते. ती अजून तरी आधारकार्डावर मिळण्याची सोय नाही.

***(ता.क. सोनिया गांधींविरुद्ध बंड करणारे शरद पवार त्यांच्याच म्हणजे सोनियांच्या काँग्रेसशी मैत्री करतील असं कुणाला वाटलं होतं?)***






# शबरीमला, शबरीमला का नकोत तुला महिला?


केरळच्या शबरीमला मंदिरात म्हणजे अय्यप्पाच्या मंदिरात नव्या वर्षात दोन महिलांनी प्रवेश केला आणि एक इतिहास घडवला. बिंदू आणि कनकदुर्गा या दोन्हीही महिला चाळीशीतल्या आहेत. म्हणजे धार्मिक परंपरेनुसार त्या मंदिरात जाण्यास अपात्र आहेत. मासिक पाळीच्या प्रक्रियेत असणाऱ्या कुणाला तिथं जाता येत नाही. पण या दोघी गेल्या आणि सर्व हिंदुत्ववादी महिला – पुरुषांनी दर्शनासाठी जाणाऱ्या महिलांचे मार्ग रोखून धरले. जाळपोळ आणि हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. घडवल्या जात आहेत. ज्या समाजात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी झुंडशाही करू देत नसेल, राज्यघटनेने दिलेले हक्क– अधिकार वापरू देत नसेल तर तो समाज कोणत्या अवस्थेत पोहोचला असेल याची कल्पना केलेली बरी. देशाच्या पंतप्रधानांनी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या आरएसएसने या विषयावर मौन बाळगणं पसंत केलं आहे. विशेष म्हणजे, केरळमधील या घटनेत भाजप, काँग्रेस आदी सर्वच पक्ष महिलांच्या विरोधात आहेत. सत्ताधारी डावे मात्र महिलांच्या बाजूनं आहेत. कारण त्यांना न्यायालयानं दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी कायद्यानंच करावी लागणार आहे. डाव्यांवर राजकारण उलटावं यासाठी सर्व बिगरडावे महिलांच्या विरोधात आहेत. ज्यांच्याकडे महिला संरक्षण मंत्री आहे ते आणि ज्यांच्या पक्षाचे अध्यक्ष काल–परवापर्यंत महिलाच होती ते असे सगळे एकमतानं केरळमध्ये आहेत. या सर्वांना महिलांच्या स्वातंत्र्यापेक्षा आगामी निवडणुकीत मतं महत्त्वाची वाटतात. सर्व देवस्थानांत जाऊन मीही हिंदूच आहे असं सांगणाऱ्या राहुल गांधींना ही मतंच महत्त्वाची वाटतात. जेवढी मताची कमाई तेवढंच राजकारण अशी भारतातील रीत झाली आहे.

केंद्र सरकारने ट्रिपल तलाकला बंदी घालणारं विधेयक आणलं तेव्हा भाजपचे नेते, मंत्री आणि खुद्द पंतप्रधान, आर.एस.एस. किती पोटतिडकीने महिला मुक्तीविषयी बोलत होते! महिलांच्या पिळवणुकीला आव्हान देत होते. हे सारे मुस्लिम महिलांच्या बाजूनं उठणारे आवाज हिंदू महिलांच्या विरोधात का जात आहेत? इतरांच्या धर्मातील परंपरा तोडा पण आपल्या धर्मातील परंपरा कितीही स्त्रीविरोधी असल्या तरी सांभाळा असा हिशेब तर नाहीय? अन्यथा आम्ही कोर्टाला जुमानणार नाही, राम कुठं जन्माला आला हा श्रद्धांचा विषय आहे. कोर्टाचा नाही, अशी घटनाविरोधी, न्यायालयविरोधी भाषा आणि वर्तन का येत आहे? प्रश्न एका शबरीमलाचा नाही तर महिलामुक्तीचा आहे. ही मुक्ती रोखून धरण्यासाठी हिंदुत्ववाद्यांनी केरळात स्त्रीविरुद्ध स्त्रीचा वापर सुरू केला आहे. तसं नसतं तर मंदिरप्रवेशात यशस्वी झालेल्या महिलेला तिच्या सासूनं मारहाण केलीच नसती. हजारो स्त्रिया रस्त्यावर येऊन मंदिरात जाऊ पाहणाऱ्या स्त्रियांना अडवण्याचं काम करू शकल्या नसत्या. ज्यांच्यावर अन्याय होतो तो आणि जो अन्यायाविरुद्ध आवाज काढू पाहतो तो यांच्यातच लढाई लावण्यात मूलतत्ववादी यशस्वी होत आहे. या पाताळयंत्री नीतीली सर्वांनीच विरोध करायला हवा.



दोन गोष्टी अमर्याद असतात. एक म्हणजे विश्व आणि दुसरे मानवी मुर्खपणा. मला विश्वाबद्दल खात्री नाही.

**-अल्बर्ट आईनस्टाईन**



# ग्रेट थॉट्स



चांगलं किंवा वाईट काहीही नसतं. परंतु विचार करून तसं घडवून आणता येतं.


**- विल्यम शेक्सपिअर**

---



“ जग सुधारण्यासाठी सुरूवात करण्यापूर्वी कुणालाही एका क्षणाचीही प्रतीक्षा करणे गरजेचे वाटत नाही. किती विस्मयकारक आहे हे!

**- ॲनी फ्रँक**




“ प्रेम काही झाडावर वाढत नाही की, बाजारात विकायलाही येत नाही; परंतु एखाद्याला प्रेम करायचे असेल तर त्याने प्रेम (बिनशर्त) कसे दिले जाते हे जाणून घेतले पाहिजे. **- संत कबीर**

---




वस्तूंवर प्रेम करणे आणि माणसाचा वापर करून घेण्यापेक्षा माणसावर प्रेम करणे आणि वस्तूंचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे.

**- रॉय टी.बेनेट**



तुम्ही जीवनाचं एक अंग नाही तर संपूर्ण जीवनच समजून घेतलं पाहिजे. त्यासाठी तुम्ही खेळलंच पाहिजे. वाचलं पाहिजे, गायन, नृत्य केलं पाहिजे, कविताही केल्या पाहिजे.

**- जे. कृष्णमूर्ती**



तुमच्या आयुष्यात दोन दिवस महत्त्वाचे असतात. एक म्हणजे तुमचा जन्म झाला तो दिवस आणि तुम्ही ‘का’ चे उत्तर शोधले तो दुसरा दिवस.

**- मार्क ट्वेन**

# कोण काय बोलतं...



ज्याला
जास्त जागा
त्याच्याकडेच
राज्याचे नेतृत्व
राहील.
- शरद पवार



खोटी
आश्वासने द्याल
तर जनतेचे
फटके खाल
- नितीन
गडकरी




नरेंद्र मोदी
सरकारने
अहंकाराचा
कळस गाठला
- अभिषेक मनू
सिंघवी



काँग्रेस
सत्तेवर आली
तर गरिबांसाठी
किमान उत्पन्नाची
हमी देणारी
योजना राबवू
- राहुल गांधी



शिवसेनेने
युती केली नाही
तरी भाजपलाच
अधिक जागा
मिळतील
- रावसाहेब दानवे



पंतप्रधान
पदासाठी ममता
बॅनर्जी योग्य
उमेदवार
- एच.डी.
कुमारस्वामी




पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :

कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. ---------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : --------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------------------------------पत्ता : ---------------------------

--------------------------------------------------------शहर : ------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : --------------------------

मो. नं. : ----------------------इ-मेल : -----------------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

